सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, २४ सप्टेंबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३२४ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


## ▶▶ महत्त्वाचे...



### सोलापूर-धुळे महामार्ग आंदोलकांनी अडवला

**जालना :** मराठा आरक्षणासाठी आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांच्या आंदोलनाचा सोमवारी सातवा दिवस असून, त्यांची तब्येत खालावली असल्याची माहिती आहे. त्यांच्या आंदोलनाला समर्थन देण्यासाठी अनेक जिल्ह्यांमध्ये आंदोलन करण्यात येत आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, अशी मागणी करीत आज मराठा आंदोलकांनी आज सोलापूर-धुळे महामार्ग अडवला. मराठा आंदोलकांनी सोलापूर-धुळे महामार्ग रास्ता रोको आंदोलन केले. महामार्गावरील रामगव्हाण फाटा येथे हे आंदोलन सुरू आहे. मनोज जरांगे यांना समर्थन देण्यासाठी शेकडो मराठा कार्यकर्ते रस्त्यावर उतरल्याने सोलापूर-धुळे महामार्गावर ट्राफिक जाम झाली.

### दिसानायकेंनी घेतली राष्ट्रपतिपदाची शपथ

**कोलंबो :** श्रीलंकेतील निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर अनुरा दिसानायके यांनी सोमवारी राष्ट्रपतिपदाची शपथ घेतली. कोलंबोतील राष्ट्रपती सचिवालयात हा सोहळा पार पडला. त्यापाठोपाठ जगभरातून दिसानायके यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही दिसानायके यांचे अभिनंदन करीत नव्या वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. मतमोजणीच्या दुसऱ्या फेरीत राष्ट्रपती निवडणुकीच्या निकालांची पुष्टी होण्याची ही श्रीलंकेतील पहिलीच वेळ ठरली. कारण, मतमोजणीच्या पहिल्या फेरीत कोणत्याही उमेदवाराला ५० टक्के मते मिळाली नाहीत.

### भारतात मंकी पॉक्सचा तिसरा रुग्ण

नवी दिल्ली : सध्या जगातील काही देशात मंकीपॉक्सने थैमान घातले आहे. दरम्यान, भारतात तिसऱ्या मंकीपॉक्स रुग्णाची पुष्टी झाली आहे. हा रुग्ण केरळचा रहिवासी आहे. तो नुकताच दुबईहून भारतात आला होता. त्याला मंकीपॉक्सच्या क्लेड-१ बी व्हायरसची लागण झाल्याचे तपासणी अहवालात आढळून आले आहे. केरळमध्ये यापूर्वी मंकीपॉक्सचा आणखी एक रुग्ण आढळला होता. तोही अरब देशातूनच आलेला होता.

### एअरटेलने आणले तीन नवे प्लॅन

**मुंबई :** टेलिकॉम कंपन्यांतील वाढत्या स्पर्धेचा ग्राहकांना फायदा होणार अशी चिन्हे दिसत असून, एअरटेलने या स्पर्धेत टिकण्यासाठी तीन नवे प्लॅन जाहीर केले आहेत. एअरटेलचा १६१ रुपयांचा नवा रिचार्ज प्लॅन एक प्रीपेड प्लॅन आहे. जो ३० दिवसांच्या वैधतेसह आहे. यात ३० दिवसांसाठी १२ जीबी डेटा आहे. १८१ रुपयांच्या प्रीपेड प्लॅनमध्ये ३० दिवसांसाठी १५ जीबी डेटा दिला जातो. यात २० पेक्षा जास्त ओटीटीचा फायदा मिळेल. ३६१ रुपयांच्या प्रीपेड प्लॅनमध्ये ५० जीबी डेटा दिला जाईल.

# बदलापूर अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे चकमकीत ठार

**वृत्तसंस्था,**
**बदलापूर, २३ सप्टेंबर**

बदलापूर अत्याचार प्रकरणातील मुख्य आरोपी अक्षय शिंदे सोमवारी सायंकाळी झालेल्या चकमकीत ठार झाला. ट्रान्सिट रिमांडसाठी घेऊन जात असताना त्याने पोलिसांची बंदूक हिसकावून गोळीबार करण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी स्वसंरक्षणासाठी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्याने दिली. या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचा आदेश दिला आहे.

शाळेतील दोन चिमुरडींवर लैंगिक अत्याचार केल्याची कबुली त्याने नुकतीच पोलिसांकडे दिली होती. या प्रकरणी स्थापन करण्यात आलेल्या विशेष तपास पथकाच्या (एसआयटी)



चौकशीदरम्यान शिंदेने त्याचा जबाब कॅमेऱ्यासमोर नोंदविला. हा व्हिडीओ कोर्टात सादर करण्यात आला होता. बदलापुरातील शाळेत दोन चिमुकलींवरील झालेल्या अत्याचाराच्या प्रकरणात एसआयटीने दोन स्वतंत्र आरोपपत्र सादर केली होती. दोन्ही विद्यार्थिनींवर अत्याचार केल्याची कबुली त्याने दिली. डॉक्टर आणि पोलिसांसमोर या कबुलीजबाबाचे चित्रीकरणही झाले होते.

### पश्चातापातून कृत्य केल्याची शक्यता : निकम

माझ्या अनुभवानुसार काही आरोपींना आपल्या गुन्ह्याचा पश्चात्ताप होत असतो. त्यातून अक्षय शिंदेने हे पाऊल उचलले असावे, अशी शक्यता ज्येष्ठ विधिज्ञ उज्ज्वल निकम यांनी व्यक्त केली. या चकमकीबाबत मला अधिकृत माहिती मिळालेली नाही. माझे कुठल्याही अधिकाऱ्यासोबत बोलणे झालेले नाही, असेही निकम यांनी स्पष्ट केले.

## एमपीएससी पूर्व परीक्षा १ डिसेंबरला



**मुंबई, २३ सप्टेंबर**

राज्यसेवा पूर्व परीक्षेच्या बहुप्रतीक्षित तारखेची घोषणा अखेर झाली असून, १ डिसेंबरला ही परीक्षा घेण्यात येणार आहे. आगामी निवडणुकांचा विचार करून राज्यसेवा पूर्व परीक्षा १ डिसेंबर रोजी घेतली जाणार आहे. आयोगाने परिपत्रकात दिल्याप्रमाणे कृषी सेवेतील पदांचा महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ मध्ये समावेश करण्यात आला आहे. म्हणजेच आता राज्यसेवा परीक्षेतूनच कृषीच्या जागा भरल्या जाणार आहेत.

# सरपंच, उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ

## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णय

**वृत्तसंस्था,**
**मुंबई, २३ सप्टेंबर**

राज्यातील सरपंच व उपसरपंचांच्या मानधनात दुप्पट वाढ करण्याचा निर्णय सोमवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.

या निर्णयानुसार आता सरपंचांना ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येच्या वर्गवारीनुसार सहा हजार, आठ हजार आणि दहा हजार रुपये दरमहा इतके मानधन मिळेल. उपसरपंचांना दोन हजार, तीन हजार आणि चार हजार रुपये दरमहा इतके मानधन मिळेल. सध्या सरपंचांना तीन हजार, चार हजार आणि पाच हजार रुपये, तर उपसरपंचांना एक हजार, दीड हजार आणि दोन हजार रुपये दरमहा इतके मानधन मिळते. राज्यात २७,९४३ ग्रामपंचयाती आहे. या सगळ्या ग्राम पंचायतींच्या संरपंच, उपसरपंचांना या निर्णयाचा लाभ होणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यातील सहकारी व खाजगी दूध प्रकल्पांना दूध पुरवठा करणाऱ्या दूध उत्पादकांना गायीच्या दुधासाठी लिटरमागे सात रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णयही घेण्यात आला.

या दूध उत्पादकांना प्रति लिटर पाच रुपये अनुदान देण्यात येत होते. त्यामध्ये दोन रुपयांची वाढ करून ते सात रुपये देण्यात येईल. दूध उत्पादकांना दूध संघांनी ३.५ फॅट/८.५ एसएनएफ या प्रति लिटरसाठी १ ऑक्टोबर २०२४ पासून २८ रुपये प्रति लिटर इतका दर देणे बंधनकारक आहे. त्यानंतर दूध उत्पादकांना शासनामार्फत सात रुपये प्रति लिटर त्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्यात येतील. त्यामुळे या शेतकऱ्यांना दुधासाठी प्रति लिटर ३५ रुपये भाव यापुढेही मिळत राहणार आहे. ही योजना १ ऑक्टोबर २०२४ पासून राबवण्यात येईल. मात्र, तिचा आढावा घेऊन मुदतवाढ देण्यात येईल. या योजनेसाठी ९६५ कोटी २४ लाख इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली.

### धान उत्पादकांना अतिरिक्त भरडाई दर



पणन हंगाम २०२३-२४ करिता धानाच्या भरडाईसाठी भात गिरणीधारकांना केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या भरडाई दराव्यतिरिक्त राज्य शासनाकडून प्रती क्विंटल ४० रुपये अतिरिक्त भरडाई दर मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे पणन हंगाम २०२३-२४ मध्ये खरेदी केलेल्या धानाच्या भरडाईसाठी केंद्राकडून १० आणि राज्याकडून ४० रुपये असे प्रति क्विंटल ५० रुपये इतका भरडाई दर योजनेतील भात गिरणीधारकांना मिळणार आहे. यासाठी अतिरिक्त ४६ कोटी ५५ लाख रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली.



दिल्लीच्या नवीन मुख्यमंत्री आतिशी यांनी सोमवारी पदाची सूत्रे स्वीकारली.

# 'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाहणे हा गुन्हाच

## सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय



**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २३ सप्टेंबर**

'चाईल्ड पोर्नोग्राफी' पाहणे आणि डाऊनलोड करणे हा पोक्सो कायदा आणि माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार गुन्हा आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी एका ऐतिहासिक निकालात म्हटले आहे.

न्यायालयाने संसदेला कायद्यात बदल करून 'चाईल्ड पोर्नोग्राफी' हा शब्द 'बाल लैंगिक अत्याचार आणि शोषण करणारी सामग्री' असा बदलण्याचे सुचवले आणि न्यायालयांना 'चाईल्ड पोर्नोग्राफी' हा शब्द वापरू नये, असे सांगितले.

'चाईल्ड पोर्नोग्राफी' डाऊनलोड करणे आणि पाहणे हा पोक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या अंतर्गत गुन्हा नाही, असा मद्रास उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड प्रमुख असलेल्या न्यायासनाने रद्दबातल केला. 'चाईल्ड पोर्नोग्राफी' आणि त्याच्या कायदेशीर परिणामांवर काही मार्गदर्शक तत्त्वे न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांचाही समावेश असलेल्या न्यायासनाने मांडली.

आम्ही चाईल्ड पोर्नोग्राफीचा लहान मुलांवर होणारा अत्याचार आणि समाज व भागधारकांच्या भूमिकेसह गुन्हा नोंदवण्याच्या भूमिकेबद्दल सांगितले आहे, असे न्यायासनाने स्पष्ट केले. पोक्सो कायद्यात दुरुस्ती करा, अशी सूचना आम्ही संसदेला केली आहे. जेणेकरून 'चाईल्ड पोर्नोग्राफी'ची व्याख्या 'बाल लैंगिक अत्याचार आणि शोषणात्मक सामग्री' म्हणून संबोधली जाऊ शकते. याबाबत अध्यादेश आणला जाऊ शकतो, असे सुचवल्याचे न्यायासनाने म्हटले. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देत दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने उपरोक्त निर्णय दिला आहे. ११ जानेवारी रोजी उच्च न्यायालयाने २८ वर्षीय व्यक्तीवर त्याच्या मोबाईल फोनवर मुलांचा समावेश असलेली अश्लील सामग्री डाऊनलोड केल्याचा आरोप असलेली गुन्हेगारी कारवाई रद्द केली होती.

### फौजदारी कारवाई पुन्हा सुरू करा

हा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने या खटल्यातील फौजदारी कारवाई पुन्हा सुरू करण्याचा आदेश दिला आणि ही कारवाई रद्द करून उच्च न्यायालयाने चूक केली असल्याचे म्हटले. सत्र न्यायालय या प्रकरणावर नव्याने सुनावणी करेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. उच्च न्यायालयाचा निर्णय अत्याचारी ठरवत सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सुनावणी करण्यास सहमती दर्शवली होती.

# 'लापता लेडीज'चा नवा पत्ता थेट ऑस्कर!

**वृत्तसंस्था,**
**नवी दिल्ली, २३ सप्टेंबर**

किरण राव दिग्दर्शित 'लापता लेडीज' हा चित्रपट यंदाच्या प्रतिष्ठेच्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने हा चित्रपट ऑस्करसाठी भारताची अधिकृत प्रवेशिका म्हणून पाठवला आहे. याला फिल्म फेडरेशन ऑफ इंडियाने दुजोरा दिला आहे.

भारतीय फिल्म फेडरेशनने सोमवारी जाहीर केले की, ऑस्कर २०२५ साठी भारताकडून 'लापता लेडीज' पाठवला जाणार आहे. रणबीर कपूरचा 'ॲनिमल', मल्याळम चित्रपट 'अट्टम' आणि पायल कपाडियाचा 'ऑल वी इमॅजिन ॲड लाईट' यासह २९ चित्रपटांच्या यादीतून 'लापता लेडीज'ची निवड करण्यात आली आहे. आसामी दिग्दर्शक जान्हवी बरुआ यांच्या अध्यक्षतेखालील १३ सदस्यीय निवड समितीने एकमताने आमीर खान आणि किरण राव यांनी निर्मित 'लापता लेडीज'चा अकादमी पुरस्कारांमध्ये सर्वोत्कृष्ट चित्रपट श्रेणीत समावेश करण्याचा निर्णय घेतला.

# मान्सून परतीच्या मार्गावर

## यंदा सहा दिवस उशिराने माघार

**पुणे, २३ सप्टेंबर**

हवामान विभागाने सोमवारपासून मान्सूनचा परतीचा प्रवास सुरू होईल, अशी शक्यता वर्तवली होती. त्यानुसार नैर्ऋत्य मान्सूनच्या परतीला सोमवारपासून प्रारंभ झाल्याची माहिती स्वत: हवामान विभागाने प्रसिद्ध केलेल्या निवेदनात दिली आहे.

पुणे हवामान विभागाचे विभागप्रमुख डॉ. के. एस. होसाळीकर यांनी सोमवारपासून नैर्ऋत्य मान्सूनची माघार सुरू झाली आहे, अशी माहिती एक्सवरील पोस्टमध्ये दिली. त्यांनी हवामान विभागाचे निवेदन शेअर केले आहे. त्यामध्ये म्हटले की, दरवर्षी भारतातील नैर्ऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास हा १७ सप्टेंबरपासून सुरू होतो. मात्र, यंदा तब्बल सहा दिवस उशिरा मान्सून परतीला सुरुवात झाली आहे.

# तिरुपती लाडू वादाची होणार 'एसआयटी' चौकशी

## मंदिर शुद्धीकरणासाठी महाशांती होम

**हैदराबाद, २३ सप्टेंबर**

तिरुपती बालाजी मंदिराच्या श्रीवरी लाडूत गाय आणि डुकराची चरबी आढळल्यानंतर देशभरातील कोट्यवधी हिंदू भाविकांना धक्का बसला. या प्रकरणाची आता एसआयटी चौकशी होणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या आदेशानुसार, मंदिराच्या शुद्धीकरणासाठी सोमवारी महाशांती होम सुरू करण्यात आला. तिरुमला येथे शांती होमम पंचगव्य प्रोक्षण म्हणजेच होमचे आयोजन करण्यात आले आहे. मंदिराच्या शुद्धीकरणासाठी हा होम श्रीवारी (श्री व्यंकटेश्वर) मंदिरातील बंगारू बावी (गोल्डन विहीर) यज्ञशाळेत (विधीस्थळ) सुरू आहे.

लाडू प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने आता तपासासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन केले आहे. सरकारने स्थापन केलेल्या एसआयटीमध्ये महानिरीक्षक किंवा त्यापेक्षा मोठ्या पदाचे अधिकारी असतील. एसआयटी चौकशीअंती अहवाल शासनाला सादर केला जाईल. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी सरकार याबाबत कठोर कारवाई करणार असल्याचे आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री नायडू यांनी सांगितले.

कर्नाटक मिल्क फेडरेशनचे नंदिनी तूप याआधी तिरुपतीत वापरले जात होते. नंदिनी तुपाची किंमत वाढवल्याने त्याचा दर ४७५ रुपये किलो होता. दराचे कारण सांगून देवस्थानाचे सरकारी अधिकारी धर्मा रेड्डी (जगनमोहन यांचे निकटवर्तीय) यांनी नव्या कंपनीला (एआर डेअरी फूड, तामिळनाडू) कंत्राट दिले.


## तातडीने पाहिजेत

सोलापूर, पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय **दैनिक सोलापूर तरुण भारत**मध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) डेस्क उपसंपादक — २ पदे
२) बातमीदार — ४ पदे
३) डिटीपी ऑपरेटर — २ पदे
३) मार्केटिंग प्रतिनिधी — ४ पदे

किमान तीन वर्ष कामाचा अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क: ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.






सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# आंदोलनातून...

## आरक्षणासाठी आंदोलन तीव्र करणार

### तेरामैल येथील रस्ता रोकोप्रसंगी समाज बांधवांचा इशारा



**मंद्रुप, दि. २३ सप्टेंबर-**

पंढरपूर येथील धनगर आरक्षण मागणीला पाठिंबा देण्यासाठी व एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी सोलापूर विजयपूर महामार्गावरील तेरामैल येथे सर्वपक्षीय नेत्यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार जितेंद्र मोरे व सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी भाजपाचे शहरअध्यक्ष नरेंद्र काळे, काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, शिवसेना जिल्हा उपप्रमुख आणप्पा सतुबर, निमंत्रक अर्जून सलगर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिद्ध मुगळे, माजी सभापती दादा कोरे, धनगर समाजाचे नेते अमोल कारंडे, राष्ट्रवादीचे बाळासाहेब बंडगर, कृती समितीचे शेखर बंगाळे, माजी सरपंच सुभाष पाटोळे, श्रीमंत बंडगर, माजी सरपंच आनंद देशमुख, राधाकृष्ण पाटील, हर्षवर्धन देशमुख, उपसरपंच भगवान व्हनमाने, हंडे सरपंच, सुरेश टेळे, रमेश वाघमोडे, तमण्णा पुजारी, अप्पासाहेब चितापुरे, मकु शेंडगे, मळसिद्ध पुजारी, बाळू उत्तरे, बलराम पाटील, राजकुमार व्हनमाने, अप्पू व्हनमाने, बाळासाहेब शेंडगे, रायप्पा बने, सुनिल व्हनमाने, अनिकेत पाटील, चंद्रकांत देशमुख, राष्ट्रवादीच्या मीनाक्षी टेळे, हून्नुरसिद्ध शेजाळे, कनपवडीयार, यलप्पा वाघमोडे यांच्यासह दक्षिणत सोलापूर तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

#### प्रसंगी पदाचा राजीनामा देणार

राज्य सरकार आरक्षण देण्यासाठी प्रयत्नशील आहे. मात्र आठ दिवसात धनगर आरक्षण प्रश्न न सुटल्यास शिवसेना जिल्हा उपप्रमुख पदाचा राजीनामा देणार आहे.

- **आणप्पा सतुबर**, जिल्हा उपप्रमुख, शिवसेना शिंदे गट




## मोहोळमध्ये धनगर बांधव एकवटले

**मोहोळ, दि. २३ सप्टेंबर-**

मोहोळ तालुका सकल धनगर समाजाच्या वतीने धनगर जमातीला अनुसूचित जमाती (एसटी) चे जात प्रमाणपत्र वितरित करण्याच्या आदेशाबाबत शासन निर्णय काढवा या मागणीसाठी सोमवारी २३ सप्टेबर रोजी महामार्गावर रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. धनगर समाजाला अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र वितरित व्हावे यासाठी पंढरपूरसह महाराष्ट्रामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी लोकशाही मार्गाने आंदोलन व उपोषण सुरू आहे. अशा सामुदायिक व महाराष्ट्रातील संपूर्ण धनगर समाजाच्या सहभाग असलेल्या या नियोजनबध्द आंदोलनाचा भाग म्हणून धनगर समाजाच्या न्याय मागणीकडे लक्ष वेधण्यासाठी मोहोळ येथे मार्केट यार्ड गेटसमोरील नॅशनल हायवेवर हे आंदोलन करण्यात आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती धनाजी गावडे, लोकसेवक संजय क्षीरसागर, फंटू गोफणे, अतुल गावडे, सुशिल क्षीरसागर, गणेश गावडे, मंगेश पांढरे, लक्ष्मण करे, अनिरुद्ध खताळ, अनंता नागणकेरी, दिलीप टेकाळे, बाळासाहेब वाघमोडे, सुनिल पाटील, दिलीप पाटील, विठोबा पुजारी, माधव देशमुख, सुरेश गाढवे, राजू सलगर, बिरुदेव देवकते, शशिकांत गावडे, पिंटु बरकडे, द्रोणाचार्य लेंगर आदीसह ५०० ते ७०० समाज बांधवांची उपस्थिती होती.

## मंगळवेढ्यात अवैध दारु वाहतूक करणारी मोटरसायकल पकडली

**मंगळवेढा, दि.२३ सप्टेंबर-**

मंगळवेढा-मरवडे मार्गावरील बोराळे नाका येथे बेकायदा दारु वाहतूक करणाऱ्या एका मोटरसायकलस्वारास डी. बी. पथकाने पकडून ८७ हजार २०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. प्रविण भारत कांबळे (रा. निंबोणी) याच्या विरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कलमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११.३० वाजता यातील आरोपी प्रविण कांबळे हा मंगळवेढा ते मरवडे मार्गावरील बोराळे नाका येथे (क्र. एम. एच. १३/ डी. के.५७१७) या मोटरसायकलवरुन बेकायदा दारु वाहतूक करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक महेश ढवाण यांना मिळताच त्यांनी पोलिसांच्या मदतीने बोराळे नाका परिसरात जाळे लावले असता तो मोटरसायकलस्वार जाळ्यात सापडला. याची फिर्याद डी. बी. पथकाचे पोलीस हवालदार वैभव घायाळ यांनी दिल्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## अन्यायाविरोधी आंदोलनामुळेच गरिबांची कामे मार्गी : माजी मंत्री खंदारे

**बार्शी, दि. २३ सप्टेंबर-**

अन्याय विरोधी आंदोलनामुळेच येथील दलित आणि बहुजन समाजातील सामान्य नागरिकांची कामे मार्गी लागली आहेत. या संघटनेचे अध्यक्ष व माजी उपनगराध्यक्ष नवनाथ चांदणे यांनी केलेल्या आंदोलनामुळे शहरात हजारो बेघर गरिबांना घरकुले मिळाली असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री उत्तमप्रकाश खंदारे यांनी रविवारी बार्शी येथे केले. अन्याय विरोधी आंदोलनाच्यावतीने विविध प्रश्नांच्या बाबतीत आयोजित केलेल्या टिळक चौकातील सभेत ते बोलत होते. यावेळी नवनाथ चांदणे, माजी नगरसेवक रोहिदास बगाडे, दत्तू अवघडे, दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष सुनील अवघडे, निलेश खुडे, युवराज वाघमारे, आनंद चांदणे, सचिन लोंढे, राजू थोरात, बापू साठे उपस्थित होते. सभेत नवनाथ चांदणे यांनी देखील आंदोलनाची भूमिका स्पष्ट केली. यावेळी सुनील अवघडे, आनंद चांदणे, राजू थोरात यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी महिलांच्या मोठ्या संख्येसह दास पवार, विजय बगाडे, किशोर तेलंगे, दास पवार, राकेश खंडागळे, प्रकाश बगाडे उपस्थित होते.

# जनआक्रोशाला धार...आंदोलनाचा सोमवार

### पंढरपूर-कराड रस्ता रोखला; दोन तास वाहतूक ठप्प, एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी धनगर समाज आक्रमक, शेळ्या-मेंढ्यासह रस्त्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ सप्टेंबर-**

धनगर समाजाच्या एसटी आरक्षण अंमलबजावणीसाठी आज पंढरपूरसह जिल्ह्यात ठीक ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करून सरकार विरोधात नाराजी व्यक्त करत निषेध नोंदवण्यात आला. येथील पंढरपूर कराड महामार्गावरील पंतचौक येथे धनगर समाज बांधव आपल्या शेळ्या मेंढ्या सह दाखल झाले आणि दोन तास हा मार्ग रोखून धरला.




पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानावर मागील १५ दिवसांपासून सुरू असलेल्या आमरण उपोषणाने धार तीव्र झाली असून धनगर समाजाच्या प्रलंबित प्रश्नासाठी वेळ काढूपणा करणाऱ्या सरकार विरोधात जनआक्रोश निर्माण झाला. त्याचा प्रत्यय म्हणून शहरालगत असणाऱ्या पंढरपूर कराड महामार्गावरील पंत चौक येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात आले तर सरकारच्या भूमिकेविषयी समाजातील नाराजी पसरली असून अनेक नेत्यांनी यावेळी सरकार विरोधात घोषणाबाजी करून आगामी निवडणुकीत सत्ताधारी व विरोधकांना खाड्यासारखे बाजूला काढून करण्याचा इशारा देण्यात आला.



#### सत्ताधारी अन् विरोधक सारखेच

सत्ताधारी पक्ष हा सत्तेत येण्यापूर्वी धनगर समाजाचा प्रश्न सोडवतो म्हणून आश्वासित करतो तर आज विरोधात असणारा पक्ष आम्हाला सत्ता द्या आम्ही तुमचे प्रश्न सोडवतो म्हणून आश्वासित करतो. परंतु दोन्हीही आमचा दोघेही आमचा प्रश्न सोडवत नसून आम्हाला फसवत फसवत आहेत. त्यामुळे या महायुती व महाविकास आघाडी विरोधात आगामी काळात समाज भूमिका घेणार असल्याचे मत अनेक आंदोलकांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता तर आपल्या मागण्याचे निवेदन यावेळी देण्यात आले.

#### आज भूमिका ठरविणार

पंढरपूर येथील टिळक स्मारक मैदानामध्ये उद्या धनगर समाजाचा राज्यव्यापी मेळावा होणार असून या मेळाव्यात समाजाची भूमिका मांडली जाणार असून सत्ताधारी व विरोधक हे दोघेही गेंड्याच्या कातडीचे असल्याने या विरोधात आपण भूमिका घ्यायची की अन्य काही घ्यायची हे उद्या ठरविण्यात येणार असून उपोषणकर्त्यांनी राज्यातील समाज बांधवांना मोठ्या संख्येने पंढरपूर येथे उपस्थित रहावे असे आव्हान करण्यात आले आहे.

## सांगोल्यात तीन ठिकाणी अडविला रस्ता

**तभा वृत्तसेवा ,**
**सांगोला , दि.२३ सप्टेंबर-**

धनगर समाजाला एसटीतून आरक्षण मिळावे या मागणीसाठी धनगर समाजाकडून सांगोला तालुक्यात सोमवार दि.२३ सप्टेंबर रोजी सांगोला पंचायत समिती समोर, अनकढाळ टोलनाका व घेरडी अशा तीन ठिकाणी शेळ्या-मेंढ्यांना घेऊन रास्ता रोको करुन आंदोलन करण्यात आले .यावेळी अनेक संघटनांनी धनगर समाजाच्या आंदोलनास पाठिंबा दिला.

मेंढ्यासह धनगर समाज बांधव रस्त्यावर उतरल्याने जवळपास एक तास वाहतूक ठप्प झाली होती. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. धनगर समाजाला सरकार वारंवार फक्त आश्वासन देत असून एसटीमध्ये समावेशाच्या आश्वासनाची पूर्तता करत नसल्याने या ठिकाणचे कार्यकर्ते आक्रमक झाले होते. यावेळी गजीढोल हे पारंपारिक नृत्य सादर करुन जागर केला. यावेळी डॉ. बाबासाहेब देशमुख, डॉ. अनिकेत देशमुख, उद्योगपती बाळासाहेब एरंडे, आनंदा माने, ॲड. सचिन देशमुख, दादासाहेब लवटे, विष्णू देशमुख, बापूसाहेब ठोकळे, मनोज ढोबळे, परमेश्वर कोळेकर, उल्हास धायगुडे, अरविंद केदार, सूर्यकांत मेटकरी, शिवाजी शेजाळ, डॉ. विजय बंडगर, अजित गावडे, अण्णासाहेब मदने, ॲड. धनंजय मेटकरी, आनंद मेटकरी, गोरख पांढरे, अमोल खरात, दत्तात्रय जानकर, दादासाहेब माने, डॉ. दादा जगताप, संतोष बेहेरे, संजय शिंगाडे, रवि मेटकरी, बालाजी येडगे, दिलीप जानकर , नवनाथ शिंगाडे, डॉ. महेश राऊत, डॉ. अभिजीत सोनलकर, ॲड. शंकर सरगर, कोंडीबा सिद, रावसाहेब अनुसे, शिवाजी वाघमोडे, भगवान कारंडे, संतोष कारंडे, दामू मोरे, कल्याण लुबाळ, अक्षय आगलावे, महेश बंडगर, तुकाराम भुसनर, अशोक गावडे, मायाप्पा यमगर, शंकर चौगुले, संतोष चौगुले, शेखर बंडगर, पोपट गडदे, श्रीमत गवंडे, हरिभाऊ सरगर, बीरा आलदर, संजय सरगर, राजेंद्र बंडगर, रवि बंडगर, दत्ता लोखंडे, विठ्ठल शेळके, सुभाष कोकरे, सुनिल चोरमुले, आनंदा कोकरे, रामा चोरमुले, अमित खरात, अमित शेंबडे, बाळकृष्ण कोकरे, आबा पाटील, योगेश देवकुळे, समाधान वाघमारे, संदीप धायगुडे, विवेक देशमुख, ज्ञानेश्वर इमडे, आकाश व्हटे, शंकर मेटकरी, आनंदा तंडे उपस्थित होते.यावेळी सांगोला पोलीस निरीक्षक भीमराव खणदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.



## प्रश्न सोडवूनही टीका करणे चुकीचे : नरेंद्र पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ सप्टेंबर-**

मराठा समाजाचे अनेक प्रश्न महायुती शासनाने सोडविले आहेत. मात्र प्रश्न सोडवूनही मनोज जरंगे-पाटील हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यावर टीका करत आहेत. प्रश्न सोडवूनही टीका करणे चुकीचे आहे, असे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले

मराठा समाजाच्या बैठकीसाठी नरेंद्र पाटील पंढरपुरात आले असता ते बोलत होते. ते म्हणाले मराठा समाजातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ तयार करण्यात आले आहे. या मंडळामार्फत एक लाखाहून अनेक सुशिक्षित बेरोजगार मराठा समाजातील तरुणांना कर्ज देण्यात आली असून त्यांनी वेगवेगळ्या व्यवसाय सुरू केला आहे. यामुळे आता आम्ही प्रत्येक जिल्ह्यात मराठा समाजाच्या बैठका घेऊन नवउद्योजक तयार करण्यासाठी प्रयत्न करत आहोत. महायुती शासनाने मराठा समाजाचे अनेक प्रश्न सोडविले आहेत. मात्र प्रश्न सोडवूनही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्यावर मनोज जरंगे पाटील टीका करत आहे. हे टीका करणे योग्य नाही असे पाटील यांनी सांगितले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जरंगे-पाटील यांना अनेकवेळा समजावून सांगितले. मात्र तरीही ते उपोषणास बसत आहेत. त्यांचे सध्या सुरू असलेले अमरण उपोषण सोडविण्यासाठी अनेक नेतेमंडळी प्रयत्न करत आहेत, असे आ. पाटील यांनी सांगितले.

## अक्कलकोटमध्ये रस्त्यावर ठिय्या

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ सप्टेंबर-**

सकल धनगर समाज बांधवांनी सोमवारी वीज वितरण कंपनी कार्यालयाजवळ सोलापूर-अक्कलकोट रोडवर एसटी प्रवर्गात समावेश करुन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी मेंढ्यांसह हजारोंच्या संख्येनी रस्ता रोको आंदोलन केले.

पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी निवेदन स्वीकारले. यावेळी भाजपाचे युवा नेते रमेश सिद्रामप्पा पाटील, माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, सुनील बंडगर, अविनाश मडिखांबे, रमेश पाटील, आनंद तानवडे, बाळासाहेब मोरे, मल्लिकार्जुन पाटील, आनंद बुक्कानुरे, सुनिल कटारे, मल्लिनाथ पाटील, अशपाक बळोरगी, महेश जानकर, बाबासाहेब पाटील, मल्लिकार्जुन काटगाव, अनिल बर्वे, दत्तात्रय हिळ्ळी, सुभाष पुजारी, दत्तात्रय माडकर, सूर्यकांत बाचके, गुणवंत लवटे, महादेव करमल, विठ्ठल खताळ, दाजी कोळेकर, संतोष शिंदे, शिवयोगी पुजारी, विश्वनाथ बंदिछोडे, महादेव निंबाळ, रेवणसिद्ध शेरी, रवी सलगरे, औदुंबर बंडगर, सैदप्पा इंगळे, अजय मुकणार, प्रकाश गडगडे, विजय पोतेनवरुउपस्थित होते. यावेळी माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे, रिपाइंचे तालुकाध्यक्ष अविनाश मडिखांबे, वंचित बहुजन आघाडीचे तालुका युवक अध्यक्ष शीलामणी बनसोडे, जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे, युवा नेते रमेश पाटील, मनसेचे तालुकाध्यक्ष मल्लिनाथ पाटील, तळेवाड ग्रामपंचायत यांच्या वतीने पाठिंब्याचे लेखी पत्र दिले. सिद्रामप्पा पाटील, सुनिल बंडगर, रिपाइंचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आनंद तानवडे, पंचायत समितीचे माजी विरोधी पक्षनेते बाळासाहेब मोरे, शिवसेना उबाठाचे तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, मनसेचे तालुका प्रमुख मल्लिनाथ पाटील, अनिल बर्वे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. एक तास भर चक्काजाम केल्याने दोन्ही बाजूला वाहनांची रांग लागली होती. सूत्रसंचालन रासपचे अक्कलकोट तालुकाध्यक्ष दत्तात्रय माडकर यांनी केले.





## वैराग येथे धनगर समाजाचा रस्ता रोको

**तभा वृत्तसेवा**
**वैराग, दि. २३ सप्टेंबर-**

धनगर जमातीला अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र वितरित करण्यात यावे यासाठी शासन निर्णय काढावा म्हणून वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये सकल धनगर समाजाच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. पंढरपूर आणि लातूर येथे धनगर समाजाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी वैराग भागातील सकल धनगर समाजाने वैराग येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये रास्ता रोको केला.

यावेळी सकल मराठा समाजाने धनगर समाजाच्या मागणीला पाठिंबा दिला आहे. यावेळी माजी जि. प. सदस्य संतोष निंबाळकर, माजी जि. प. सभापती मकरंद निंबाळकर, उपनगराध्यक्ष निरंजन भूमकर, डॉ. कपिल कोरके, जिल्हा बँकचे माजी संचालक सुभाष शेळके, वैजिनाथ आदमाने, नानासाहेब धायगुडे, नंदुकुमार पांढरमिसे, प्रमोद वाघमोडे, माजी जि. प. सदस्य श्रीमंत थोरात, डॉ. पोपट काळे, राजाभाऊ शेळके, किसन हजारे, दादासाहेब मोरे, खंडेराया घोडके, आनंद कोरके, शितल पाटील, अप्पा शेंडगे, खंडू नरुटे, हरिभाऊ कोळेकर, बाळासाहेब पाटील आदी उपस्थित होते. निवेदन मंडल अधिकारी विरेश कडगंजी आणि वैराग पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक निवृत्ती मोरे यांनी स्वीकारले. सूत्रसंचालन कालीदास देवकते यांनी केले.

## राजू खरे यांच्या हस्ते सव्वा कोटींच्या विकासकामांचा औंढी, वरकुटेत शुभारंभ

**शासकीय निधीसह स्वखर्चातील कामाचा समावेश; ग्रामस्थ खुश**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २३ सप्टेंबर-**

मोहोळ विधानसभा राखीव मतदारसंघात उद्योग राजू खरे यांच्या प्रयत्नातून कोट्यावधी रुपयाच्या शासकीय निधीसह स्वखर्चातून सुरू करण्यात आलेल्या विविध कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे.

मागील अनेक दिवसांपासून मोहोळ विधानसभा मतदारसंघातील मोहोळ, उत्तर सोलापूर आणि पंढरपूर तालुक्यातील विविध गावातून विकासकामांसाठी सुरुवात करण्यात आली आहे. मागील दोन दिवसांपूर्वी औंढी आणि वरकुटे या गावातील विविध कामासाठी सुरुवात करण्यात आली आहे. यामध्ये मोहोळ तालुक्यातील औंढी गावातील गणू पाटील वस्ती ते फराटे, भुसे, गुंड, चव्हाण, वस्तीकडे जाणारे ५० लाख रुपये किमतीचे पानंद रस्ते, फराटे वस्ती ते भुसे, पाटील, वस्तीकडे २५ लाख रुपयाचे खडीकरण रस्ते,औंढी ते भुसे, पाच चावर वस्ती १५ लाखाचे खडीकरण, औंढी ते बेगमपुर रस्त्यावर गुंड, माने, शिंदेवस्ती रस्त्याच्या खडीकरणसाठी १५लाख, गणू पाटील वस्ती ते शिंदे, भुसेवस्ती या रस्तासाठी १५ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. या विविध रस्त्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे.

या वरील सरकारी निधी बरोबर खरे यांच्या स्वनिधीतून औंढी येथील भजनी मंडळासाठी साहित्य. वरकुटे येथील मारुती मंदिर समोर फेव्हर ब्लॉक, वरकुटे येथील मेन रोड ते ससाणे वस्ती रस्त्याचे मुरमीकरण करण्यात आले असून याचे लोकार्पण करण्यात आले आहे. या शुभारंभप्रसंगी पांडुरंग बचूटे, सौदागर खडके, सरपंच अरुण बनसोडे, संभाजी लेंगरे, लिंगराज व्हनमाने, सुनील पाटील, सौदागर डोंगरे, नाना भुसे, तानाजी शिंदे, सागर भुसे, नितीन कांबळे, सोसायटीचे चेअरमन संभाजी शिंदे, विजयकुमार भुसे, राजेंद्र भुसे, औदुंबर शिंदे, अर्जुन शिंदे, आकाश बचूटे, विश्वतेज बचूटे, लखन घाटे, गणेश सोनवणे यांचेसह मोहोळ मतदार संघातील विविध गावातील सरपंच, उपसरपंच, विविध पक्ष, संस्था, संघटनांचे पदाधिकारी यांच्यासह गावातील आजी-माजी पदाधिकारी उपस्थित होते.





## उजनी टें येथे रोखला सोलापूर-पुणे महामार्ग

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ सप्टेंबर-**

गेली दहा वर्षे आरक्षणाचा लढा सुरू आहे. सरकारकडे आणखी दहा दिवस शिल्लक आहेत. पुढील पिढी सुधारावयाची असेल तर आरक्षण गरजेचे आहे. यासाठी पंढरपूर येथील आरक्षण आंदोलनास लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन शिवाजी कांबळे यांनी केले. पंढरपूर येथे होणाऱ्या धनगर आरक्षण आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी पुणे-सोलापूर महामार्गावर उजनी पाटी येथे दखल धनगर समाजाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शिवाजी कांबळे बोलत होते. पुढे शिवाजी कांबळे म्हणाले की, आरक्षण मिळेल या आशेवर समाज डोळे लावून बसला आहे. कित्येक वर्षे आंदोलन सुरू आहे.पण शासन दखल घेत नाही. पुढे मिळेल की नाही हे माहीत नाही. पण ही वेळ महत्त्वाची आहे.यामुळे तरुणांनी हजारोंच्या संख्येने कपाळाला भंडारा लावून आंदोलनात सहभागी झाले पाहिजे. शिवाजी पाटील-धनगड व धनगर एकच आहेत. यामुळे अंत न पाहता एसटी नुसार धनगर समाजास आरक्षण मिळावे. बाबासाहेब वाघमोडे-७५ वर्ष समाजावर अन्याय होत आहे. यावेळी रामचंद्र टकले,निवृत्ती तांबवे,सरपंच शोभा टाकले,सुधीर इरकर,आदींची भाषणे झाली.

किशोर सलगर यांनी सूत्रसंचालन केले. निवेदन पोनि दीपक पाटील, मंडल अधिकारी जी. के.सोनवणे यांनी स्वीकारले. यावेळी दोन्ही बाजूने शेकडो वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. बैलगाड्या घेऊन समाज बांधव उपस्थित राहिले. यावेळी समाज कल्याणचे माजी सभापती शिवाजी कांबळे, टेंभुर्णी जि.प.चे प्रतिनिधी शिवाजी पाटील, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक सचिन देशमुख, माजी संचालक रामभाऊ टकले, पंचायत समितीचे उपसभापती धनाजी जवळगे, माजी सरपंच निवृत्ती तांबवे, आढेगावचे सरपंच कांतीलाल टेळे, चांदच्या विद्यमान सरपंच शोभा टकले, आढेगावचे उपसरपंच ज्ञानेश्वर भाऊ वाघ, आलेगावचे माजी सरपंच हरिभाऊ माने, किशोर सलगर, सोमनाथ जवळगे, माणिक झिंजे, तानाजी सलगर, अशोक बिचकुले, काका टेळे, समाधान सलगर, अरविंद नायकुडे, भैय्या खरात, गोरख वाकडे, नागनाथ जवळगे, हनुमंत पाटील, व्यंकट हेगडकर यांच्यासह शेकडो समाज बांधव उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### राज ठाकरे यांची मुख्यमंत्र्यांशी चर्चा

**मुंबई, दि. २३ सप्टेंबर,**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज सकाळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा या निवासस्थानी येऊन सदिच्छा भेट घेतली. विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्ष तयारीत असताना राज ठाकरे यांच्या या भेटीमागे राजकीय तर्कवितर्क वर्तविण्यात येत आहेत. लोकसभा निवडणुकीवेळी राज ठाकरे यांनी महायुतीला बिनशर्त पाठिंबा दिला होता. मात्र विधानसभा निवडणुकीसाठी त्यांनी स्वतंत्रपणे लढविण्याचा पवित्रा घेतला आहे.त्यासाठी राज्यभर दौरे सुरू केले आहेत. निवडणुकीसाठी आचारसंहिता येत्या काही दिवसात जाहीर लागण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर आज राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर जाऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. सुमारे अर्धा तास चाललेल्या बैठकीत राज्यातील विविध प्रश्नाबाबत त्यांनी चर्चा केली असल्याचे सांगण्यात आले. यावेळी त्यांच्यात राज्यातील विविध प्रश्नांबाबत चर्चा झाली.

### प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या पुणे दौऱ्याच्या पूर्वतयारीचा आढावा

**मुंबई, दि. २३ सप्टेंबर,**

पंतप्रधान नरेंद्र मोदी २६ सप्टेंबरला पुणे दौऱ्यावर येत असून त्यांच्या नियोजित पुणे दौऱ्याच्या अनुषंगाने प्रशासनाने करावयाच्या कार्यवाहीच्या पूर्वतयारीचा आढावा उपमुख्यमंत्री व पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयात बैठकीत घेतला. जिल्हा प्रशासन, पोलिस, महानगरपालिका, संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय आणि सहकार्याने काम करावे. वाहतुकीचे नियोजन, कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. या बैठकीला पुणे विभागीय आयुक्त, डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पुणे शहरचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे, महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पोलीस अधीक्षक (ग्रामीण) पंकज देशमुख, पुणे महानगर परिवहन महामंडळ अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, दिपा मुधोळ मुंडे, पिंपरी चिंचवडचे वाहतूक पोलीस उपायुक्त बापू बांगर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य अभियंता अतुल चव्हाण आदी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

### एडीएचओ डॉ. घाडगे यांनी घेतला पदभार

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर,**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातील अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी पदाचा पदभार नंदकिशोर घाडगे यांनी गुरुवारी घेतला आहे. यावेळी त्यांचा सत्कार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले यांनी केला. सोलापूर आरोग्य विभागाच्या अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे यांची धुळे येथे जिल्हा क्षयरोग अधिकारी म्हणून बदली झाल्यानंतर हे पद तब्बल एका वर्षापासून रिक्त होते. एक वर्षापासून या पदावर कोणीही आले नाही. त्यामुळे वर्षभर हे अतिरिक्तवरच सुरू होता. त्या पदाचा पदभार



अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी घाडगे यांनी घेतला आहे. घाडगे हे तुळजापूर येथे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून काम पाहत होते. त्यांची पदोन्नती अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी म्हणून झाली आहे. दरम्यान आरोग्य विभागात गेल्या एका वर्षापासून अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी आणि माता व बालसंगोपन हे पदे रिक्त होती. त्यातील अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी यांची नेमणूक केल्याने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नवले यांचा कामांचा ताण कमी होणार आहे. आता नागरिकांचीही कामे लवकर होऊन त्यांना न्याय मिळणार आहे.

### एसटी महामंडळाच्या जमिनी बीओटी तत्त्वावर विकसित करण्यात येणार

**मुंबई, दि. २३ सप्टेंबर,**

एसटी महामंडळाच्या ३९ जागा बीओटी तत्वावर विकसित करण्यात येत असून, यासाठी भाडेपट्टा कराराचा कालावधी तीस वर्षांऐवजी साठ वर्षे करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. एसटी महामंडळाच्या या भूखंडावर उपलब्ध होणारे चटई क्षेत्र (महामंडळाच्या बांधकामासाठीचे ०.५



वगळता) व्यापारी तत्वावर वापरण्याची मुभा देण्यात येईल. विकास नियंत्रण नियमावली २०३४ मधील चटई क्षेत्र वापराच्या तरतुदी एकत्रिकृत नियंत्रण व नियमावली प्रोत्साहन नियमावली २०२० नुसार करण्यास मुभा देण्यात येईल. या जमिनीचा व्यापारी तत्वावर उपयोग करताना ५० टक्के हिस्सा शासनास भरण्यापासून महामंडळास सूट देण्यात येईल. तसेच बीओटीच्या निविदा महामंडळाच्यास्तरावरच अंतिम करण्यात येतील.

### दीपक कदम यांचे निधन



**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

गवळी वस्ती येथील ज्येष्ठ सदस्य दीपक (बापू ) रामचंद्र कदम (वय ६२) यांचे रविवारी सोलापुरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असताना हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी सकाळी कोयना नगर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

# कर्जत-जामखेडमध्ये यंदा भाजपा परिवर्तन घडविणार : फडणवीस

**● शरद पवार गटाचे मधुकर राळेभात, उबाठाचे संजय काशीद यांचा भाजपा प्रवेश**

**तभा वृतसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.२३ सप्टेंबर:**

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येणार आणि कर्जत जामखेड जागेवर परिवर्तन होऊन भाजपाचा उमेदवार निवडून येणार, असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे कर्जत जामखेड विधानसभा प्रमुख आणि नगर जिल्हा परिषद माजी सदस्य मधुकर राळेभात, उबाठा शिवसेनेचे जामखेड तालुका अध्यक्ष संजय काशीद यांनी अनेक कार्यकर्त्यांसोबत भाजपात प्रवेशप्रसंगी ते बोलत होते. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या कार्यक्रमाला प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री आणि नगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राम शिंदे, सुरेश धस, अतुल भातखळकर आदी उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले.

यावेळी फडणवीस म्हणाले की, कर्जत,जामखेड मध्ये ज्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस रुजवली असे ज्येष्ठ नेते मधुकर राळेभात यांच्या प्रवेशामुळे भाजपाची ताकद वाढणार आहे. भाजपाच्या परिवारात आपण एकजुटीने काम करू . कुकडीच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न महायुती सरकार करत आहे. पश्चिम वाहिनी नद्यांचे वाहून जाणारे ५५ टीएमसी पाणी गोदावरी



खो-यात आणण्यासाठी कॅबिनेटने मान्यता दिली असून कामाचे पहिले टेंडरही निघाले आहे. संपूर्ण जिल्हा जलमय करण्यासाठी महायुती सरकार वेगाने काम करत आहे. यावेळी राळेभात म्हणाले की, कुकडीच्या पाण्यासह अनेक समस्या सोडवण्याची त्यावेळी केवळ आश्वासने दिली गेली. मात्र पाच वर्षांत काहीच काम केले नाही. जाती जातीत दरी निर्माण करण्याचे प्रयत्न केले गेले. कार्यकर्त्यांचे खच्चीकरण करण्यात आले. त्यामुळे व्यथित होऊन आणि देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून कर्जत जामखेडच्या विकासासाठी भाजपामध्ये येण्याचा निर्णय घेतला. भाजपा नेतृत्व जे काम सांगेल ते करू, पक्षातर्फे जो उमेदवार दिला जाईल त्याच्या पाठीशी उभे राहू असेही त्यांनी स्पष्ट केले. राळेभात यांच्या सोबत कर्जत-जामखेड तालुक्यातील अनेक सरपंच, नगरसेवक, पदाधिका-यांनी ही प्रवेश केला.

# ॲड. सोमनाथ वैद्य यांनी दिला प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना अर्ज

**● दक्षिण सोलापूरमधून उमेदवारीची मागणी**
**● भाजपा सदस्यत्वाचीही केली नोंदणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ऍड. सोमनाथ वैद्य यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी भाजप शहराध्यक्षानंतर आता थेट प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भाजपकडून उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज दिला. दरम्यान,भाजपा सदस्यत्वाची रितसर नोंदणी केली आहे.

वकासाचे व्हिजन असलेले स्वयंम शिक्षा फाउंडेशनचे संस्थापक ऍड. सोमनाथ वैद्य यांनी दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी भाजपच्या माजी सभागृह नेत्यासह सहा नगरसेवकांनी पाठिंबा दर्शवला आहे. त्याचबरोबर माजी उपमहापौर राजेश काळे यांनीही पाठिंबा दिला. ऍड. सोमनाथ वैद्य यांनी भाजपकडून उमेदवारी मिळावी म्हणून भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांना अधिकृत अर्ज दिला होता. दरम्यान, ऍड. वैद्य यांनी रितसर भाजप सदस्यत्वाची नोंदणी केली आहे. त्यांनतर आता थेट भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भाजपकडून दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघातून अधिकृत उमेदवारी मिळावी म्हणून अर्ज दिला आहे. दक्षिण सोलापूर विधानसभा मतदारसंघात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवित असतानाच दुसरीकडे भाजपकडून उमेदवारीसाठी स्थानिक पासून प्रदेश श्रेष्ठी पर्यंत संपर्क आणि पाठपुरावा करीत आहेत. सर्वांकडून आग्रही मागणी होत असल्याने निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. मतदासंघात मोर्चेबांधणी बरोबरच पक्ष श्रेष्ठी, पदाधिकारी यांच्या भेटीगाठी ते घेत आहेत. त्यामुळे त्यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. ॲड. सोमनाथ वैद्य यांनी अर्जात म्हटले आहे की, जुळे, सोलापूर येथे राहत असुन उत्तर सोलापूर तालुक्यात फळबाग शेती आहे. पदवीपर्यतचे शिक्षण दयानंद महाविद्यालय सोलापूर येथे झाले तर पदव्युत्तर शिक्षण के. सी.



विधी महाविद्यालय, चर्चगेट मुंबई येथुन झाले आहे. यापूर्वी पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या आस्थापनेवर पीए म्हणुन ५ वर्षे मंत्रालयाात काम केले आहे. सन २००६ ते आजरोजी पर्यंत विविध मंत्री आस्थापना व विधान भवन मंत्रालय प्रशासकीय पातळीवर १९ वर्ष काम केले आहे.

# भगवान परशुराम, महाराणा प्रताप आर्थिक महामंडळास मंजुरी

**● ५० कोटी रुपयांची तरतूद**

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई,दि.२३ सप्टेंबर:**

मुंबई सोमवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळास मंजूरी देऊन महामंडळासाठी ५० कोटी रुपयांची तरतूद केली. त्याचप्रमाणे राजपूत समाजासाठी वीर शिरोमणी महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. या समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील युवक-युवतींना शैक्षणिक तसेच व्यवसायासाठी या महामंडळामार्फत आर्थिक सहाय्य करण्यात येईल. या महामंडळाला ५० कोटींचे भागभांडवल देण्यात येईल. परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे मुख्यालय पुणे व महाराणा प्रताप आर्थिक विकास महामंडळाचे मुख्यालय छत्रपती संभाजीनगर येथे राहील.

### अखेर ब्राह्मण समाजाच्या लढ्यास यश

**सोलापूर :** ब्राह्मण समाजाच्या गेल्या अनेक वर्षापासून भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ व्हावे ही मागणी आज राज्य सरकारने तातडीने मंजूर करत ब्राह्मण समाजाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. गेल्या अनेक वर्षापासून समस्त महाराष्ट्रातल्या ब्राह्मण समाजाची मागणी होती. ब्राह्मण समाजाला भगवान परशुराम आर्थिक विकास महामंडळ व्हावे व इतर अशा इतर मागण्यांसाठी गेले अनेक वर्ष ब्राह्मण समाज आंदोलन करून राज्य सरकारकडे आपली मागणी करत होता. सोमवारच्या राज्यमंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये भगवान परशुराम आर्थिक विकास मंडळ मंजूर करण्यात आले. २०१८ साली मुंबईच्या आझाद मैदानावरती प्रदेश काँग्रेसचे प्रवक्ते प्रा. काकासाहेब कुलकर्णी यांच्या नेतृत्वात आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी हजारो समाज बांधवांसह मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ब्राह्मण समाजाचे नेते बाजीराव धर्माधिकारी, निखिल लातूरकर, दीपक रणवरे, मकरंद कुलकर्णी, विश्वजीत देशपांडे, सुरेश मुळे, सचिन वाडे-पाटील, गजानन जोशी, अर्चना सरुडकर, संजीवनी पांडे, विजया कुलकर्णी यांच्यासह अनेक समाज बांधवांनी वेळोवेळी प्रयत्न केल्याचे प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले.

# केंद्रीय निवडणूक आयोग २६ ते २८ रोजी मुंबईत

**मुंबई, दि.२३ सप्टेंबर,**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी भारत निवडणूक आयोगाचे अधिकारी २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान मुंबई दौऱ्यावर येणार आहेत.

तीन दिवसाच्या दौऱ्यात निवडणुकीच्या अनुषंगाने वरिष्ठ सनदी अधिकारी व विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहेत. २७ सप्टेंबर आयोगाच्या अधिकाऱ्यांची विविध राजकीय पक्ष, एसपीएनओ, नोडल अधिकारी आणि सीपीएमएफ यांच्यासोबत निवडणुकीच्या सुरक्षेविषयी सखोल चर्चा होईल. यानंतर अंमलबजावणी यंत्रणांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक आयोजित केली जाईल. त्याचदिवशी राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत देखील आयोगाच्या अधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण चर्चा होणार आहे. २८ सप्टेंबरला जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांसोबत निवडणूक तयारीचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर पत्रकार परिषद घेण्यात येईल, असे नमूद केले आहे.

# राज्यातील १४ आयटीआय संस्थांचे नामकरण

**मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय**

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई दि.२३ सप्टेंबर:**

राज्यातील १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना समाजसुधारक आणि सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्वांची नावे देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

राज्यात सध्या ४१९ शासकीय आणि ५८५ खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. यापैकी १४ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची नावे बदलण्यात येणार आहेत.

यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीडचे नाव कै.विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था बीड, औ.प्र.संस्था जामखेड जि.अहमदनगरचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जामखेड जि. अहमदनगर, औ.प्र.संस्था मुंबई शहरचे नाव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था येवला जि.नाशिकचे नाव महात्मा ज्योतिबा फुले शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र. संस्था जव्हार जि.पालघरचे नाव भगवान बिरसा मुंडा शासकीय औद्योगिक



प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था कोल्हापूरचे नाव राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था अमरावतीचे नाव संत गाडगेबाबा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था सांगलीचे नाव लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था जळगांवचे नाव कवयित्री बहिणाबाई चौधरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था आर्वी जि.वर्धाचे नाव दत्तोपंतजी ठेंगडी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था बेलापूर नवी मुंबईचे नाव दि.बा.पाटील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र. संस्था कुर्लाचे नाव महाराणा प्रताप शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.संस्था भूम जि.धाराशिवचे नाव आचार्य विद्यासागरजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औ.प्र.ठाणेचे नाव धर्मवीर आनंद दिघे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था असे होणार आहे.

# भाजपा महाराष्ट्र आदिवासी कार्यकर्ता संमेलन परिषद उत्साहात

**● आदिवासी समाजाच्या विकासावर झाली साधक बाधक चर्चा**




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र आदिवासी कार्यकर्ता संमेलनाचे आयोजन नाशिक येथे करण्यात आले होते. यावेळी मेळाव्यात आदिवासी समाजाच्या हिताचे निर्णय घेण्यात सरकार यशस्वी वाटचाल करत असून याच माध्यमातून साधक बाधक चर्चा करण्यात आली.

गतलोकसभेत एस.सी. एस.टी. व मागासवर्गीय आदिवासी यांना संविधान बदलणार म्हणून महाविकास आघाडीचे प्रमुख नेते यांनी चुकीचा अपप्रचार करून सर्वसामान्य जनतेला एक प्रकारे फसवणूकच केलेली आहे. येणाऱ्या विधानसभेतही असाच अपप्रचार करून व तसेच मराठा, ओबीसी,समाजाचा रोष युती सरकारवर करण्याच्या प्रयत्नात असून दोन समाजात तेढ निर्माण करून अशांतता निर्माण करण्याच्या प्रयत्नात असून त्यांच्या कुठल्याही भुलतापांना सर्वसामान्यजनता, दलित, ओबीसी आदिवासी मागासवर्गीय यांनी बळी पडू नये. सदरचे युती सरकार हे जनतेच्या मनातील कामे करीत असून सर्वात लोकप्रिय झालेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झाल्यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळेच ते वैफल्यग्रस्त झालेले आहेत म्हणून विरोधकांच्या कुठल्याही आमिषाला बळी पडू नये हे सरकार फक्त सर्वसामान्य जनतेचे हिताचे कामे करीत आहेत असे विकासाचे मुद्दे या मेळाव्यात उपस्थित केले.ल या मेळाव्यात महाराष्ट्रातील सर्व प्रमुख कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश प्रभारी भुपेद्र यादव, केंद्रीय संघटन मंत्री शिवप्रकाश, आदिवासी विकास मंत्री विजयकुमार गावित, हिना गावित, खासदार गजेंद्र सिंह पटेल, आमदार गणपत वसवा, गुजरात विधानसभेचे माजी सभापती डॉ. निशांत खरे, संपर्कप्रमुख राहुल कुलकर्णी, गणेश ठाकूर, भाजपा अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश अध्यक्ष उत्तमराव इंगळे, महामंत्री सुदर्शन शिंदे, माजी नगरसेविका राजश्री चव्हाण, भाजपाचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल चव्हाण आदी उपस्थित होते.

# फडणवीस यांचा ‘देवाभाऊ’ व्हिडीओ होत आहे प्रचंड व्हायरल

**उपमुख्यमंत्री फडणवीसांवरील ‘देवा भाऊ’ व्हिडीओ लाँच**

**मुंबई दि.२३ सप्टेंबर:**

आधुनिक महाराष्टाचा निर्माता अर्थातच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या व्यक्तिमत्वाला साजेशा असा 'देवा भाऊ' हा मराठी भाषेत बनवलेला ४ मिनिटांचा व्हिडिओ सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.. 'देवा देवा देवा भाऊ' या गाण्यात देवेंद्र फडणवीस अभियंत्यांसोबत कोस्टल रोड ते अटल सेतू, समृद्धी एक्सप्रेस हायवे, मुंबईतील मेट्रोचे विस्तारणारे नेटवर्क आणि इतर पायाभूत सुविधा तसेच मेट्रो संदर्भात प्रकल्पांपर्यंतच्या कामाचे चित्रण या व्हिडीओमध्ये दाखवले आहेत. यामध्ये फडणवीस यांच्या २०१४ ते २०१९ आणि त्यानंतर २०२२ ते आत्तापर्यंतच्या कामांचे चित्रण या गीतामधून करण्यात आले आहे.

या गाण्यात देवेंद्र फडणवीस यांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच परदेशी सेलिब्रिटींसोबतचे व्हिडिओ आणि फोटोही वापरण्यात आले आहेत.अबालवृद्धांमध्ये , तसेच विशेषतः तरूणांमध्ये त्यांची असलेली लोकप्रियता, महाराष्ट्रातील सण उत्सवाप्रति




फडणवीस यांची निष्ठा, वारकरी संप्रदायसाठी त्यांनी केलेलं कार्य, आणि महाराष्ट्राला आधुनिक तंत्रज्ञानाची दिलेली जोड, याचे चितारण या व्हिडिओमध्ये पाहायला मिळते. रात्रंदिन एक लक्ष्य एक ध्यास ज्याचा, देश हाच धर्म प्राण आणि श्वास ज्याचा । राखेतून उठतो अन घेतो भरारी । असे या गीतातील बोल प्रत्येकाच्या आवडणार असेच आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची परंपरा पुढे चालवायची आहे. महाराष्ट्राची शान वाढवावी लागेल, असे या गाण्यातील बोल सूचित करतात. सोशल मीडियावर लोक गाण्याला डीएफ नाव देत आहेत. डीएफ म्हणजे देवेंद्र फडणवीस- आणि देवेंद्र फडणवीस म्हणजे डेव्हलपमेंट फॉरवर्ड. असे म्हटले जात आहे.

४ मिनिटांच्या या गाण्याला देवा भाऊ या नावाने देखील टॅग केले जात आहे. हा व्हिडिओ प्रचंड व्हायरल होत असून लाखो लोक त्याला लाईक करीत आहेत .

महाराष्ट्रात लवकरच विधानसभा निवणूक जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर देवेंद्र फडणवीस यांच्यावर आधारित या गाण्याला प्रचंड महत्व प्राप्त झाले आहे. येत्या निवडणुकीच्या अनुषंगाने फडणवीस यांच्याकडे महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची मोठ्या प्रमाणात जबाबदारी असून ह्या गाण्याचा प्रभाव जनमानसावर आतापासून पडायला सुरुवात झाली आहे, फडणवीस या निवडणुकीतही भाजपचा चेहरा म्हणून कायम आहेत. आधुनिक भारताचे निर्माते अशी उपाधी मिळालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर आधुनिक महाराष्ट्राचे निर्माते म्हणून देवेंद्र फडणवीस यांची प्रतिमा निर्मण झाली आहे. देवेंद्र फडणवीसांना नेहमी टार्गेट करणाऱ्या विरोधकांनीही फडणवीस यांना मिळणाऱ्या लोकप्रियतेचा मोठा धसका घेतला आहे.



# उपमुख्यमंत्री अजित पवार आज सोलापूर जिल्हा दौऱ्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री श्री. अजित पवार हे मंगळवार दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.

दौरा याप्रमाणे : दि.२४ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मैदान हेलिपॅड, करमाळा येथे आगमन. नंतर करमाळा विधानसभा मतदारसंघातील विविध कार्यक्रमास उपस्थिती , सकाळी १०.१५ वा. कमलाई मंदिर येथे आगमन व दर्शन नंतर बाईक रॅलीस सुरवात -स्थळ देवीचा माळ, करमाळा. नंतर तहसिल कार्यालयाचे भूमि पुजन स्थळ मावलाली माळ, करमाळा. नंतर स्वागत समारंभ स्थळ देवळाली ग्रामपंचायत (ता. करमाळा) नंतर हॅम रोड भूमिपूजन स्थळ झरे फाटा ता. करमाळा, दुपारी १२.४० वाजता राधेशाम मंगल कार्यालय, झरे फाटा ता. करमाळा येथे आगमन व जनसन्मान यात्रा लाडक्या बहिणींशी संवाद. त्यानंतर ०१.१५ वाजाता राखीव. दुपारी ०३ वाजता यशवंतराव चव्हाण महाविद्यालय मैदान हेलिपॅड, करमाळा येथे आगमन व हेलिकॉप्टरने बारामती कडे प्रयाण.

अग्रलेख...

# पेजर, वॉकीटॉकीच्या स्फोटामागील गूढ

अँण्ड्रॉईड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजर, वॉकीटॉकी तसेच घरातील सौरऊर्जा प्रणालींमध्ये स्फोट घडवले गेले. एखाद्या संस्थेनी, सरकारी खात्याची, देशाच्या संरक्षण प्रणालीची वेबसाईट हॅक करून गोपनीय माहिती हस्तगत केली जाते तसेच पेजर प्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले गेले, त्यामुळे संपूर्ण जग हादरले आहे. १२ मार्च १९९३ या दिवशी मुंबई महानगरात वर्दळीच्या ११ ठिकाणी झालेले साखळी बॉम्बस्फोट आज आठवतात. एकाच वेळी एकाच शहरात झालेल्या अनेक स्फोटांनी अख्खा देश हादरून गेला होता. अतिरेक्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन; जेवणाच्या डब्यात बॉम्ब ठेवून; टायमरने घडवून आणलेले हे स्फोट आपण समजू शकतो, एक वेळ शत्रुराष्ट्राच्या जमिनीवरून केलेले रॉकेट हल्ले हे आपण समजू शकतो, पण अँण्ड्रॉईड आणि आयफोनसारख्या आधुनिक संपर्क तंत्रज्ञानाच्या युगात वावरत असताना संपूर्ण लेबनॉनमध्ये पेजरसारख्या कालबाह्य डिव्हाईसद्वारे, वॉकीटॉकीद्वारे शेकडो साखळी स्फोट घडवून आणले गेले, हे अनाकलनीय आहे. त्यावर कडी म्हणजे बैरूतच्या अनेक भागांत घरातील सौरऊर्जा प्रणालींचेही स्फोट घडवले गेले. हे स्फोट कोणी आणि कसे घडवून आणले हा लेबनॉनसाठी अभ्यासाचा विषय असला, तरी संपूर्ण जगाच्या आणि खास करून आपल्या देशाच्या दृष्टीने हा गंभीर विषय आहे. काही तज्ज्ञांच्या मते; एखाद्या संस्थेची, एखाद्या सरकारी खात्याची तर कधी देशाच्या संरक्षण प्रणालीची कॉम्प्युटर साईट हॅक करून तिच्या कार्यक्षमतेत अडथळे आणले जातात, महत्त्वाची आणि गोपनीय माहिती हस्तगत केली जाते. त्याप्रकारे पेजर प्रणालीचा ताबा घेऊन हे स्फोट घडवून आणले असावेत. यात तथ्य असेल तर संशयाची सुई आपोआप इस्रायलची गुप्तचर संघटना मोसादकडे वळते. कारण, आज जगातील सर्वात कार्यक्षम गुप्तचर यंत्रणा म्हणून या संघटनेचे नाव घेतले जाते आणि लेबनॉनमधील 'हिजबुल्लाह' या अतिरेकी संघटनेला इस्रायलचे शत्रू मानले जाते. या संघटनेचे अतिरेकी कालबाह्य झालेल्या पेजर प्रणालीचा अजूनही वापर करतात, ही गुप्त माहिती हीच संघटना हॅक करू शकते, असे या तज्ज्ञांचे मत आहे. अवघे जग आज युद्धाच्या रणात इस्रायलचे भय बाळगून आहे. या राष्ट्राने युद्धतंत्रात तसेच शत्रूंचा सूड उगवण्याच्या बाबतीत बरीच मोठी मजल मारली आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातही इस्रायलचे नाव कौतुकाने घेतले जाते. अशा या राष्ट्राने शत्रुराष्ट्राच्या हृदयात धडकी भरेल, अशा पद्धतीने तंत्रज्ञानाचा वापर करत लष्करी कारवाया केल्या आहेत. गेल्या काही वर्षांपासून अरब राष्ट्रे अधूनमधून इस्रायली खोड काढतात, या देशावर छोटे-मोठे हल्ले करतात. मात्र, त्यानंतर त्यांना मोठ्या हल्ल्यांना सामोरे जावे लागते. इस्रायल त्यांना नेस्तनाबूत करणारे उत्तर देतो. गेल्या वर्षी 'हमास' या अतिरेकी संघटनेने इस्रायलवर गनिमी पद्धतीने हल्ला करत अनेक नागरिकांना उचलून नेऊन गाझा पट्टी आणि अन्य प्रांतांमध्ये ओलिस ठेवले. या बदल्यात इस्रायलवर सूड उगवण्याचा त्यांचा प्रयत्न होता. मात्र, हमासला धडा शिकवण्याबरोबरच अशा कृत्यांना पाठिंबा देणाऱ्या लेबनॉनच्या हिजबुल्लाह या अतिरेकी संघटनेलाही इस्रायलने तडाखा दिला. ही संघटना आपल्या देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आणत असल्याचा आरोप करत तिचे अनेक मोहरे टिपायला सुरुवात केली. आपल्या देशाविरुद्ध कट रचणाऱ्यांना धडा शिकवण्याचा एक प्रयत्न म्हणून लेबनॉनमध्ये ठरावीक लोकांकडे असलेल्या पेजर, वॉकीटॉकी किंवा सौरऊर्जा प्रणालींमध्ये स्फोट घडवून आणण्याचे थक्क करणारे कसब इस्रायलने दाखवून दिले आहे. काही तज्ज्ञांच्या मते, पेजर प्रणाली इलेक्ट्रॉनिक डिव्हाईसमार्फत चालते. रेडिओ सिग्नलना मेसेजमध्ये रूपांतरित करणारे तंत्रज्ञान त्यात वापरले गेले आहे. तेव्हा ती डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या प्रणालीसारखी हॅक करणे शक्य नाही. एक गोष्ट निश्चित, हे कृत्य कोणाचेही असले तरी एकाच देशात, एकाच वेळेस पेजर, वॉकीटॉकी आणि सौरऊर्जा प्रणाली या तीन वेगवेगळ्या घटकांमधील तंत्रज्ञान वापरून मानवाने आपल्या सुविधांसाठी लावलेले शोध स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेले. या हल्ल्यांमध्ये टार्गेट केलेली साधने अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरून बनवलेली नाहीत आणि आज त्यांचा वापरही मर्यादितपुरताच होत असलेला दिसतो. आज पेजरची आधुनिक आवृत्ती म्हणून स्मार्टफोन, आयफोन यांचे शोध लागले आहेत. आज बहुतेक व्यक्ती त्यांचा वापर करतात आणि हीच जगाच्या दृष्टीने गंभीर म्हणण्यासारखी बाब आहे. आज आपल्या देशाची लोकसंख्या १ अब्ज ४० कोटींच्या आसपास आहे. किमान ३५ टक्के लोकसंख्या ही डिजिटल डिव्हाईसमार्फत चालणाऱ्या स्मार्टफोनचा वापर करते. अशा स्मार्टफोनना टार्गेट करून हे स्मार्टफोन प्रणाली शत्रुराष्ट्र अथवा अतिरेकी संघटनांकडून अशा पद्धतीने हॅक केली गेल्यास कल्पनाही करवत नाही, अशी भयंकर हानी इथे घडवून आणली जाईल. नव्हे, काही संहारक बुद्धिजीवी या कार्याला लागलेसुद्धा असतील! आजवर भारतात आयएसआयएस, लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिद्दीनसारख्या अतिरेकी संघटनांकडून काश्मीर, दिल्ली, मुंबई, अगदी पुण्यातसुद्धा बॉम्बस्फोट केले गेले. आज अशा घटनांचे प्रमाण अगदी नगण्य झाले आहे. याचे सगळे श्रेय आपल्या गुप्तचर खात्याला जाते. कारण आपल्या हस्तकांमार्फत आणि स्मार्टफोनवर अतिरेक्यांच्या चालत असलेल्या संभाषणाद्वारे, संदेशवहनाद्वारे त्यांचे अतिरेकी मनसुबे आपले गुप्तचर खाते उधळून लावत असते. पण अलिकडच्या काळात लेबनॉनमध्ये होत असलेले साखळी बॉम्बस्फोट ही देशाच्या संरक्षण आणि गुप्तचर खात्यासाठी चिंतेची म्हणावी अशी बाब आहे. एक तर हे स्फोट करण्यामागे कोणाचा हात आहे, ते करत असताना नक्की कोणती प्रणाली वापरली गेली आणि पेजरसारख्या कालबाह्य आणि इलेक्ट्रॉनिक्स डिव्हाईसमार्फत हे कसे शक्य झाले, या गोष्टी गंभीरपणे विचार करायला लावणाऱ्या आहेत. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटरवर हल्ला होऊन त्यांच्या दोन्ही उत्तुंग इमारती जमीनदोस्त केल्या गेल्या. त्यावेळी अतिरेक्यांना विमान चालवण्याचे प्रशिक्षण दिले गेले होते. परदेशी भूमीवर जाऊन नियोजनबद्ध पद्धतीने केले गेलेले ते हल्ले पाहून त्यावेळी दहशतवादाची खाण असलेल्या पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे अतिरेक्यांच्या हाती लागण्याची चिंता व्यक्त केली गेली होती. आज पुन्हा जगाला, खासकरून भारताला त्याच काळजीने ग्रासले असल्यास नवल नाही. लेबनॉनमध्ये स्फोट घडवून आणण्यासाठी वापरले गेलेले अज्ञात तंत्रज्ञान अतिरेकी आत्मसात करू शकले तर आपल्या देशाच्या सार्वजनिक मालमत्तेची आणि मानवी जीवांची अपरिमित हानी घडवून आणली जाईल आणि ते विनाशकारी तंत्रज्ञान अँण्ड्रॉईड स्मार्टफोन, आयफोनमधील प्रणालीला हॅक करून वापरले गेल्यास सगळे जग हादरवून टाकले जाईल. कारण आजच्या आधुनिक युगात घरोघरी स्मार्टफोन वापरले जातात. या स्फोटामागील आधुनिक तंत्रज्ञान लवकरच समोर येईल; ते अतिरेकी संघटनांपर्यंत पोहोचल्यास जगाची काय अवस्था होईल, याची कल्पनादेखील करवत नाही. दोन राष्ट्रांमधील युद्धात हँण्डग्रेनेड, बॉम्ब, क्षेपणास्त्रे यांचा वापर केला जातो. १९३८ मध्ये संहारक अण्वस्त्रांचा शोध लागला. अनेक देश आज अण्वस्त्रसंपन्न झाले आहेत. पण, त्यांचा वापर फक्त अमेरिकेने दोन वेळा केला. आजवर ते तंत्रज्ञान वापरून कोणीही समोरच्या शत्रुराष्ट्राची अपरिमित हानी केली नाही. कारण दोन राष्ट्रांचे आपसात काहीसे संबंध असले, तरी बाह्य जगाला अशा कृतीबाबत उत्तर द्यायची बांधिलकी बहुतेक राष्ट्रे पाळतात. काही राष्ट्रांनी युद्धात रासायनिक अस्त्रांचा वापर केल्याचे आरोप झाले, पण ते तथ्यहीन होते. अतिरेकी कारवायांमध्ये आरडीएक्स, टीएनटीसारखी संयुगे वापरली जातात. त्यांना प्रत्यक्ष हल्ले म्हणता येईल. त्यातून होणाऱ्या हानीची व्याप्ती ठरावीक ठिकाणापुरती मर्यादित असते. लेबनॉनमध्ये स्फोट घडवून आणताना वापरले गेलेले तंत्रज्ञान एका देशाने आपल्या शत्रू अतिरेकी संघटनेविरुद्ध वापरले, असा प्राथमिक संशय आहे. पण हेच तंत्रज्ञान हाती लागल्यास अतिरेकी संघटना त्याचा कुणाविरुद्ध वापर करतील, याची काहीच शाश्वती नाही.

आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# दलाई लामा आणि शी जिनपिंग संघर्षाची नांदी!

चौदावे दलाई लामा (पूर्वाश्रमीचे तेंझिन गियात्सो) हे १४ वे व विद्यमान दलाई लामा आहेत. तिबेटी बौद्ध मतातील गेलुग्पापंथाच्या प्रमुख आचार्यांचा उल्लेख 'दलाई लामा' असा केला जातो. १७ नोव्हेंबर १९५० रोजी चौदाव्या दलाई लामांनी पदाची सूत्रे हाती घेतली. या दलाई लामांनी तिबेटी लोकांच्या हितरक्षणासाठी हयातभर कार्य केले असून १९८९ वर्षीचे शांततेसाठीचे नोबेल पारितोषिक त्यांना प्रदान करून गौरवण्यात आले आहे.

त्यांचे आई-वडील शेतकरी होते. हे कुटुंब इ. स. १९३९ मध्ये दलाई लामांच्या चौथ्या वाढदिवसानंतर आपले छोटेसे खेडेगाव सोडून ल्हासा येथे आले. दलाई लामांच्या निवडीसाठी असलेल्या विविध कसोट्या यशस्वीरीत्या पार केल्यावर २२ फेब्रुवारी १९४० रोजी पो ताला प्रासादात एका विधिपूर्वक समारंभात तेंझिन गियात्सो चौदावे दलाई लामा म्हणून आसनस्थ झाले. त्यानंतर त्यांच्या शिक्षणाला प्रारंभ झाला. त्यांचा धर्मविषयक सखोल अभ्यास सुरू असताना १९५० मध्ये चीनने तिबेटवर आक्रमण केले आणि तिबेट चीनचा भाग असल्याचे घोषित केले. त्याचवेळी तिबेटच्या राजकीय सत्तेची तोपर्यंत दलाई लामांच्या हाती असलेली सर्व सूत्रे चीनच्या हाती आली. यानंतरच्या काळात तिबेटवर चिनी राजवटीचा अनियंत्रित अंमल सुरू झाला. धाक, दडपशाही, जुलूम, जबरदस्ती, छळवणूक, पिळवणूक इत्यादी अत्याचार तिबेटच्या जनतेवर चिनी राज्यकर्त्यांकडून व लष्कराकडून होत होते. भगवान गौतम बुद्धांच्या शांतताप्रिय देशात हिंसाचार, लाठीमार, अश्रुधूर व गोळीबार या अत्याचारांनी परिसीमा गाठली. जनतेच्या सर्व प्रकारांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लादले गेले. परिणामी तिबेटीय कला, संस्कृती व परंपरा यांचा ऱ्हास होत गेला. चीनच्या वाढत्या जाचामुळे व अत्याचारामुळे सुरक्षिततेच्या कारणास्तव दलाई लामांना त्यांच्या कुटुंबीयांसह १९५९ मध्ये तिबेट सोडावे लागले. ते स्वत: भारतात शरण आले तर काही लोक नेपाळ, भूतान व इतरत्र शरण गेले. पं जवाहरलाल नेहरू आणि लामा यांची १९५९ मध्ये मसुरी येथे भेट झाली. आज जगभरातील विविध देशांमध्ये तिबेटीय माणसे निर्वासितांचं आयुष्य कंठत आहेत. त्यातील बहुतांश भारतात आहेत. हिमाचल प्रदेशातील धरमशालात दलाई लामा वास्तव्यास आहेत. येथे त्यांनी लोकशाही मूल्यांच्या तत्त्वावर तिबेटीय निर्वासितांची संसद स्थापन केली आहे. आज ही संसद किंवा निर्वासितांचे सरकार दलाई लामांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली तिबेटच्या स्वातंत्र्यासाठी लढते आहे.

दलाई लामा तिबेट मुक्तीसाठी विविध शांतताप्रिय मार्गांनी झगडत आहेत, आंदोलने करीत आहेत व आपल्यावरील अन्यायाची गाथा जगासमोर हिरिरीने मांडत आहेत. जागतिक स्तरावर तिबेटची बाजू मांडण्यात ते पूर्णपणे यशस्वी झाले आहेत. याच कारणासाठी दलाई लामांच्या शांतताविषयक प्रयत्नांची दखल घेऊन त्यांना १९८९ मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले. देश-विदेशांत धर्म, तत्त्वज्ञान, अहिंसा, जागतिक शांतता, करुणा, मानवी हक्क इत्यादी विषयांवर ते व्याख्याने देत असतात. देश-विदेशांतील अनेक विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डॉक्टरेटची पदवी देऊन गौरविले आहे तसेच विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांनी त्यांना मानचिन्हे व गौरवपत्रे दिली आहेत. आतापर्यंत त्यांनी जगभरातील ६२ देशांना भेटी दिल्या असून अनेक पुस्तके लिहिली आहेत. त्यापैकी 'फ्रीडम इन एक्झाईल' व 'माय लॅण्ड ॲण्ड माय पीपल' ही दोन त्यांची आत्मचरित्रपर पुस्तके आहेत. चीनमधील बौद्ध नेत्यांनी व तिबेटी धर्मगुरूंच्या नेत्यांनी नुकत्याच पार पडलेल्या एका सभेत असा ठराव पारित केला आहे की, दलाई लामांच्यानंतर पुनर्जन्म घेऊन पीठासीन होणाऱ्या धर्मगुरूला चिनी सरकारची मान्यता मिळणे आवश्यक आहे. हा प्रश्न आताच पुढे येण्याचे कारण असे की, दलाई लामा येत्या वर्षात आपल्यानंतरच्या वारशाबाबतची योजना जाहीर करणार आहेत. दलाई लामांचे वय सध्या ८९ वर्षे असून नव्वदीत प्रवेश करताच ते या प्रश्नाला हात घालणार आहेत. दलाई लामा आणि चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यातील येऊ घातलेल्या संघर्षाची ही नांदी आहे, असे राजकीय निरीक्षक मानतात. कारण तिबेटची धार्मिक धोरणे आणि व्यवहार चीनच्या अध्यक्षांच्या पक्षाचे विचार आणि धोरणे यांना अनुसरूनच असला पाहिजे, याबाबत चीन अतिशय आग्रही आहे. चीनचा दलाई लामांवर आरोप आहे की, ते फुटीरतावादी (सेपरेटिस्ट) आहेत. १९८० आणि २००८ मध्ये त्यांनी तिबेटमध्ये असंतोष निर्माण होईल, असा प्रयत्न केला होता. त्यांच्यानंतर तिबेटमध्ये हिंसा आणि तणाव निर्माण होण्याचा धोका आहे. दलाई लामांनी चिनी सरकारच्या पुनर्जन्माबाबतच्या निर्णयाबाबत असहमती दाखविली आहे. त्यांनी आपल्या पुनर्जन्माचा कार्यक्रमच रद्द करण्याचीही तयारी दाखविली होती. असे केल्यामुळे सध्या होत असलेला सरकारी हस्तक्षेप थांबला असता. पण त्यांच्या पुनर्जन्माचा कार्यक्रम झाला पाहिजे आणि तो चिनी कायद्यानुसारच झाला पाहिजे, यावर सरकार अडून आहे. हा विषय अतिशय संवेदनशील आणि जटिल आहे.

माझा पुनर्जन्म मीच ठरवणार, असे तिबेटचे धर्मगुरू दलाई लामा यांचा आग्रह आहे. आपला पुनर्जन्म ठरविण्याचा अधिकार चीनला नाही, असे त्यांनी एका धर्मसंसदेत स्पष्टपणे सांगितले आहे. सध्यातरी आपली प्रकृती ठणठणीत आहे, अशा स्थितीत पुनर्जन्मावर बोलणे घाईचे ठरेल, असे ते मागे एकदा म्हणालेही आहेत. चीनचे साम्यवादी सरकार तिबेटमधील बौद्ध धर्माचे प्रमुख धर्मगुरू दलाई लामा आणि पंचेन लामा यांचे अस्तित्व समाप्त करण्याच्या प्रयत्नात आहे, अशी तिबेटींची समजूत आहे. ही गंभीर बाब असल्याचे लामा म्हणतात. दलाई लामांच्या पुनर्जन्माबाबतची पत्रके त्यांच्या खाजगी कार्यालयामार्फत उपस्थित अनुयायांमध्ये चर्चेसाठी वाटण्यात आली. यावेळी तिबेटच्या आंदोलनात आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या तिबेटींसाठी विशेष प्रार्थनेचे आयोजन केले होते. पुनर्जन्म हा केवळ धार्मिक सिद्धांत नव्हे तर त्यावर जगभरातील विद्यापीठांतील मानसशास्त्रज्ञांनी त्याला ठोस आधार दिला आहे, असे मत निर्वासित तिबेट संसदेचे आचार्य यशी फुंगचूक यांनी व्यक्त केले आहे. तिबेटी बौद्ध धर्मांमध्ये ही अंधश्रद्धा मानली जात नाही तर शास्त्रीय सत्य मानले जाते.

पूर्वीच्या दलाई लामांचे मृतदेह स्तुपाच्या दफनभूमीत दफन केले गेले की त्यांचा आत्मा नवीन अस्तित्वात राहतो, असा तिबेटी लोकांचा विश्वास आहे. तिबेटी भिक्षू पारंपरिकपणे दलाई लामा यांची निवड कर्मकांडाच्या आधारे करतात. या कामासाठी त्यांना अनेक वर्षेही लागू शकतात. १४ वे दलाई लामा १९५९ वर्षीच्या तिबेटमधील अयशस्वी उठावापासून उत्तर भारतीय शहर धर्मशाला येथे निर्वासित म्हणून जीवन जगत आहेत. मध्यंतरी त्यांनी परंपरा बाजूला ठेवून उत्तराधिकारी नेमण्याची शक्यता वर्तवली होती. २०११ मध्ये त्यांनी निर्वासित तिबेट सरकारच्या उत्तराधिकारी या पदाचे राजकीय अधिकार संपवलेही आहेत. चिनी सत्ताधाऱ्यांना त्यांनी गोंधळात ठेवण्याच्या हेतूने अनेक शक्यताही मांडल्या आहेत. पहिली शक्यता अशी की, त्यांचा पुनर्जन्म मुलीच्या स्वरूपातही असू शकेल किंवा त्यांचा आत्मा मृत्यूपूर्वीही दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरात पुनर्जन्म घेऊ शकेल आणि ती एक प्रौढ व्यक्तीही असू शकेल. या चित्रविचित्र संकल्पना सामान्यांच्या कल्पनाशक्तीच्या आवाक्यात नसणार म्हणून याबाबत फार विचार करू नये, हेच बरे. पण संघर्षाचे काय? तो तर आज ना उद्या होणारच!

९४२२८०४४३०

वेध

**नितीन शिरसाट**

# भेसळमुक्त भारत अभियान आवश्यक

सद्य:स्थितीत दूध उत्पादकांच्या दुधाला बऱ्यापैकी दर मिळू लागले आहेत. अशावेळी अज्ञात ठिकाणी काही व्यक्तींकडून भेसळ केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. जास्त दर असणाऱ्या दूध पिशव्यांमध्ये पाणी मिसळणे, इंजेक्शनने भेसळसारखे गैरप्रकार केले जातात. अशा भेसळयुक्त दुधामुळे आजार बळावतात किंवा जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. या गोष्टी अतिशय गंभीर असून, त्यासंदर्भात अत्यंत कडक भूमिका घेण्याची राज्य शासनाची तयारी आहे. या अनुषंगाने आवश्यक उपाययोजना केल्या जातील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधानसभेत दिली. भारतीय समाज हा कायमच आशा-अपेक्षांच्या हिंदोळ्यावर हेलकावत राहिला आहे. अपेक्षांची पूर्ती होवो अगर न होवो रोज नवा दिवस नवी आशा याप्रमाणे तो स्वत:ला ऊर्जितावस्थेत आणत असतो. कधीतरी सकारात्मक बदल घडेल अशा भोळसट व भ्रामक मानसिकतेमध्ये त्याचे जीवन रहाटगाडगे चालू असते. भारतीय जनतेच्या नैमित्तिक आहारात बहुराष्ट्रीय कंपनी विष कालवत आहे व त्याचे दुष्परिणाम, विशेषत: लहान मुलांवर होत आहेत. समाजकल्याण विभागाची वसतिगृहे तसेच आदिवासी आश्रमशाळा यामध्ये लाखो विद्यार्थी शिकत असून त्यांना सडलेले, किडलेले धान्य व भाज्या दिल्या जात आहेत. जनावरेही खाणार नाहीत असे निकृष्ट धान्य पुरवले जात आहे. ज्या कंपन्यांच्या उत्पादनावर अन्य देशांमध्ये बंदी आहे असे खाद्यपदार्थ, सौंदर्यप्रसाधने, औषधे, शेतीची औषधे, कीटकनाशके आपल्या देशात येत आहेत. अनेक वर्षे गोरगरिबांना भेसळ केलेले धान्य दिले जात आहे. यातून योग्य पोषण होत नसल्याने कुपोषितांच्या संख्येत सातत्याने वाढच होत आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या एका ताज्या अहवालानुसार, जगभरातील कुपोषणग्रस्तांच्या यादीत भारत आघाडीवर आहे. ही बाब भूषणावह नक्कीच नाही. असुरक्षित अन्नामुळे लाखो लोकांना विविध आजार होतात आणि दरवर्षी ४ लाख २० हजार लोकांचा मृत्यू होतो, असे जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) जाहीर केले आहे. हवामानातील बदल, लोकसंख्या वाढ, नवीन तंत्रज्ञान, जागतिकीकरण आणि औद्योगिकीकरण यामुळे आमच्या असुरक्षित अन्न प्रणाली वाढत्या आजारांना तोंड देत आहेत. या अन्नामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ७० टक्के मृत्यू पाच वर्षांखालील मुलांमध्ये होतात, असे त्यांनी उघड केले. तीन दशलक्षांहून अधिक लोक सकस आहार घेऊ शकत नाहीत म्हणून समन्वयाने प्रयत्न करण्याची गरज आहे. या जागतिक आव्हानांना तोंड देण्यासाठी अन्न नियामक समुदायाची भूमिका महत्त्वाची आहे. आंध्रप्रदेशच्या जगप्रसिद्ध तिरुपती बालाजी मंदिरातील लाडूंचा प्रसाद बनवण्यासाठी प्राण्यांची चरबी वापरली जाते, असा खळबळजनक आरोप आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केला. त्यांच्या या आरोपामुळे संपूर्ण जगभरात एकच खळबळ उडाली. मात्र, वायएसआर पक्षाने हे आरोप फेटाळून लावले आहेत. लाडूंचा प्रसाद फक्त शुद्ध तुपापासून बनवला जातो, असे वायएसआर पक्षाचे म्हणणे आहे. या आरोप-प्रत्यारोपानंतर बालाजी मंदिरात तब्बल चार तास शुद्धीकरण करण्यात आल्याची माहिती आहे. तिरुपती बालाजीचे मंदिर पुन्हा पवित्र करण्यासाठी विधिवत् शुद्धीकरण केले जात असल्याची माहिती एका वृत्तवाहिनीने दिली आहे. या राजकीय वाचाळ प्रवृत्तीने राजकारणासह संपूर्ण देशभरात मोठी खळबळ उडाली. तिरुपती बालाजीच्या मंदिरातील लाडूंचा प्रसाद येथे दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना दिला जातो. तब्बल ३०० वर्षांपासून ही परंपरा सुरू आहे. या लाडूंची खास गोष्ट म्हणजे ते बरेच दिवस खराब होत नाही. काही दिवस ठेवून तुम्ही ते आरामात खाऊ शकता तसेच त्याची किंमतदेखील १० ते २५ रुपयांपर्यंत आहे. म्हणूनच इथे येणारा जवळजवळ प्रत्येक जण हा प्रसाद घेऊन येतो. देशातील सर्वात श्रीमंत देवस्थान व भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तिरुमला तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळ असल्याचा मुद्दा चांगलाच गाजतोय्. भेसळयुक्त पदार्थांची विक्री होत असल्याचा प्रकार समोर आला आहे. सणासुदीच्या काळात मोठ्या प्रमाणात खाद्यपदार्थांची विक्री होते. याचा फायदा घेऊन अनेक व्यापारी, उत्पादक, विक्रेत्यांकडून फसवणूक होते. ही फसवणूक रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागाने ठिकठिकाणी तपासणी मोहीम राबविली पाहिजे. या तपासणीत दूध, खाद्यतेल, मिठाई, रवा, कणीक, मैदा, खवा, मसाले यांच्यावर विशेष लक्ष केंद्रित करून भेसळमुक्त भारत अभियान राबविणे याला सर्वाधिक प्राधान्य देण्याची गरज आहे.

९८८१७१७८२८

इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# केळींची लागवड : समृद्धीचा आधारवड

देशाच्या एका कोपऱ्यातील कृषी संशोधनाचे लहान-मोठे प्रयोगही अन्य राज्यांतील शेतकऱ्यांसाठी पथदर्शी ठरत असतात. असाच एक केळींच्या लागवडीचा आणि त्याच्या उत्पादनांतून उत्पन्न निर्मितीचा आंध्रप्रदेशातील ग्रामीण स्टार्टअपचा प्रयोग प्रेरणादायी ठरावा. केळी हे फळ आपल्याकडील शेतीच्या संदर्भात परंपरागतरीत्या घेतले जाणारे पीक. संपन्न जीवनसत्त्वांसह सर्वसामान्यांना परवडणाऱ्या अशा या केळीच्या पिकाची लागवड योग्यरीत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना समृद्धीचा मार्ग दाखविणारे म्हणूनही हे पीक प्रसिद्ध आहे. देश-विदेशांतून केळींवर प्रक्रिया केलेल्या उत्पादनांमुळे भारतातील शेतकऱ्यांना समृद्धी लाभली आहे. त्यासाठी ग्रामीण व कृषी स्टार्टअपमुळे केळींची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना या फळांवरील प्रक्रियेद्वारा होणाऱ्या मूल्यवर्धनामुळे समृद्धीची वाट सापडली आहे.

शेतीमध्ये मेहनतीसह जोखीम ही असतेच व केळीच्या शेतीत ती विशेषत्वाने घ्यावी लागते. पाणी-वाऱ्यापासून हवामानातील मोठे बदल वा वादळापर्यंतच्या संकटांना केळीची शेती करणाऱ्यांना तोंड द्यावे लागते. केळीच्या शेतीपासून उत्तम उत्पादन व त्यावर प्रक्रिया करून विविध पदार्थांची निर्मिती व त्यातून प्रगत व्यवसाय केले जातात. आंध्रप्रदेशातील ग्रामीण व कृषी स्टार्टअपसह राज्याच्या केळी उत्पादन क्षेत्रातील पुलिवेंदुला केळी उत्पादन समूहाचे उदाहरण यासंदर्भात प्रामुख्याने देता येईल. पुलिवेंदुला कृषी स्टार्टअपचा मुख्य उद्देश कृषी व कृषी उत्पादन क्षेत्रातील नव्या पद्धती व तंत्रज्ञानाचा फायदा शेतकरी व कृषी उत्पादकांनी वैयक्तिक वा सहकारी पद्धतीने उपलब्ध करून शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हा होता. यासाठी प्रयत्नांच्या पुढील टप्प्यात स्टार्टअपच्या प्रयत्नांना कृषी उत्पादनातील नवे प्रयोग, संशोधन, कृषी मालाची साठवण, वाहतूक व विक्री यांचा समावेश करण्यात आला. पुलिवेंदुला कृषी स्टार्टअपचे एक उत्साही व प्रयत्नशील असणारे संचालक स्वपन सिद्धार्थ यांचे नेतृत्व व प्रयत्न यांना प्रगतीची दिशा मिळत गेली. 'शेतीतून समृद्धी' या विकासमंत्राने प्रेरित होऊन स्वपन सिद्धार्थ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आपले प्रयत्न सुरू केले. त्यामध्ये प्रामुख्याने कृषी क्षेत्रातील गरजांनुसार केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी विशेष प्रयत्नांना प्राधान्यतत्त्वावर घेण्यात आले. त्यामागे या शेती आणि शेतकऱ्यांसाठी सर्वांगीण प्रगती करण्यावर सुरुवातीपासूनच भर दिला गेला.

आपल्या प्रयत्नांच्या पाठपुराव्यासाठी स्वपन सिद्धार्थ यांनी 'आंध्रप्रदेश फूड प्रोसेसिंग सोसायटी'शी संपर्क साधला. त्यानंतर सरकारच्याच 'स्फूर्ती' म्हणजेच 'फंड फॉर रि-जनरेशन ऑफ ॲडिशनल इंडस्ट्रीज' या विशेष योजनेंतर्गत हैदराबादच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मायक्रो स्मॉल ॲण्ड मीडियम इंडस्ट्रीज'कडे केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भातील आपला प्रस्ताव मांडला. त्यांच्या या प्रस्तावाची मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे, त्यामध्ये केळी उत्पादन व उत्पादकांचा समग्र व व्यावसायिकदृष्ट्या संपूर्णपणे विचार केला होता. या नव्या व नावीन्यपूर्ण प्रस्तावामुळे स्वपन सिद्धार्थ यांच्या प्रकल्प प्रस्तावाला एमएसएमई मंत्रालयातर्फे 'स्फूर्ती योजने'अंतर्गत ३.६१ कोटींचे अर्थसाहाय्य लगोलग मंजूर करण्यात आले. याशिवाय 'आंध्रप्रदेश फूड प्रोसेसिंग सोसायटी'ने १० टक्के अतिरिक्त रक्कम व त्याशिवाय केळी उत्पादकांच्या स्टार्टअपसाठी दीड कोटी रुपये मंजूर केले. प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील या राशीचा उपयोग मुख्यत: कृषी स्टार्टअपची नोंदणी-पंजीकरण, याशिवाय ग्रामीण भागातील व कृषी क्षेत्रावर आधारित स्टार्टअपला सुरुवातीचे व महत्त्वपूर्ण असे पाठबळ देण्यासाठी करण्यात आला. याच पाठबळामुळे सुरुवातीला ८२३ केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या पुलिवेंदुला केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या ग्रामीण स्टार्टअपची भक्कम सुरुवात झाली. या केळी उत्पादक शेतकऱ्यांच्या स्टार्टअपची स्थापना आंध्रप्रदेशच्या कडप्पा जिल्ह्यात ४ ऑक्टोबर २०२३ रोजी करण्यात आली. यातूनच राज्यातील केळी उत्पादक व प्रक्रियेशी संबंधित शेतकऱ्यांना सर्वांगीण प्रगतीचा नवा मार्ग लाभला, असेच म्हणावे लागेल. केळीच्या संदर्भात 'केळीतून समृद्धी' या मूलभूत उद्दिष्टासह काम करणाऱ्या या प्रकल्पासाठी केंद्र सरकारच्या राष्ट्रीय केळी संशोधन केंद्राचे सहकार्य प्रामुख्याने घेण्यात आले. यातून केळी उत्पादक शेतकऱ्यांना अधिक संशोधन व विकासासह काम करण्यासाठी केळी संशोधन केंद्राच्या माध्यमातून मार्गदर्शनाची सोय झाली व शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रलंबित समस्येचे निराकरण झाले. केळी संशोधन केंद्राच्या सहकार्याने पुलिवेंदुला केळी उत्पादक कृषी केंद्राच्या माध्यमातून व ग्रामीण स्टार्टअप मुद्यांचा उल्लेख करता येईल.

**संशोधन व विक्री** : परंपरागतरीत्या शेतकरी अथवा त्यांच्या संस्थांच्या माध्यमातून केळींची विक्री करण्याच्या जोडीलाच केळींच्या इतर प्रकारांचा संशोधनाअंती शोध घेण्यात आला. सुरुवातीला वाळवलेल्या व कोरड्या केळींच्या विक्रीची सुरुवात करण्यात आली. अशी सुकलेली केळी विशेषत: दुर्गम भागात काम करणाऱ्या सैन्य दलातील शिपायांसाठी विशेष उपयुक्त ठरली. यातूनच पुढे वाळलेल्या केळींना मधाच्या आवरणाचा प्रयोग केला गेला. वाढत्या व्यवसायासह वाढीव उत्पन्नासाठी हे दोन्ही प्रयोग उपयुक्त ठरले.

**केळीची पावडर** : पिकल्या केळीच्या गराला वाळवून व नंतर त्यावर प्रक्रिया करून केळीची पावडर बनविण्यास सुरुवात झाली. या पावडरला विविध बाजार क्षेत्रातून प्रसंगी निर्यातीसाठी मागणी असते. विशेषत: केक, चॉकलेट, मिठाई उद्योगात या पावडरचा वापर होतो. ही बाब अनुभव व प्रशिक्षणासह पुलिवेंदुला केळी उत्पादन-प्रक्रिया स्टार्टअपच्या सदस्यांना प्रशिक्षित केल्याने स्थानिक केळी उत्पादकांना बहुविध लाभ मिळाले.

**केळीपासून कापड** : केळीच्या खांबाचे तरल आवरण व कोवळ्या भागापासून उत्तम मऊसर कापड बनविले जाऊ शकते. हे कापड खरेदी करणाऱ्यांना पूर्णपणे नवे व नवलाईचे वाटते. ही बाब स्थानिक केळी उत्पादक शेतकऱ्यांना लक्षात आली व त्यांनी त्याचा अवलंब करण्यास सुरुवात केली. आज आंध्रातील नक्षीसह असणाऱ्या रेशमी कपड्यांच्या जोडीलाच केळीचे नक्षीकाम असणारे कापड विकले जाते. पहिल्या टप्प्यातच स्टार्टअपसह काम करणाऱ्या केळी उत्पादक शेतकऱ्याला एकरी सुमारे दहा हजार रु. अतिरिक्त उत्पादन मिळू लागले.

**केळीच्या पानाच्या प्लेट आणि कप** : केळीच्या पानांचा उपयोग भोजनासाठी विशेषत: दक्षिणेतील राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणात होतो. प्रसंगी सजावटीसाठीसुद्धा त्याचा वापर केला जातो. मात्र, पिकलेल्या अथवा वाळलेल्या केळीच्या पानांपासून खाद्यपदार्थ व भोजनासाठी प्लेट्स आणि चहा-कॉफी पिण्यासाठी कप बनविण्यास चालना देण्यात येऊन सदस्य शेतकऱ्यांसाठी उत्पादन-उत्पन्नाचे एक नवे दालन लाभले. एरवी दुर्लक्षित असणाऱ्या वा परंपरागत पद्धतीने वा चाकोरीबद्धपणे करण्यात येणाऱ्या केळीच्या शेतीला कल्पक व नावीन्यपूर्ण प्रयत्नांसह संशोधन व प्रगत तंत्रज्ञानाची जोड देऊन केळीच्या बागेच्या वहिवाटीतून समृद्धीची वाट दाखविण्याचे मोठे काम पुलिवेंदुला केळी उत्पादक केंद्राने केले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## चिकनगुनिया, डेंग्यूचा प्रादुर्भाव

सध्या दमट हवामानामुळे सर्वत्र अनेक रोगांचा प्रादुर्भाव संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येत आहे. या दिवसात दरवर्षी कमी-अधिक प्रमाणात रोगराई दिसून येते. परंतु यावर्षी तर कहर झाला आहे. प्रत्येक घरात एक तरी रुग्ण आढळतो आहे. चिकन गुनियाची टेस्ट निगेटिव्ह आल्यानंतर संपूर्ण लक्षणे त्याचीच असतात. यावर्षी अनेक प्रकारांनी रुग्ण ग्रासले आहेत. जसे थंडी वाजून ताप येणे, सांधेदुखी, सांधे सुजणे, वेदनादायक हालचाल, डोकेदुखी, पुरळ येणे, मळमळ, उलट्या अशी वेगवेगळी लक्षणे आहेत. या प्रकारच्या तापात नंतर बरेच दिवस अत्यंत थकवा जाणवत राहतो. यात महिला, पुरुष, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक सगळेच पीडित आहेत. महापालिकेकडून सर्वत्र सर्वेक्षण, कीटकनाशक फवारणी तसेच इतर उपाय काही भागात सुरू आहेत, परंतु ते अपुरे पडताहेत आणि रुग्णांच्या संख्येत वाढ होत आहे. सांधेदुखीचा असर तर एक-दोन महिनेपर्यंत जाणवतो. यावर अहवालानुसार विशिष्ट उपचार उपलब्ध नाहीत. त्यामुळे लक्षणांनुसार उपचार केले जातात आणि वेदनादायी औषधं घेऊन रुग्णांना आराम करण्याचा सल्ला डॉक्टर देत आहेत. याचा लवकर नायनाट होवो.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

## प्रतिमा स्वच्छ करण्याचा प्रयत्न

दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी यांनी अरविंद केजरीवाल यांचे उत्तराधिकारी म्हणून पदभार स्वीकारला. परंतु नाटके करण्यात पटाईत असलेल्या आप पार्टीने त्यांच्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीऐवजी दुसऱ्या खुर्चीची व्यवस्था करून त्यांची तुलना श्रीराम यांचे बंधू भरत याच्याशी करून स्वतःचे हसे करून घेतले. श्रीराम वनवासात असताना भरताने श्रीरामाच्या पादुका राजसिंहासनावर आरूढ करून राज्यकारभार सांभाळला होता. हा आदर्शवाद कुठे आणि आतिशी कुठे? वस्तुत: फक्त ४ महिन्यांकरिता हे पद असून, तोपर्यंत भ्रष्टाचार लिप्त खुर्चीवर बसून त्याची लागण होऊ नये या विचाराने आतिशी यांनी आपली प्रतिमा स्वच्छ करण्याचे नाटक सुरू केले असावे, असे वाटते.

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

वाचक पत्रे

## 'त्या' जिल्हा सहकारी बँकांवरही कारवाई व्हावी

यवतमाळ येथील बाबाजी दाते महिला सहकारी बँकेत झालेल्या घोटाळ्यात कर्मचारी व काही संचालकावर कारवाई होताना दिसत आहे. अशा प्रकारच्या कारवाया त्वरित व्हायला पाहिजे. म्हणजे अन्य दुसऱ्या कुठल्याही बँकांमध्ये किंवा सहकारी सोसायट्यांत असे प्रकार होणार नाहीत आणि जनतेचा पैसा सुरक्षित राहील. इथपर्यंत सर्व ठीक आहे. कायदा व त्याची अंमलबजावणी सगळ्यांकरिता सारखी व्हायला पाहिजे. परंतु असे होताना दिसत नाही. आता दाते महिला सहकारी बँकेचे संचालक मंडळ काँग्रेसशी संबंधित नसावे म्हणून कदाचित यांच्यावर कडक कारवाई झालेली दिसते, तसे व्हायलाच पाहिजे, परंतु तीन जिल्हा सहकारी बँका बुडाल्या त्यांच्यावर कुठलीच कारवाई झाली नाही. दोन्हीकडे कायद्याची समान अंमलबजावणी व्हावी. कारण जिल्हा सहकारी बँकेचे संचालक काँगेसशी संबंधित असल्यामुळे कारवाई झाली नाही हे म्हणण्यास वाव आहे. दाते महिला बँकेसारखी कारवाई जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकांवर व्हावी तेव्हा कायदा सर्वांकरिता सारखा आहे असे म्हणता येईल. बरं यांच्यावर कारवाई न झाल्यामुळे ही घोटाळेबाज मंडळी मोकाट फिरत आहे, एवढेच नाही तर स्वतःचे वाढदिवस मोठ्या प्रमाणावर साजरे करीत आहे व या कार्यक्रमाला मंत्री देखील हजेरी लावताना दिसतात. हा तर निर्लज्जपणाचा कळसच म्हणावा लागेल. या बँकेच्या ठेवीदारांनी आपल्या रकमेसाठी प्रयत्न करावे, ही विनंती आहे.

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

## वास्तवातील प्रगती आणि धर्मरक्षण




न्यू यॉर्कमधील भारतीय वेळेनुसार २२ सप्टेंबरच्या रात्री १० वाजता अर्थात अमेरिकेतील दुपारी १२.३० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत पाहिल्यानंतर भारतीयांची मान उंचावल्याशिवाय राहात नाही. पण हा सर्व सन्माननीय प्रसंग मराठी वाहिन्यांना दाखविणे लज्जास्पद का वाटावे, हा गंभीर विषय वाटतो. सर्व हिंदी वाहिन्यांनी मोठ्या दिमाखात हा वृत्तांत सादर केला यासाठी त्यांचे अभिनंदन. संपूर्ण जग ज्यांचा सन्मान करते त्यात काही तथ्य असते म्हणूनच. केवळ थापाथापी करून, बेरोजगारी आणून आणि भ्रष्टाचाराने प्रसिद्धी, मानसन्मान कधीच मिळत नाही; तर देशाची प्रगती, विकास कार्ये आणि धर्मरक्षणातूनच देशाचा विकास घडतो आणि सन्मान प्राप्त होतो. तो सन्मान करणारी जनता मुळीच मूर्ख नाही. विरोधाला विरोध याच ध्येयांनी जे कोणी पछाडले असतील त्यांनी यातून बोध घेण्याची नितांत गरज आहे असे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# शेतकऱ्यांच्या संस्था मोडीत काढू नका

## खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांचा सल्ला




**तभा वृत्तसेवा,**
**सदशिवनगर, दि. २३ सप्टेंबर-**
महाराष्ट्रातील सहकारी संस्था या शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या घामातून उभा राहिल्या आहेत. संस्था बंद पडली तर काय होते हेही महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी, कामगारांनी पाहिले आहे. सध्या राज्यात विधानसभेचे वारे वाहू लागले आहे. प्रत्येकाला आमदारकीची स्वप्ने पडू लागली आहेत. स्वत:च्या स्वार्थासाठी शेतकऱ्यांच्या या संस्था मोडीत काढू नका, असा मौलिक सल्ला खा. धैर्यशील मोहिते-पाटील यांनी दिला.

सदाशिवनगर येथील श्री शंकर सहकारी साखर कारखान्याची ५५ वी वार्षिक सर्वसाधरण सभा चेअरमन आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या झाली, यावेळी ते बोलत होते. प्रारंभी कारखान्याचे जनरल मॅनेजर रवींद्र जगताप यांनी अहवाल वाचन केले. त्याला सभासदांनी मंजुरी दिली.

खा. धैर्यशील मोहिते-पाटील म्हणाले, रणजितदादांच्या कडकशिस्तीत कारखाना प्रगतिपथावर आहे. २००९ पासून जिल्ह्यातील राजकारणाची दिशा बदलली आहे. सध्या जिल्ह्यात आमदारकीसाठी स्पर्धा लागली आहे. शेतकऱ्यांच्या संस्था टिकल्या पाहिजेत. राजकारणासाठी कोणी शेतकऱ्यांची संस्था मोडीत काढत असेल तर शेतकऱ्यांनी त्यांना त्यांची जागा दाखवावी असे सांगून २९ सप्टेंबर रोजी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा अकलूज येथे नागरी सत्कार आयोजित केला असून हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन त्यांनी केले.

आ. रणजितसिंह मोहिते-पाटील म्हणाले, संस्था टिकली तर शेतकरी, कामगार टिकेल. सहकार महर्षिंनी उभा केलेल्या संस्था टिकविण्यासाठी विजयदादांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत. श्री शंकर सहकारीसाठी केंद्र व राज्य सरकारने ११३ कोटीची मदत केली. अडीच हजार टनी साखर कारखाना आता सात हजार टनी करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. त्यासाठी १७० कोटीची गुंतवणूक करावी लागेल. ११० कोटी वित्तीय संस्थाकडून तर ६० कोटी कारखान्याकडून गुंतवणूक करावी लागणार आहे. पुढील ८ वर्षे दुष्काळ पडला नाही तर कारखाना कर्जमुक्त होईल असे सांगून सभासदांना १८ रुपये किलो दराने दहा किलो, ज्या शेतकऱ्यांनी कारखान्याला उस घातला आहे, त्यांना साडेसात किलो तर इतर शेतकऱ्यांना पाच किलो दिवाळीसाठी साखर दिली जाणार आहे. सध्या जिल्ह्यात दराची स्पर्धा लागली आहे. श्री शंकर सहकारीचा एफआरपी दर २१८२ रुपये बसतो आहे. तरीही आपण २६०० रुपये दर दिला आहे. आता ५० रुपयेचे बील उस उत्पादकांच्या खात्यावर जमा होईल. दिवाळीला आणखी काही करता येते का? ते पाहू, असे सांगितले. या वार्षिक सभेस माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, व्हाईस चेअरमन ॲड. मिलिंद कुलकर्णी, ॲड. प्रकाश पाटील, रामचंद्र सावंत-पाटील, दत्तात्रय भिलारे, बाबाराजे देशमुख, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, एक्झिक्युटर डायरेक्टर स्वरुप देशमुख, कार्यकारी संचालक अभिजीत डुबल यांच्यासह संचालक, सभासद व कामगार उपस्थित होते.

### लवकरच ७५० कोटी उलाढाल होणार : मोहिते-पाटील

२०२४-२५ च्या गळीत हंगामात १८ ते ७० वयोगटातील सभासदांचा एक लाख अपघाती विमा काढणार असल्याचे ते म्हणाले. श्री शंकर सहकारी साखर कारखान्याची वार्षिक उलाढाल ४०२ कोटींची आहे तर संस्थेची मालमत्ता ही ५५० कोटीची आहे, ती भविष्यात ७५० कोटी होईल असा विश्वास व्यक्त करुन ऊस उत्पादकांनी चालू गळीत हंगामात कारखान्यास गाळपास ऊस द्यावा असे आवाहन आ. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

## निधन वृत्त...

### सुरेश घाडगे



**श्रीपूर, दि. २३ सप्टेंबर**
येथील सुरेश बापू घाडगे (वय ७२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. ते ब्रिमा सागर महाराष्ट्र डिसटलरीचे सेवानिवृत्त कामगार होत. राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) पक्षाचे युवा पदाधिकारी संदीप घाडगे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सून, नातवंडे असा परिवार आहे.

### मयुरेश पाटील



**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**
उत्कर्ष नगर येथील मयुरेश मोहनराव पाटील (वय ३१) यांचे आकस्मित निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, बहीण, पत्नी आणि एक मुलगी असा परिवार आहे.

## नावात बदल

माझे जुने नाव - **रेहान अ. हमीद चौधरी** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **रेहान अब्दुल हमीद चौधरी,** (पत्ता- चौधरी, मार्केट गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर पिन कोड- ४१३ ४०२) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.
**शपथ पत्र नं. २४१०/२०२४**
**दि. १६/०८/२०२४**

## CHANGE IN NAME

I HAVE DECLAIRED THAT MY OLD NAME IS **REHAN A HAMID CHOUDHARI** HAS BEEN CHANGE TO NEW NAME IS **REHAN ABDUL HAMID CHOUDHARI** (R/O CHOUDHARI, MARKET GALLI, VAIRAG, TAL.- BARSHI, DIST.- SOLAPUR- 413 402) KINDLY NOTE THE SAME.
**AFFIDAVIT NO. 2410/2024**
**DATE : 16/08/2024**

## CHANGE IN NAME

I hereby declare that my old name **Bharati Vijayanand Aralelimath** has been changed to New name **Suma Vijayanand Aralelimath**.
R/o-post - Block No.6, Vaman Nagar Solapur
**(Affi. no. 8907)**
**Date - 11/12/2021**

## Classifieds

**शेतीविषयक**

**नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार : १८ ते २२ हजार महिना जोडीला.**
**संपर्क**
**9922004242**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## जाहिर प्रसिध्दीकरण

दि. कि. अर्ज नं. १५/२०२४

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डी. यांचे कोर्टात**

सिध्दीविनायक महेश थोरात वगैरे -- अर्जदार
रा.जेऊर रोड समता नगर अक्कलकोट
विरुध्द
कोणीही नाही -- सामनेवाले

ज्या अर्थी वरील अर्जदाराने या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. १५/२०२४ हा दि. बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल केला असून अर्जदार क्र. १ व २ चे वडील व अर्जदार नं. ३ चे पती महेश महादेव थोरात हे दि. २२/०३/२०२३ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार हेच कै. महेश महादेव थोरात यांचे कायदेशीर वारस असल्याने तसा वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. महेश महादेव थोरात यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक ८/११/२०२४ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जांवर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल.

हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. २३/०९/२०२४

**सही**
**आज रोजी मे. कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे माझ्या सहीने प्रसिध्द केले**

**शिक्का**

**सही**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**अक्कलकोट**

## दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि., पंढरपूर
## शाखा : बार्शी

### नोटीस

आमचे बँकेचे मयत सभासद, ठेवीदार व कर्जदार प्रेमलता प्रकाश जिरंगे राहणार बार्शी या नावावर मुदत ठेव खाते असून सदर खात्याला वारस हक्काने नांव दाखल करणेबद्दल मयताचे वारसापैकी त्यांचा मुलगा अर्जदार प्रविण प्रकाश जिरंगे यांनी बँकेकडे विनंती अर्ज केला आहे. या विनंती अर्जाप्रमाणे अर्जदाराचे नांव वारस हक्काने दाखल करणेस अन्य वारसांनी लेखी संमत्या दिलेल्या आहेत. तरी सदर मयतास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध केले तारखेपासून सात दिवसांचे आत बँकेकडे लेखी कळवावे. सदर मुदतीत कोणाची कसल्याही प्रकारची लेखी तक्रार न आल्यास अर्जदार यांनी अर्जात नमूद केले व्यतिरिक्त अन्य कोणी वारस, हक्कदार, मृत्यूपत्र चालविणारे वगैरे कोणी नाहीत असे समजून मयताचे नावावरील वर नमूद केलेल्या मुदत ठेव खात्यास अर्जदार प्रविण प्रकाश जिरंगे यांचे नांव वारस हक्काने दाखल करणेत येईल. मागाहून कोणाची कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही. कळावे !

पंढरपूर
तारीख : ०९/०९/२०२४

सही/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
दि पंढरपूर अर्बन को-ऑप. बँक लि.,पंढरपूर

## जाहीर नोटीस

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**जन्म-मृत्यू प्रकरण अर्ज क्र. १७३/२०२४**

**१) रत्नाबाई सुबराव वाघमारे,**
रा. वाकड, पुणे आ. मु. उक्कडगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर
(असल्यास, तर्फे वकील सुरवसे ए.व्ही.) — **अर्जदार**

**- विरुद्ध -**

**२) जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा ग्रामसेवक,**
ग्रामपंचायत, उक्कडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचा मुलगा संजय सुबराव वाघमारे, रा. वाकड, पुणे आ. मु. उक्कडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचा मौजे उक्कडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी दिनांक ०१ मे १९८८ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचा मुलगा संजय सुबराव वाघमारे यांचा दिनांक ०१ मे १९८८ रोजी मौजे उक्कडगाव, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिद्धीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २५ जून २०२४ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्क्यानिशी दिली.

(गोल शिक्का)

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी,**
बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः सोलापूर येथील रहिवाशांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन - जिल्हा व उपजिल्हा सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भाग मजरेवाडी येथील मिळकत यासी जुना सर्व्हे नं. २७८/१+२+३ आणि २७९/१+२ यासी नवीन सर्व्हे नं. १५०/१+२+३ व १५१/१+२ यापैकी प्लॉट नं. २२ ते २५ व २६ ते २९, सब प्लॉट नं. बी-३+बी-४ यावर श्री गुरुकृपा अपार्टमेंट या नावाने बांधकाम केलेल्या इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील सदनिका / फ्लॅट नं. एस-२ याचे बांधकाम क्षेत्र ५२.७१ चौ.मी. ही सदनिका, यासी चतुः सिमा- पूर्वेस- बॅक साईड ओपन स्पेस, दक्षिणेस- साईड ओपन स्पेस, पश्चिमेस फ्लॅट नं. एस-३ व उत्तरेस - स्टेअरकेस ब्लॉक,

येणेप्रमाणे चतुः सिमेतील सदनिका ही श्री. श्रीकृष्ण हरी देशपांडे व सौ. शैलजा श्रीकृष्ण देशपांडे यांचे खरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची असून, त्यांनी सदरहू सदनिका/फ्लॅट आमचे अशिल शशिकांत बगलप्पा बनसोडे यांना खरेदी देण्याचे ठरविले आहे. तसेच सदरहु मालकांनी सदरहू सदनिका ही निर्वेध व निजोखमी असल्याची हमी व खात्री आमचे अशिलांना दिली आहे.

तरी परंतु सदर सदनिकेवर अन्य कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, पोटगी, खरेदी-विक्री व इतर स्वरुपाचे करार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत आपले हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर आणून देऊन खात्री करून द्यावी. जर मुदतीत कोणाची हरकत न आल्यास सदरील सदनिका ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांनी सदर सदनिकेचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. २३/०९/२०२४

**सही**
**ॲड. अभिषेक मधुकर बुगडे**
**ऑफिस- ३६८बी, किसान संकुल, विडी घरकुलजवळ, सोलापूर**
**मो.नं. ८६६८७३९६०२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी ४१३४०१

**Email ID : am_barshi@msamb.com फोन : ०२१८४- २२२९७६**

### जाहीर प्रसिध्दीकरण

**निविदा सुचना सन २०२४-२०२५**

या जाहिर प्रकटनाद्वारे शहरातील संस्था / व्यक्ती / ठेकेदार / सर्व्हिस प्रोव्हायडर यांना कळविण्यात येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती बार्शी व उपबाजार आवार वैराग येथील स्वच्छता करणेकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदरचा प्रस्ताव हा बार्शी व उपबाजार वैरागसाठी स्वतंत्र सादर करावेत.

सदरचा प्रस्ताव शासन परिपत्रक जा.क्र. कृपमं/बा.स./बाजार आवार स्वच्छता/९८९८/२०१८ दि.२७/०७/२०१८ च्या मार्गदर्शन सुचनेप्रमाणे स्वच्छता करणेचे आहे. सदरची स्वच्छता करणेसाठी आवश्यक ती साधन साहित्य, यंत्र सामुग्री, वाहणे व मनुष्यबळ यांचा सर्वकष विचार करुन एकूण किती रक्कमेला स्वच्छता करुन देणार याचा सर्व करासह एकत्रित भरावा. या संबंधातील संपूर्ण माहिती कृषि उत्पन्न समिती बार्शी यांचे कार्यालयात कार्यायीन वेळेत उपलब्ध आहे. ठेकेदारांनी दोन्ही ठिकाणाची पाहणी करुन सर्व बाबीचा विचार करुन दर ठेकेदाराने त्यांच्या लेटर पॅडवर भरण्याचे आहेत. निविदा स्विकारणे किंवा नाकारणेचे अधिकार कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी यांना राहतील.

| अ. क्र. | कामाचा तपशील | बयाणा रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|
| १ | कृषि उत्पन्न बाजार समिती, बार्शी आवाराती स्वच्छता करणे (प्रती महिना दर रुपये) | रु. १०,०००/- बयाणा रक्कमेची पावती जोडावी | आदेशापासून एक वर्षापर्यंत |
| २ | उपबाजार आवार, वैराग येथील स्वच्छता करणे (प्रति महिना दर रुपये) | रु. १०,०००/- बयाणा रक्कमेची पावती जोडावी | आदेशापासून एक वर्षापर्यंत |

निविदा स्विकृती दिनांक ३०/०९/२०२४ दुपारी ०४.३० वाजेपर्यंत

**टिप :- १) सदर प्रस्तावास महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनिमय १९६३ नियम १९६७ व अनुषंगिक कायदे बंधनकारक राहतील.**
**२) वरील कामाचे संबंधाने निर्धारीत केलेल्या अटी, शर्ती व निकष बंधनकारक राहतील.**

**सही/-** **सचिव** | **सही/-** **मुख्य प्रशासक**

**कृषी उत्पन्न बाजार समिती, बार्शी**

## अुत्तम सेवा — मंगळवार दि. २४ सप्टेंबर २०२४ — नोकरीच्या शोधात

**उमेदवारांसाठी अत्यंत महत्त्वाची सूचना- खालील विविध स्पर्धा परीक्षांचे फॉर्म योग्य त्या विहीत नमुन्यात नसल्यास रद्द होऊ शकतात. तरी हे टाळण्यासाठी नोकरीविषयक स्पर्धा परीक्षा फॉर्म विक्रीचे सोलापुरातील एकमेव, अचूक फॉर्म विक्री केंद्र, अुत्तम सेवा, पार्क चौक, सोलापूर येथूनच फॉर्म खरेदी करावेत व संभाव्य नुकसान टाळावे.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| १) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| | १) लिपीक (२०२२ पदे) | बारावी (५०%) गुणांसह उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | २०/१०/२४ |
| | २) अकौंट क्लर्क (३६१ पदे) | बारावी (५०%) व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| | ३) कनिष्ठ लिपीक (९९० पदे) | बारावी (५०%) व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३३ पर्यंत | |
| | ४) ट्रेन क्लर्क (७२ पदे) | बारावी (५०%) गणांसह उत्तीर्ण असावे | ३३ पर्यंत | |
| २) | **बृहन्मुंबई महानगरपालिका** | | | |
| | लिपीक (१८४६ पदे) | पदवी व इंग्रजी-मराठी टायपिंग उत्तीर्ण | ३८ पर्यंत | ११/१०/२४ |
| ३) | **रेल्वे रिक्रुटमेंट सेल, RRC** | **(ॲप्रेंटिस करण्याकरिता)** | | |
| | ॲप्रेंटिस (५०६६ पदे) | दहावी व ITI (इले./इलेक्ट्रॉ/फिटर/वेल्डर/टर्नर/पेंटर/मशिनिस्ट/डिझेल/मोटार/वायरमन/एसी/प्लंबर) उत्तीर्ण | २४ पर्यंत | २२/१०/२४ |
| ४) | **बृहन्मुंबई महानगरपालिका** | | | |
| | निरीक्षक (१७६ पदे) | पदवी व मराठी-इंग्रजी टायपिंग तसेच MS-CIT उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | १९/१०/२४ |
| ५) | **अन्न व औषध प्रशासन विभाग, FDA** | | | |
| | वरिष्ठ तांत्रिक सहा. (३७ पदे) | पदवी (फार्मासी) उत्तीर्ण असावे | ३८ पर्यंत | २२/१०/२४ |

**✻ मोफत सरकारी अपडेट ✻**
**सर्व सरकारी नोकरींचे व स्पर्धा परिक्षांचे अपडेट आपल्या व्हॉटस्‌ॲपवर मोफत मिळविण्याकरिता ९७६३७४१९९१ या नंबरला ''जॉईन'' असा मेसेज व्हॉटस्‌ॲप करावा.**

| अ. क्र. | ज्या कार्यालयात पद आहे त्या कार्यालयाचे नाव | शैक्षणिक/तांत्रिक अर्हता पदनाम व अनुभव | वयोमर्यादा (वर्षात) | अर्ज भरण्याची अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ६) | **रेल्वे रिक्रुटमेंट बोर्ड, RRB** | | | |
| | १) तिकीट सुपरवायझर (१७३६) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | १३/१०/२४ |
| | २) ट्रेन मॅनेजर (३१४४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ३) स्टेशन मास्तर (९९४ पदे) | पदवीधर स्त्री/पुरुष उमेदवार असावे | ३६ पर्यंत | |
| | ४) टायपिस्ट (१५०७ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| | ५) वरिष्ठ लिपीक (७३२ पदे) | पदवी व इंग्रजी टायपिंग उत्तीर्ण | ३६ पर्यंत | |
| ७) | **स्टाफ सिलेक्शन कमिशन, SSC** | | | |
| | कॉन्स्टेबल GD (३९४८१ पदे) | दहावी उत्तीर्ण स्त्री/पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | १०/१०/२४ |
| ८) | **केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल CISF** | | | |
| | १) कॉन्स्टेबल (११३० पदे) | बारावी (शास्त्र) उत्तीर्ण पुरुष उमेदवार | २३ पर्यंत | ३०/०९/२४ |
| ९) | **स्टेट बँक ऑफ इंडिया SBI** | | | |
| | १) सहा. प्रबंधक (७९८ पदे) | B.E./ B.Tech (कॉम्प्यु/आय टी/इलेक्ट्रॉ/इलेक्ट्रॉ ॲन्ड टेली/MCA | ३० पर्यंत | ०४/१०/२४ |
| १०) | **दि. अहमदनगर डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल को ऑप बँक लि** | | | |
| | १) लिपीक (६८७ पदे) | पदवी (५०%) गुणवंत उत्तीर्ण व MSCIT आवश्यक | ४० पर्यंत | २७/०९/२४ |
| | २) वाहन चालक (०४ पदे) | दहावी उत्तीर्ण व LMV वाहन परवाना | ४० पर्यंत | |
| | ३) सुरक्षा रक्षक (०५ पदे) | कोणत्याही शाखेतील पदवीधर असावे | ४५ पर्यंत | |

सुवर्णसंधी - १) वार्षिक वर्गणी भरल्यास वर्षभर नोकरीविषयक फॉर्म घरपोच मिळतील.
२) नोकरीविषयक फॉर्म संबंधित कार्यालयास सत्वर पोहोच केले जातील. (कुरिअर सर्व्हिस)
३) खाजगी नोकरी (प्रायव्हेट प्लेसमेंट)साठी नाव नोंदणी करा. ४) नोकरीविषयक साप्ताहिकाचे सभासद व्हा.

वरीलपैकी कोणत्याही फॉर्मसाठी वा अचूक माहितीसाठी भेटा वा रु. ५०/- ची मनिऑर्डर करा. MPSC, RRB, BSRB, SET, NET, IAS / IPS, NDA, CDS, LIC, KVS नवोदय, कोर्ट, निवड मंडळ, स्टाफ सिलेक्शन, इंजिनिअरिंग, पोलीस भरती, तलाठी, रेल्वे या स्पर्धा परीक्षांची अद्ययावत पुस्तके फक्त आमच्याकडेच मिळतील.

**अुत्तम सेवा** १) २२, डॉ. कोटणीस शॉपिंग सेंटर, सिद्धेश्वर मंदिराजवळ, पार्क चौक, सोलापूर. वेळ स. १० ते सायं ७, फोन नंबर - ९७६३७४१९९१. www.uttamseva.org

## बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra

**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
**आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड़, जुले सोलापूर, सोलापुर - 413004**
**फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal_sol@mahabank.co.in**

### नियम - 8 (1)
### ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल सेट्स अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, 2002 अन्वये बँक ऑफ महाराष्ट्रचे प्राधिकृत अधिकारी आहेत आणि कलम 13 च्या उप-कलम (12) अन्वये दिलेल्या अधिकारांचा वापर करत आहेत. सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 ने डिमांड नोटीस जारी केली आहे ज्यामध्ये खाली नमूद केलेल्या कर्जदारांना आणि जामीनदारांना ही नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण देय परतफेड करण्याचे आवाहन केले आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सामान्य जनतेला नोटीस देण्यात आली आहे की अधोस्वाक्षरीने उपकलम (4) अंतर्गत त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रतीकात्मक ताबा घेतला आहे. 18.09.2024 रोजी सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह अधिनियमाचे कलम 13 वाचले

विशेषत: कर्जदाराला आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार येथे नमूद केलेल्या रकमेसाठी बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असेल.

सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी, उपलब्ध वेळेनुसार, कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे कर्जदाराचे लक्ष वेधले जाते.

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा- बार्शी.**<br>**कर्जदार - श्री. मधुसूदन नंदकुमार भोपेमहानुभव**<br>पत्ता- सी/ओ लीलावती भोसले, पोलीस लाईन, धाराशिव<br>पत्ता-प्लॉट नं 5 (पूर्व बाजू) गट क्रमांक 9441/2, जनार्दन नगर, परंडा रोड बार्शी - 413401<br><br>**हमीदार :-**<br>**श्री. बाळासाहेब नामदेव माले**<br>पत्ता- पोस्ट निताली ता. जि. धाराशिव येथे | श्री. मधुसूदन नंदकुमार भोपेमहानुभव यांच्या नावावर मालमत्तेचे नोंदणीकृत गहाण भूखंड क्रमांक 5 (पूर्व बाजू) येथे स्थित आहे, क्षेत्रफळ 125.40 चौ.मी. जनार्दन नगर, परंडा रोड, बार्शी येथे स्थित गट क्रमांक 944/2 पैकी<br><br>**खालीलप्रमाणे सीमा:-**<br>उत्तर - भूखंड क्रमांक 4<br>पूर्व- रस्ता<br>पश्चिम - गट क्रमांक 944/2<br>दक्षिण- रोड | **मागणी सूचना:**<br>दि. 01.06.2024<br>रु. 23,50,178.00/- अधिक लागू न केलेले व्याज 01/06/2024 पासून कर्जाची वसुली होईपर्यंत<br><br>**सांकेतिक ताबा**<br>**तारीख:**18/09/2024 |
| 2 | **शाखा- बार्शी**<br>**कर्जदार - 1. श्री. सुरेश दिगंबर भालेराव**<br>फ्लॅट क्र. -A 201, दुसरा मजला, RSM हाइट्स, CTS नं. 2511, तेलगिरणी चौक, लातूर रोड, बार्शी, बार्शी तालुका, सोलापूर दि. 413411.<br><br>**सह-कर्जदार -**<br>**सौ. चांदनी सुरेश भालेराव**<br>फ्लॅट क्र. -201, दुसरा मजला, RSM हाइट्स, CTS नं. 2511, तेलगिरणी चौक, लातूर रोड, बार्शी, बार्शी तालुका, सोलापूर दि. 413411 | Regd. निवासी फ्लॅट क्र. -201, दुसरा मजला, आरएसएम हाईट्स, सीटीएस क्रमांक 2511 येथे, तेलगिरणी चौक, लातूर रोड, बार्शी, बार्शी तालुका, सोलापूर दि. 413411 श्री सुरेश दिगंबर भालेराव आणि सुरेश चंद्रनी यांच्या नावे गहाण ठेवा. भालेराव बांधकाम क्षेत्र- 67.96 चौ. माउंट, एकूण जमीन क्षेत्र - 67.96 चौ<br><br>**खालीलप्रमाणे सीमा:**<br>पूर्व: जलतरण तलाव दृश्य<br>दक्षिण: प्रस्तावित इमारत<br>पश्चिम: फ्लॅट क्रमांक 202<br>उत्तर: फ्लॅट क्र. 203 | **मागणी सूचना:**<br>दि. ०५/०७/२०२४<br>रु.१५,८१,७९३.६८/- अधिक लागू न केलेले व्याज ०५.०७.२०२४ पासून कर्जाची वसुली होईपर्यंत<br><br>**सांकेतिक ताबा**<br>**तारीख:**१८/०९/२०२४ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - २३/०९/२०२४**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

## महत्त्वाचे

### भाम्बरी-ऑलिवेट्टी अंतिम फेरीत



**चेंगडू** : येथे सुरू असलेल्या चेंगडू ओपन टेनिस स्पर्धेत भारताचा युकी भाम्बरी व त्याचा फ्रेंच जोडीदार अॅल्बानो ऑलिवेट्टी या जोडीने सोमवारी पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत इव्हान डोडिग व राफेल मॅटोस या दुसऱ्या मानांकित जोडीचा करत स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. भाम्बरी-ऑलिवेट्टी जोडीने उपांत्य सामन्यात एक तास ३१ मिनिटांत ६-३, ७-६ (११-९) असा विजय मिळवला. आता विजेतेपदाच्या लढतीत भाम्बरी-ऑलिवेट्टी जोडीला अव्वल मानांकित फ्रेंच जोडी सॅडिओ डुम्बिया व फॅबियन रेबोल या जोडीविरुद्ध निर्णायक झुंज द्यावी लागणार आहे. डुम्बिया-रेबोलने मेक्सिकन-ऑस्ट्रेलियन जोडी मिगुएल रेयेस-वरेला आणि जॉन-पॅट्रिक स्मिथ ४-६, ६-३, १२-१० असा पराभव केला. दरम्यान, हॅंग्झोऊ ओपन टेनिस स्पर्धेत विजय सुंदर प्रशांत व जीवन नेदुनचेझियान या जोडीनेही एरियल बेहार व रॉबर्ट गॅलोवे या जोडीचा ०-६, ६-२, १०-४ पराभव करत स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळविले. आता त्यांची गाठ कॉन्स्टॅंटिन फ्रॅंटझेन व हेंड्रिक जेबेन्स या बिगरमानांकित जर्मनीच्या जोडीशी पडेल.

### अनमोल खरबला पोलिश बॅडमिंटनचे विजेतेपद

**लुब्लिन** : पोलंडमधील लुब्लिन येथे भारतीय बॅडमिंटनपटू अनमोल खरबने स्वित्झर्लण्डच्या मिलेना श्नायडरचा २१-१२, २१-८ असा पराभव करत पोलिश आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन २०२४ स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावले. प्रथम मानांकित अनमोलने अंतिम ३२च्या फेरीत डेन्मार्कच्या अमाली शुल्झविरुद्ध २१-१७, २१-१६ असा विजय मिळवून आंतरराष्ट्रीय मालिका स्पर्धेची सुरुवात केली. हरयाणाच्या १७ वर्षीय अनमोलने अंतिम फेरीत प्रवेश करताना आपल्या प्रतिस्पर्ध्यांवर सरळ गेममध्ये मात केली. तिने लिथुआनियाच्या सामंता गोलुबिकाईटचा २१-९, २१-१७, युक्रेनच्या सोफिया लॅवरोव्हाचा २१-१२, २१-१७ आणि डेन्मार्कच्या फ्रेडरिके लुंडचा २१-१२ असा पराभव केला. तिने बेल्जियम इंटरनॅशनल २०२४ चे विजेतेपद पटकावल्यानंतर अनमोल खरबचे हे सलग दुसरे विजेतेपद होते. बेल्जियमच्या ल्युवेनमध्ये तिने शुल्झचा अंतिम फेरीत तीन गेममध्ये पराभव केला होता. जागतिक क्रमवारीत १६५ व्या क्रमांकावर असलेल्या खरबने तिसऱ्या गेममध्ये २१-१० अशा गुणांसह प्रतिस्पर्ध्यावर मात केली.

### बीट्रिझ हद्दाद माईया कोरिया ओपन विजेती



**सेऊल** : ब्राझीलची स्टार टेनिसपटू बीट्रिझ हद्दाद माईयाने पहिला सेट गमावल्यानंतर जोरदार मुसंडी मारत अव्वल मानांकित डारिया कासात्किनावर १-६, ६-४, ६-१ असा विजय नोंदवत कोरिया ओपन टेनिस स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. बीट्रिझचे हे तिच्या कारकिर्दीतील पहिले डब्ल्यूटीए ५०० एकेरी विजेतेपद ठरले. २०१७ साली सेऊलमधील या स्पर्धेच्या अंतिम फेरीत बीट्रिझला पराभव पत्करावा लागला होता. बीट्रिझ अंतिम सामन्याच्या पहिल्या सेटमध्ये काहीशी गोंधळली होती, त्यामुळे तिने पहिला सेट गमावला. जागतिक क्रमवारीत १३व्या क्रमांकावर असलेल्या रशियन कासत्किनाने सलग पाच गेम जिंकून पहिला सेट अवघ्या २६ मिनिटांत जिंकला, मात्र त्यानंतर बीट्रिझने उत्स्फूर्त खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदावर आपले नाव कोरले. हे तिचे वर्षातील पहिले विजेतेपद ठरले.

### न्यूझीलंड महिला टी-२० संघाला पाच टक्के दंड

**मॅके** : ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात न्यूझीलंडच्या महिलांना संथ गतीने षटके टाकल्याबद्दल त्यांच्या सामना शूल्कातून पाच टक्के कपातीचा दंड ठोठावण्यात आला, असे आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) सोमवारी सांगितले. ऑस्ट्रेलियाने मॅके येथे पहिल्या टी-२० सासमन्यात पाच गडी राखून आणि दुसरा सामना २९ धावांनी जिंकला. मालिकेच्या सलामीच्या सामन्यात न्यूझीलंड संगाने संथ गतीने षटके टाकल्याचे निदर्शनास आले. न्यूझीलंडची कर्णधार सोफी डेव्हाईनने झालेली चूक कबुल केली असून दंडसुद्धा मान्य केला, त्यामुळे औपचारिक सुनावणीची आवश्यकता नाही.

# डी. गुकेश अतिशय प्रभावी

## रिचर्ड रॅपोटचे प्रतिपादन

◆ **बुडापेस्ट, २३ सप्टेंबर**

भारतीय बुद्धिबळ प्रगतीच्या वाटेवर असून ग्रॅण्डमास्टर डी. गुकेश हा अतिशय प्रभावी खेळाडू आहे. गुकेशच आगामी जागतिक बुद्धिबळ स्पर्धेच्या विजेतेपदाचा प्रबळ दावेदार आहे, असे मत हंगेरीचा ग्रॅण्डमास्टर रिचर्ड रॅपोर्ट याने व्यक्त केले.

येथे आयोजित ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय पुरुष व महिला संघांनी सुवर्णपदकाचा मान मिळविला. १८ वर्षीय डी. गुकेश भारताच्या मोहिमेचा स्टार खेळाडू होता, त्याने आठ विजय विजय नोंदवले व २ लढती अनिर्णीत ठेवून तो स्पर्धेत अपराजित राहिला. भारतीय संघाच्या या कामगिरीमुळे रिचर्ड प्रभावित झाला. ऑलिम्पियाडच्या सहाव्या फेरीत गुकेश व रॅपोर्ट यांच्यात संघर्ष झाला व ४४ चालीनंतर त्यांनी आपली लढत बरोबरीत ठेवली. उझबेकिस्तानचा अब्दुसत्तोरोव्ह नोदिरबेक हा गुकेशविरुद्ध अर्धा गुण मिळवणारा दुसरा खेळाडू होता.



आगामी नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये सिंगापूर येथे डी. गुकेश व विद्यमान व विश्वविजेता डिंग लिरेन यांच्यादरम्यान विश्वविजेतेपदासाठी लढत होणार आहे. त्या पृष्ठभूमीवर बोलताना २८ वर्षीय रॅपोर्टने जागतिक विजेतेपदासाठी सर्वात तरुण आव्हानवीर म्हणून १८ वर्षीय डी. गुकेशचे कौतुक केले.

या स्पर्धेची मी आतुरतेने वाट पाहत आहो. या दोघांदरम्यानच्या सामन्याचा वेगळा स्तर आहे. या स्पर्धेत गुकेशचा सामना करण्यासाठी डिंग लिरेनमधील अनुभवी प्रतिस्पर्धी असेल, असे रॅपोर्ट म्हणाला. भारतातून अनेक युवा प्रतिभावान खेळाडू उदयास येत असून ते प्रतिस्पर्ध्यांसमोर आव्हान उभे करणार आहे. तरीही चीनच्या डिंग लिरेनकडे असलेली अनुभवाची शिदोरी लक्षात घेता गुकेशला २० नोव्हेंबर ते १५ डिसेंबरच्या संघर्षात विश्वविजेतेपदावर दावा करणे सोपे होणार नाही, असेही तो म्हणाला.

◂(वृत्तसंस्था)



बुडापेस्ट, हंगेरी येथे आयोजित ४५ व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभात भारतीय संघ. भारताने बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या खुल्या आणि महिला दोन्ही विभागात सुवर्णपदके जिंकली

# महेंद्र गायकवाड मनसे केसरी २०२४ चा मानकरी

● दिलीप धोत्रे आयोजित मंगळवेढ्यात इंग्लिश स्कूलच्या कुस्ती मैदानात हजारो क्रीडाप्रेमींची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा दि.२३ सप्टेंबर-**

महाराष्ट्र केसरी महेंद्र गायकवाड हा मनसे केसरी २०२४चा मानकरी ठरला. छत्रसाल स्टेडियम दिल्लीच्या आशिष हुड्डाला त्याने घुटना डावावर मात केली. दहा मिनिटे चाललेल्या या कुस्तीत पैलवान गायकवाड यांनी सुरुवातीपासुन वर्चस्व प्रस्थापित केले होते.



मनसे नेते दिलीप धोत्रे यांच्या माध्यमातून मंगळवेढा याचे आयोजन केले होते. या कुस्ती आखाड्यात उद्घाटनप्रसंगी माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे, मनसे तालुका प्रमुख नारायण गोवे, जिल्हा उपप्रमुख चंद्रकांत पवार, कोल्हापूरचे पवन महाडिक, दादा धोत्रे, मंगळवेढा तालुका कुस्तीगीर संघटनेचे अध्यक्ष दामोदर घुले, कुस्ती आखाडा प्रमुख मारुती वाकडे, महेंद्र देवकते, मुरलीधर सरकळे आदी मान्यवर उपस्थित होते.

पंच म्हणून १९८८चे महाराष्ट्र केसरी रावसाहेब मगर व पंढरपूरचे माजी नगराध्यक्ष वामन बंदपट्टे, समाधान घोडके, मारुती वाकडे, भीमराव माळी, दामोदर घुले, महेंद्र देवकते यांनी काम पाहिले. विजेते पैलवान गायकवाड यांना मानाची गदा व पाच लाख रुपये रोख रकमेचे पारितोषिक मनसे नेते अमित ठाकरे, संयोजक दिलीप धोत्रे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी अमित ठाकरे यांचा विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

**जमदाडे, शिंदे, आटकळे, वाकडे हे मल्ल विजयी**

दोन लाख रुपयांची कुस्तीत माऊली जमदाडे यांनी भारत मदने याच्यावर मात केली. एक लाख रुपयांची कुस्ती प्रसाद सस्ते व संग्राम साळुंखे ही कुस्ती जोडीवर सोडण्यात आली. तात्या जुमाळे व विजय शिंदे यांच्यात लढत होऊन विजय शिंदे पॉईंटवर विजयी झाले. पंच्याहत्तर हजार रुपये बक्षीसासाठी एक चाक डावावर ज्योतिबा आटकळेने संग्राम अस्वलेवर मात केली. पन्नास हजार रुपये बक्षीसासाठी सौरभ घोडके व सुनील हिप्परकर यांच्यात जोडीवर कुस्ती सोडण्यात आली. दिग्विजय वाकडे व अनिल मळगे यांच्यात लढत होऊन वाकडे विजयी झाले.



# सुनील गावसकरांना दिलेला भुखंड अखेर अजिंक्य रहाणेला

**मुंबई दि.२३ सप्टेंबर-**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सुनील गावसकर यांना छत्तीस वर्षांपूर्वी बहाल करण्यात आलेला वांद्रे येथील २ हजार चौरस मीटरचा भूखंड आता क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांना देण्यात येणार आहे. सुसज्ज क्रीडा सुविधा उभारण्यासाठी ३० वर्षासाठी भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रस्तावाला मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. हा भूखंड क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांना इनडोअर क्रिकेट प्रक्षिशण केंद्रासाठी १९८८ मध्ये वितरीत करण्यात आला होता. मात्र, या भूखंडावर कोणतेही काम न झाल्याने शासनाने तो परत घेतला आहे. या भूखंडाची सद्याची परिस्थिती वाईट असून, आसपासचे झोपडीधारक अनावश्यक कामांसाठी याचा वापर करत आहेत. त्यानंतर म्हाडा प्राधिकरणाने ठराव करून हा भूखंड माजी कर्णधार अजिंक्य रहाणे यांना देण्याची शिफारस केली होती. त्याला मंत्रीमंडळाने मान्यता दिली.


स्वराज केत


नमन साखरे


नयन साखरे

# आयएमएसच्या तिघांची विभागीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

शालेय शहर धनुर्विद्या स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलच्या स्वराज केत, नमन साखरे व नयन साखरे या तिघांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

१४ वर्षाखालील मुलांच्या गटात स्टेट बोर्डच्या स्वराज याने तृतीय क्रमांक मिळविला. कंपाउंड या खेळप्रकारात सी.बी.एस.ई.च्या नमन याने प्रथम तर नयन याने दुसरा क्रमांक मिळवला. या कामगिरीवर त्यांची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यास क्रीडा शिक्षक अक्षय माने, सचिन ढवाण, राजकुमार माने व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक दीपक चिकणे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थापक अध्यक्ष ए.डी.जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका सुजाता बुट्टे व ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

# चौधरी, आडम, दौंडे, कोरे यांची सलामी

● बीएमआयटी महाविद्यालयात विद्यापीठ बुद्धिबळ : मुलींमध्ये उपासे, घोडके, चेंडकेयांचे विजय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ अंतर्गत ब्रह्मदेव दादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीने सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशनच्या सहकार्याने विद्यापीठ निवड बुद्धिबळ स्पर्धेस प्रारंभ झाला.



बेलाटी येथील ब्रह्मदेव दादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये रंगलेल्या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू वालचंद अभियांत्रिकीचा पल्लव चौधरी, रजत आडम, सांगोला महाविद्यालयाचा तेजस दौंडे, हिराचंद नेमचंद महाविद्यालयाचा प्रज्वल कोरे यांच्यासह मुलींमध्ये वालचंद इन्स्टिट्यूटची आंतरराष्ट्रीय खेळाडू रिद्धी उपासे, बार्शीच्या बी.पी. सुलाखे महाविद्यालयाची आत्मजा घोडके, बी.एम. आय. टी.ची विद्याश्री चेंडके या मानांकित खेळाडूंनी देखील आकर्षक विजय मिळविले. बेलाटी येथील ब्रह्मदेवदादा माने इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी महाविद्यालयात सुरु असलेल्या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने व प्राचार्य एस. जी. कुलकर्णी यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाले. यावेळी संस्थेचे प्रा. डॉ. बाबासाहेब मोरे, क्रीडा संचालक गोकुळ यादव, सोलापूर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे सचिव व आंतरराष्ट्रीय पंच सुमुख गायकवाड, स्पर्धेचे सचिव प्रा. नागनाथ पुदे, पात्रता समितीचे सदस्य प्रा. बाळासाहेब वाघचवरे, डॉ. समर्थ मनुकर, प्रा. नंदकुमार देशपांडे, प्रा. आनद ढवन तसेच स्पर्धेचे मुख्य पंच उदय वगरे, युवराज पोगुल, विजय पंगुडवाले आदी उपस्थित होते. यावेळी कै. ब्रह्मदेवदादा माने यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. आपल्या मनोगतात प्राचार्य कुलकर्णी यांनी खेळाडूंना बुद्धिबळ खेळाचे महत्व सांगून खेळाडूंना शुभेच्छा दिल्या तर आपल्या अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष दिलीप माने यांनी विविध समस्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांनी बुद्धीचा व कल्पकतेचा उपयोग कसा करावयाचा याचा दैनंदिन जीवनातील उदाहरणासह स्पष्टीकरण करत हार व जीत महत्वाचे नसून जिद्द व चिकाटी महत्त्वाचे असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. नितीन जाधव यांनी तर आभार क्रीडा संचालक प्रा.गोकुळ यादव यांनी मानले.

# मुलांमध्ये मुंबई उपनगर, मुलींमध्ये नाशिकला विजेतेपद

## पहिली राज्यस्तरीय ज्युनिअर थ्रो बॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

पहिली राज्य जुनिअर थ्रो बॉल स्पर्धेत मुलांच्या गटात मुंबई उपनगर व मुलींच्या गटात नाशिकने विजेतेपद पटकाविले.



नेहरूनगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे शारीरिक शिक्षण महाविद्यालयोच्या मैदानावरझालेल्या या स्पर्धेत मुलांच्या गटात मुंबई उपनगरने नाशिकचा १५/४ १५/६ तर मुलींच्या गटात नाशिकने बीडचा १५/७ १५/१३ असा पराभव केला. तृतीय स्थान मुलांमध्ये अहमदनगर व मुलींमध्ये मुंबई शहरने संपादिले. प्रांजल जाधव व प्रांजल कुशारे यांनी सर्वोत्कृष्ट खेळाडूंचे पारितोषिके पटकाविले. श्री समर्थ स्पोर्ट्स नर्सरी व महा थ्रो बॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा आयोजित केली होती. पारितोषिके तेलगू भाषिक एक संघ अध्यक्ष श्रीनिवास संगा, मराठी चित्रपट निर्माता दिग्दर्शक फिरोज मुलानी, मागास समाज सेवा मंडळ संस्थापक सचिन चव्हाण, महा. थ्रो बॉल असोसिएशन सचिव राहूल वाघमारे, सोलापूर शहर थ्रो बॉल असो सचिव राजेंद्र माने, अध्यक्ष सुहास छंचुरे यांच्या उपस्थितीत देण्यात आली. या स्पर्धेसाठी पंच म्हणून अतुल हाबळे, सागर वर्मा, नंदकिशोर गिरी, अजित पाटील, अक्षय माने यांनी काम पाहिले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी ज्ञानेश्वर काळे, शब्बीर शेख, प्रसन्न काटकर, देविदास शिंदे, रवींद्र चव्हाण, निर्जला तळवार, सोनाली मुनगीपाटील यांनी परिश्रम घेतले.



### शालेय रग्बी स्पर्धेत अरिहंत स्कूलला विजेतेपद

सोलापूर : शालेय शहर रग्बी स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलींच्या गटात अरिहंत स्कूलने विजेतेपद पटकाविले. संघास क्रीडा शिक्षक आकाश मिस्किन यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, पर्यवेक्षिका तस्नीम शेख आदींनी अभिनंदन केले. संघ : अक्षरा कांबळे, श्रीदेवी गोंट्याल, अनुष्का त्रिमल,हर्षदा पाटील, शुभांक्षा रोकडे, तेजस्विनी सुरवसे, गौतमी पुला, वैभवी जेटगी, प्रियदर्शनी संगनगारी, श्रेया गडगी, सृष्टी कणसे.

# शालेय योगासन स्पर्धेत शिवदारे कॉलेजचा तेजस स्वामी प्रथम

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

शालेय योगसान स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात व्ही.जी. शिवदारे ज्युनियर कॉलेजच्या तेजस प्रशांत स्वामी याने रिदमिक योगासनामध्ये प्रथम तर ट्रॅडिशनल योगसनामध्ये व्दितीय क्रमांक पटकावत दुहेरी मुकुट मिळविला.



या कामगिरीवरी त्याची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना योगगुरू स्नेहल पेंडसे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्था अध्यक्ष राजशेखर शिवदारे, विश्वस्त बी.व्ही. शेटे, प्रभारी प्राचार्या एस.एस.गायकवाड, डॉ. डी. एस. सुत्रावे, एम.बी. पाटील व आर.आय. स्वामी यांनी अभिनंदन केले.

# २७ सप्टेंबरपासून सोलापुरात मेघराज रोडगे स्मृती चषक ९ वर्षाखालील राज्य निवड बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने तसेच सोलापूर डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन व पोलीस कल्याण केंद्राच्या सहकार्याने सोलापुर चेस अकॅडमीने ९ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्य निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन २७ ते २९ सप्टेंबर दरम्यान येथील ड्रीम पॅलेस, पोलीस कल्याण केंद्र, सेवासदन शाळेजवळ केले आहे. ही स्पर्धा ''स्व. मेघराज (विकी) रोडगे यांच्या स्मरणार्थ उद्योजक भाऊसाहेब रोडगे यांनी प्रायोजित केली आहे.

ही स्पर्धा जागतिक बुद्धिबळ संघटनेच्या स्विस लीग नियमानुसार आठ फेऱ्यात स्पर्धा संपन्न होणार असुन खेळाडूंना प्रत्येकी ३० मिनिटे व प्रत्येक चालीला ३० सेकंद वाढीव वेळ देण्यात येणार आहे. या स्पर्धेत दिनांक १ जानेवारी २०१५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेले खेळाडू सहभाग घेऊ शकतात. या स्पर्धेतुन पाच मुले व दोन मुलींची निवड राष्ट्रीय अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धेसाठी करण्यात येणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना २० हजार रकमेची रोख पारितोषिके व रु. २०००० पर्यंतची आकर्षक चषक व मेडल्स देण्यात येणार आहेत. या स्पर्धेतुन निवड झालेल्या खेळाडूंना राज्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त होणार आहे. जिल्हा पातळीवर निवड झालेल्या खेळाडूंची राहण्याची मोफत सोय अकॅडमीकडून केली जाणार असुन या सहभागी जिल्हा व राज्यातील मानांकित खेळाडू यांचा सहभाग निश्चित झाल्याची माहिती संस्थेचे सचिव सुमुख गायकवाड यांनी दिली आहे. स्पर्धा यशस्वीतेसाठी अतुल कुलकर्णी, संतोष पाटील, दिनेश जाधव, उदय वगरे, प्रशांत पिसे, जयश्री कोंडा, रोहिणी तुम्मा, विजय पंगुडवाले, सुभाष उपासे, गणेश मस्कले, युवराज पोगुल आदी परिश्रम घेत असुन इच्छुक खेळाडूंनी उदय वगरे (मो.क्र. ८८८८०४५३४४) यांच्याशी संपर्क साधावा असे प्रायोजक भाऊसाहेब रोडगे व अकॅडमीचे अध्यक्ष महेश धाराशिवकर यांनी कळविले आहे. स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून आंतरराष्ट्रीय पंच भरत चौगुले काम पाहणार आहेत. खेळाडूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन सोलापुर डीस्ट्रीक्ट चेस असोसिएशनचे अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी केले आहे.



### धनुर्विद्या स्पर्धेत दमाणीची विद्या लोहार प्रथम

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

शालेय शहर धनुर्विद्या स्पर्धेत येथील बी. एफ. दमाणी प्रशालेची विद्या विजय लोहार हिने प्रथम क्रमांक पटकाविला. या कामगिरीवर तिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिला अश्वथ आर्चरी अकादमीच्या प्रशिक्षिका ऐश्वर्या सावंत यांचे मार्गदर्शन लाभले. समाधान विद्यालय दहीटणे इरफान शेख यांनी विभागीय स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या शहराध्यक्षपदी किरण माशाळकरची फेरनिवड

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**



सोलापूर शहर राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या अध्यक्षपदी किरण माशाळकर यांची फेरनियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी युवती काँग्रेसची नुकतीच मुंबई येथे युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली विविध शहर-जिल्ह्यातील अध्यक्षांसमवेत बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्रदेशाध्यक्षा सोनवणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार व प्रांताध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मान्यतेने विविध शहर व जिल्ह्याच्या युवती अध्यक्षांच्या निवडीची घोषणा केली. त्यामध्ये सोलापूर शहराच्या अध्यक्षपदी किरण माशाळकर यांची फेरनियुक्ती करण्यात आली तर जिल्हाध्यक्षपदी वृषाली इंगळे यांची निवड करण्यात आली. किरण माशाळकर यांनी राष्ट्रवादी युवती विभागामध्ये गेल्या काही महिने उत्कृष्ट पद्धतीने काम केल्याने संध्या सोनवणे यांनी परत एकदा शहराध्यक्ष पदी निवड केली. सोलापूर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, माजी नगरसेवक नारायण माशाळकर, महिला अध्यक्ष संगीता जोगदनकर आदी पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले.



### पद्मशाली संघमच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित पद्मशाली सखी संघमच्या वतीने नांदेड शहरात असलेल्या श्री मार्कंडेय चौकात, दूध डेअरी जवळील' पद्मशाली समाजाच्या स्मारकाची विटंबना एका समाज कंटकाकडून झाले आहे. त्याला तेथील स्थानिक पोलीस प्रशासनाने लगेच अटकही केले असून शासनाच्या वतीने कडक शासन त्या समाज कंटकाविरुध्द शिक्षा व्हावे, यापुढे पुन्हा विटंबना करण्याचे धाडस कोणीही करु नये. अशा आशयाचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. पद्मशाली समाज हे पापभिरु आणि कष्टकरी म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाते. या समाजाचे कुलदैवत चिरंजीव महर्षी मार्कंडेय महामुनींचे नाव पुरातन काळातील अनेक ग्रंथात आढळून येतो. यावेळी अध्यक्षा मेघा इट्टम, सचिवा पूजा चिप्पा, सदस्या आरती आडम, वनिता सुरम आदी पद्मशाली सखी संघमचे सर्व पदाधिकारी व सदस्या उपस्थित होत्या.

# शहरात मोकाट जनावरांचा उच्छाद कायम

## स्मार्ट सिटीतील रस्त्यांवर जनावरांचा वावर ठरतोय अपघाताला आमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**



सोलापूर शहराच्या स्मार्ट रस्त्यांवर मोकाट जनावरांचा वावर दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. मोकाट जनावरांचा वावर रस्त्यांवर वाढल्याने अपघाताला आमंत्रण मिळत आहे. स्मार्ट सिटीतील स्मार्ट रस्त्यांवर हे चित्र नेहमीच दिसून येत आहे. याकडे महापालिका प्रशासन आणि संबंधित कोंडवाडा विभाग सातत्याने दुर्लक्ष करीत आहे.

शहराच्या मध्यवर्ती भागात नेहमीच मोकाट जनावरे कचराकुंडीच्या बाजूने फिरताना दिसतात. रस्त्याच्या कडेला नेहमीच या मोकाट जनावरांनी ठिय्या मांडलेला असतो. असेच चित्र शहरातील श्रीरूपाभवानी मंदिराकडे जाणाऱ्या रोडवर दिसत आले. या रोडवर नेहमीच वाहनांची तसेच नागरिकांची मोठी वर्दळ असते. मोठमोठी वाहने या रोडवरून जात असतात. अशावेळी कळपाने फिरणाऱ्या मोकाट जनावरांमुळे रस्त्यांवर वाहतूक कोंडी होत आहे. परिणामी अपघात सुद्धा घडून येत आहेत.

दरम्यान शहरातील विविध रस्त्यांवर विशेषतः मार्केट परिसरात या जनावरांचा उच्छाद वाढलेला आहे. मात्र याकडे महापालिका प्रशासनाच्या कोंडवाडा विभागाचे सातत्याने दुर्लक्ष होताना दिसत आहे. पूर्वी वेळोवेळी मोकाट जनावरे पकडली जायची. आणि जनावरांच्या मालकांकडून दंड आकारला जात असे परंतु, सद्यस्थितीमध्ये सर्वत्र जनावरांचा वावर वाढल्याने मोकाट फिरणाऱ्या जनावरांवर अंकुश ठेवण्यासाठी कोणतीच उपाययोजना केली जात नाही. सदरची जनावरे पकडली जातात का नाहीत ? असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

### नवरात्रोत्सवनिमित्त कोंडवाडा विभागाने लक्ष देण्याची गरज

नवरात्रोत्सवानिमित्त ग्रामदेवता श्रीरूपाभवानी देवी मंदिराकडे जाणाऱ्या चारही रस्त्यांवर भाविकांची मोठी गर्दी असते. अशावेळी कळपाने फिरणारी मोकाट जनावरे उसळून उच्छाद मांडू शकतात. यामुळे एखादी अप्रिय घटना घडू शकते. त्यामुळे संबंधित कोंडवाडा विभागाने याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

- **सुरेश तळवलकर,** नागरिक.

### प्रशासनाचे नवीन गुरे वाहक वाहन आहे कुठे?

महापालिका प्रशासनाने नुकतेच नवीन पद्धतीचे गुरे वाहक वाहन सेवेत रुजू केले आहे. त्या वाहनावर चालक तसेच कर्मचारी नेमण्यात आले आहेत. परंतु सदरचे वाहन कोणत्या भागात कारवाई करते, याचा कोणताच थांगपत्ता लागत नाही. पूर्वीचे वाहन मोठ्या आकाराचे होते, त्यामुळे कारवाई करताना अनेक अडचणी निर्माण होत होत्या. परंतु आता नवीन छोट्या आकाराचे वाहन महापालिकेच्या ताफ्यात रुजू झाले आहे. परंतु कारवाई होते का? झाली तर कोठे आणि केव्हा? असा प्रश्न आता नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

## ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनचे काम बंद आंदोलन सुरू

### पाणीपुरवठा योजनेच्या कामातील विविध अडचणींकडे वेधले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेची कामे करताना विविध अडचणी येत आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी ग्रामीण पाणीपुरवठा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष मोतीलाल राठोड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

असोसिएशनच्या वतीने यापूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले होते मात्र त्यानंतरही कोणत्याही अडचणींचे निराकरण झाले नाही. यामुळे अखेर असोसिएशनच्या वतीने काम बंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे. निविदा चौकशीतील कामांची गेल्या १८ महिन्यांपासून प्रलंबित देयके अदा करण्यात आली नाहीत. निविदांची चौकशी कोणाच्या तक्रारीवरून झाली ? चौकशी करण्याचे आदेश कोणी दिले ? चौकशी समितीने अहवाल काय दिला ? अहवालानुसार दोष असलेल्या अधिकारी- कर्मचारी यांच्यावर काय कारवाई झाली? बिले कोणाच्या आदेशानुसार थांबविण्यात आले? तसे लेखी आदेश कोणी दिले ? कामाची चौकशी नसताना बिले थांबवण्याचे कारण काय असा प्रश्न यावेळी मोतीलाल राठोड यांनी उपस्थित केला.

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत दहा टक्के रक्कम न ठेवता काम अंतिम करणे याबाबत निवेदन देण्यात आले होते. निविदा प्रक्रियेमध्ये ग्राम पंचायत कडील दहा टक्के लोक वर्गणीचा ठेकेदारांशी काहीही संबंध नाही. ग्रामपंचायतीने लोक वर्गणी न भरल्यामुळे ठेकेदारांच्या देयकातून सरसकट दहा टक्के रक्कम कपात करण्यात येत आहे. हे अन्यायकारक आहे, असा आरोप राठोड यांनी केला आहे. विविध ७ मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे काम बंद आंदोलन करण्यात येत आहे.

या पत्रकार परिषदेस आनंद तोडकरी, बालाजी चव्हाण, राहुल सोनी , सूर्यकांत बिराजदार, अस्लम शेख आदी उपस्थित होते.

## णमोकार महामंत्र्याच्या जयघोषात पर्युषण पर्वाची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

विजापूर रोड येथील १००८ श्री भगवान बाहुबली मंदिर समितीच्या वतीने पर्युषण पर्वाची सांगता झाली. यानिमित्ताने जलयात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

या महोत्सवानिमित्त पालखी मंदिरापासून कोटणीस नगर, माशाळ वस्ती, पापराम नगर, नंदी नगर, कुबेर टावर्स, विजापूर रोड मार्गे मंदिरात पोहोचली. या पालखीसोबत मानाचा कलश व इतर कलस सुहासिनीने घेऊन सामील झाले होते नमोकार महामंत्र्याच्या जयघोषात महावीर भगवान की जय, अहिंसा परमो धर्म की जय, बाहुबली भगवान की जय अशा घोषणाने वातावरण दुमदुमले होते. पालखीचे समारोप मंदिरात झाल्यानंतर पंचामृत अभिषेकाची बोली करून भगवंतास पंचामृताचे अभिषेक करण्यात आला.

यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष सुधीर पंडित, सचिव अनिल माणिकशेटे सुनील गांधी अजित माणिकशेटे, धीरज पंडित शाम पाटील, अभिनंदन विभूते, राजेंद्र पाटील, माणिक उपाध्ये, देशभूषण हसाळे, बाहुबली दूरुगकर, कोमल पाचोरे व भारतीय जैन संघटनेचे पदाधिकारी नमोकार महामंडळाचे पदाधिकारी झिनवाणी महिला पदाधिकारी व परिसरातील सर्व श्रावक, श्राविका उपस्थित होते.



# क्रीडा



### जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत सुलाखे कॉमर्स कॉलेजला उपविजेतेपद

**बार्शी दि. २३ सप्टेंबर-**

जिल्हा बॅडमिंटन स्पर्धेत १९ वर्षांखालील मुलींच्या गटात बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेजने उपविजेतेपद संपादिले. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या क्रीडा संकुल कुमठा नाका सोलापूर येथे झालेल्या या स्पर्धेमध्ये ऋतुजा पोपट चव्हाण, तनुजा वसंत कदम, प्रियंका प्रशांत काळे, साक्षी उमेश सरवदे व नम्रता विनोद घोलप यांनी ही कामगिरी केली. ऋतुजा पोपट चव्हाण हिची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षिका रुपाली शिंदे व संघ व्यवस्थापक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के, क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, नदीम शेख, बार्शी तालुका क्रीडा संयोजक प्राध्यापक संजय पाटील, बॅडमिंटन कोच शहजाद यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे प्राचार्य डॉ. एस. बी.करंडे यांनी अभिनंदन केले.

# धनुर्विद्येमुळे सोलापूरचे नाव ऑलम्पिकमध्ये चमकेल

## जिल्हा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा क्रीडाधिकारी नरेंद्र पवार यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**अरण, दि. २३ सप्टेंबर-**

क्रीडा कार्यालयाचे धनुर्विद्या खेळाडूंना क्रीडा साहित्य व तांत्रिक सहकार्य नेहमीच असते. त्यामुळे जिल्ह्यातील धनुर्विदया खेळाडू लवकरच ऑलिंपिक स्पर्धेमध्ये प्रतिनिधित्व करून जिल्ह्याचे नाव उज्वल करतील, अशी अशा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांनी व्यक्त केली.

संत सावता माळी विद्यालयाच्या मैदानावर जिल्हा शालेय धनुर्विद्या स्पर्धेच्या वेळी ते बोलत होते. माजी प्राचार्य सावता घाडगे, काकासाहेब पाटील, आनंद कुलकर्णी यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन झाले. यावेळी संघटनेचे सचिव हरिदास रणदिवे, यशवंत शिंदे, प्राचार्य सुरेश मोरे, पर्यवेक्षक भैरू फरड, क्रीडा अधिकारी तानाजी आदी उपस्थित होते. क्रीडा समन्वयक संजय शिंदे व अरविंद कोळी यांनी मान्यवरांचे स्वागत केले. स्पर्धाप्रमुख सावता घाडगे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी ज्येष्ठ क्रीडा शिक्षक अर्जुन खटके, राम काळे, श्याम धाराव, संभाजी वागज आदी उपस्थित होते.



**गुणानुक्रमे अंतिम निकाल : १४ वर्षाखालील** : इंडियन राउंड मुले : भार्गव लोंढे, ओम नरुटे, अवधत गरगडे, विश्वजीत गरगडे. मुली : प्रगती चव्हाण, श्रेया जाधव, तनिष्का जाधव, तन्मयी माने. रिकर्व्ह राउंड मुले : मोहम्मद सुवेज, समीर देवळे, वर्धन कोरडे, सुर्यतेज घाडगे, शिवम पवळे लोकरे सागर. मुली : शेजल घाडगे, राजनंदिनी वाघमारे, प्राजल खाडे. कंपाउंड राउंड मुले : ईशान शहा, सुमित विरपे, कार्तिक गायकवाड, हर्षवर्धन लोकरे. मुली : आदिती भंडारे, सानवी जाधव,पौर्णिमा वसेकर साक्षी साळुंखे.

**१७ वर्षाखालीलः** इंडियन राउंड मुले : रेहान मुलाणी, जयहिंद जगताप, रवी घाडगे, कर्णवीर धाराव. मुली : प्रगती घाडगे,सई पाठक, इशिता अनभुले, श्रावणी लोंढे. रिकर्व्ह राउंड मुले : आदित्य पवार, शिवम चिखले, कृष्णा शिंदे, निशांत क्षीरसागर. मुली : गाथा खडके, समीक्षा देशमुख, त्वरिता साळुंखे कृष्णा घुले. कंपाउंड राउंड मुले : अजित गायकवाड, सुजित गायकवाड, अर्णव मासाळ, मनीष वसेकर, स्मृती वीरपे, समृद्धी चव्हाण,चैत्राली गाजरे, हर्षदा राऊत.

**१९ वर्षाखालील :** इंडियन राउंड मुले : रेहान पठाण, निखिल शिंदे,धैर्यशील शिंदे, करण वाघमोडे. मुली : स्नेहल शेळके, श्रेया भापकर, ऋतुजा सोनार,साक्षी सावंत. रिकर्व्ह राउंड मुलेः पृथ्वीराज घाडगे, शंभू वाघमारे, हर्षवर्धन टोणपे. मुली : सायली माने, समृद्धी पवार, श्रावणी राऊत. कंपाउंड राउंड मुले : अथर्व वसेकर, गौरव पवार, ओम रणदिवे, कार्तिक शेळके. गौरी डवरी,आरोही मोहिते, अस्मिता सावंत.

**पावसातही सुरू होती स्पर्धा**

रिकर्व्ह राऊंडच्या ३० मीटर अंतरावरील स्पर्धा सुरू असताना वरूनराजाने हजेरी लावली. त्यावेळेला खेळाडूंना विचारण्यात आले स्पर्धा थांबवायची की सुरू ठेवायची. सर्व खेळाडूंनी स्पर्धा सुरू ठेवायची असे सांगितले. ४५ मिनिटे ही स्पर्धा पूर्ण पावसात सुरू राहिली. खेळाडूंना पावसामध्ये स्पर्धा खेळण्याचा अनुभव मिळाला. स्पर्धा आयोजकांना थोडा त्रास झाला पण ही स्पर्धा पूर्ण खेळायला मिळाली याचाही आनंद खेळाडूंना मिळाला.



### करमाळाच्या राजेंद्र चिखले याची शालेय विभागीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**करमाळा दि.२३ सप्टेंबर**

यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा येथील शिवम राजेंद्र चिखले याची पुणे विभागीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड झाली. अरण (ता. माढा) येथे झालेल्या जिल्हा स्पर्धेतून शिवमने रिकर्व्ह या प्रकारामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे त्याची निवड झाली. त्यास शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.रामकुमार काळे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, उपप्राचार्य संभाजी किर्दाक यांनी अभिनंदन केले.

# लेदर बॉल टी-२० क्रिकेट स्पर्धा पार्क स्टेडियमवर उद्यापासून

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

ओल्ड यंग ग्रुप व एन.जी. सी.ए. यांच्या संयुक्त विद्यमाने मर्यादित संघांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेस बुधवारपासून (दि.२५) पार्क मैदान येथे सुरू होणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष विष्णू गायकवाड आणि अध्यक्ष संतोष जाधव यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने ही स्पर्धा घेण्यात येत आहे. या स्पर्धेत माजी आमदार दिलीप माने यांचेकडून प्रथम बक्षीस ३१ हजार रुपये रोख व ट्रॉफी, द्वितीय बक्षीस २१ हजार रुपये रोख व ट्रॉफी संतोष जाधव यांच्याकडून देण्यात येत आहे. तसेच वैयक्तिक बक्षीसे उत्कृष्ठ फलंदाज, उत्कृष्ठ गोलंदाज, उत्कृष्ठ क्षेत्ररक्षक, मालिकावीर, प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर असे बक्षीसे ठेवण्यात आलेली आहेत. या स्पर्धा आंतरराष्ट्रीय क्रिकेट नियमानुसार होतील. साखळी पध्दतीने २० ओव्हरचे सामने घेण्यात येतील. सर्व संघासाठी आयोजकाकडून रंगीत ड्रेस कोड देण्यात येत आहे. या पत्रकार परिषदेस निलेश गायकवाड, बजरंग पवार, राहुल म्हेत्रे , दीपक सुरवसे, अनिल पाटील, शिरीष म्हेत्रे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

### आठ संघाचा सहभाग

ओल्ड यंग ग्रुप, सोलापूर बार असोसिएशन (अ), टाईम्स ऐलवन, टायटन ऐलवन, टिचर्स क्रिकेट टिम, आय.एम.एस. संडे,जयहिंद कुर्डूवाडी संघ, विक ऐलेवन.





# १५ शिक्षक व १०० विद्यार्थ्यांनी डॉजबॉल प्रशिक्षण शिबिराचा घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

सोलापूर शहर व जिल्हा डॉजबॉल असोसिएशन व सोलापूर जिल्हा क्रीडा कार्यालय व सोलापूर महानगरपालिका क्रीडा कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने डॉजबॉल चे प्रशिक्षण शिबिरात जिल्ह्यातील १५ शाळेतील क्रीडा शिक्षक व १०० विद्यार्थी या प्रशिक्षण शिबिरास उपस्थित होते.

या प्रशिक्षण शिबिरात डॉजबॉल खेळातील झालेल्या नवीन बदलांबद्दल व मैदानातील झालेल्या नवीन बदलाबद्दल डॉजबॉल संघटनेचे सचिव सुदेश मालप यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवेढ्याचे मुख्य प्रशिक्षक व डॉजबॉलचे राष्ट्रीय खेळाडू फिरोज पठाण व समर्थ भीमरथी यांनी सर्व संघांना व क्रीडा शिक्षकांना मार्गदर्शन केले.

त्यांचे स्वागत काडादी प्रशालेचे क्रीडाशिक्षक श्री पाटील यांनी केले. या शिबिरास ज्ञानेश्वर काळे, सोहेल शेख, संदेश पवार, शरण वांगी, पवन भोसले, शिवानंद सुतार, श्रेयस मालप, अभिज भानप, आकाश अमदिपूर, प्रभूदेव चिंचोलीकर, सचिन गाडेकर, बी. आय. इंगळगी आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### नवरात्र महोत्सव तयारी

सोलापूर : नवरात्र महोत्सव निमित्ताने श्री रुपाभवानी मंदीरातील शामियानाचे व रंगरंगोटी काम सुरु झाले.

(छायाचित्र : केवल तिवारी)



### रुपाभवानी देवस्थान मंडळाच्या अध्यक्षपदी मल्लिनाथ लातुरे

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

श्री रुपाभवानी देवस्थान भक्त व तरुण मंडळ अध्यक्षपदी मल्लिनाथ लातुरे यांची निवड करण्यात आली. तर उपाध्यक्ष संताजी भोळे यांची निवड करण्यात आली. सोलापूरचे ग्रामदेवी श्री. रुपाभवानी देवस्थान भक्त व तरुण मंडळाची सर्वसाधारण सभा मंडळाच्या कार्यालयात घेण्यात आली. यात मागील वर्षाचा जमाखर्च, हिशोब, इतिवृत्तांत नागनाथ कोळेकर यांनी मांडले व यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली. इतर पदाधिकारी पुढीलप्रमाणे : खजिनदार प्रमोद पवार, सचिव जगदेव बंडगर, सदस्य प्रविण कोनाळी, अरुण लातुरे आदींची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी तम्मा कोनाळी, रोहन लातूरे, पिंटू अक्कलकोटे, संजय पवार, राजू पवार, सूरज पाटील, रेवण पागाद, स्वप्नील पवार, ॲड. चिवरी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अक्कलकोटमध्ये सलग तीन दिवस दमदार पाऊस

**अक्कलकोट, दि. २३ सप्टेंबर-**

अक्कलकोट शहर व परिसरात शनिवार, रविवारी, सोमवारी सलग तीन दिवस पावसाने झोडपल्याने सोयाबीन, सूर्यफुल, बाजरी, मका, तूर ही पिके भागात पाण्यात आहेत. मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शनिवारी, रविवारी पावसाने जोरदार हजेरी लावली. सोमवारीही दिवसभर काळेभोर ढग अच्छादलेले होते. दुपारी दोनपासून जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे शेतीची कामे खोळंबली आहेत. सूर्यफुल, बाजरी पिके काढणील आली आहेत. किमान आठ ते पंधरा दिवस पावसाने उघडीप दिल्यास सूर्यफुल, बाजरी मका हाती लागेल. अन्यथा हातातोंडाशी आलेले बाजरी, मका, सूर्यफुल उत्पादनावर पावसाने मोठा परिणाम होण्याची शक्यता शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. आठवडा बाजारही पावसले प्रभावित झाला. सोमवारी आठवडा बाजारावर पावसाने पाणी फेरले.

# आर्थिक सक्षम होण्यासाठी मराठा समाजाने उद्योग, व्यवसायाकडे वळावे

## लखुजीराजे जाधवराव : बार्शीत मराठा मंदिर लोकार्पणप्रसंगी आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २३ सप्टेंबर-**

मराठा समाजाच्या जीवावर आजवर अनेकांनी पोळ्या भाजल्या. मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले. तरीही समाज हलाखीचे जीवन जगत आहे. मराठा समाज कोणाच्या दावणीला बांधू नका. मराठा समाज आर्थिकदृष्ट्या सक्षम झाला पाहिजे. यासाठी समाजातील युवकांनी आता उदयोग, व्यवसायात उतरले पाहिजे, असे प्रतिपादन लखुजीराजे जाधवराव सिंदखेडराजा यांचे वंशज बाबाराजे जाधवराव यांनी केले.

बार्शीतील मराठा एकता मंडळ संचलित मराठा मंदिराच्या लोकार्पण सोहळ्यात बोलत होते. यावेळी माजी नगराध्यक्ष रमेश पाटील, विजय राऊत, रणवीर राऊत, मराठा सेवा संघ, संभाजी सेना, छावा संघटना, मराठा एकता मंडळ अशा विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

माजी खा. रणजितसिंह नाईक-निंबाळकर म्हणाले, काहीजण फक्त तीनच पक्षांना ठोकत आहेत. ठोकायचे असेल तर सर्वांनाच ठोका. ठराविक पक्षांना का ठोकता? ज्यावेळी आण्णासाहेबांनी मराठा आरक्षणासाठी बलिदान दिले. त्यावेळी मुख्यमंत्री कोण होते? ज्यांनी ५० टक्केपर्यंत आरक्षण नेले, त्यांच्याबद्दल कधी प्रश्नचिन्ह उपस्थित केले का? मुंबईमध्ये मूक मोर्चा काढला, त्यावेळी मुका मोर्चा म्हणून आपल्याला हिणवलं, त्यांच्याविषयी कधी आंदोलन, उपोषण केले का? असा प्रश्न त्यांनी विचारला. विकासकामांमध्ये माझा देशातील काही मोजक्या खासदारांमध्ये नंबर होता. पण आंदोलनाचा फटका मलाही बसला. आमदार राजेंद्र राऊत यांनी ४ हजार कोटींहून अधिक विकास निधी आणला. जर काम करणारी माणसे संसद, विधीमंडळात नसतील तर तुमचा आवाज तेथे कोण पोहोचवणार असा प्रश्न विचारला.

अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील म्हणाले, या महामंडळाच्या स्थापनेपासून आतापर्यंत कधीही मिळाला नाही, इतका निधी या सरकारच्या काळात मिळाला. महामंडळाच्या माध्यमातून अल्पावधीतच १ लाख मराठा उदयोजकांचा टप्पा पार केला आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ५ लाख मराठा उदयोजक तयार करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली आहे. आमदार राऊत हे परखडपणे मत मांडणारे नेते असून त्यांच्या पाठीशी रहा, असे आवाहन केले. आ. राऊत यांनी मराठा आरक्षणाच्या अनुषंगाने सरकार व आंदोलकांमध्ये संवाद होणे गरजेचे असून नरेंद्र पाटील यांनी पुढाकार घेवून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मराठा आरक्षणातील आंदोलक, अभ्यासक यांची बैठक बोलवावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. पाटील यांनी यावर सकारात्मकता दर्शवली. यावेळी दास शेळके, आरक्षण अभ्यासक प्रा. बाळासाहेब सराटे यांनी विचार मांडले.



### लढण्यासाठी तयार रहा : सुभाष जावळे

या लढाईत ३५० मावळ्यांनी बलिदान दिले. लढाई जिंकण्यासाठी मारण्याची तयारी ठेवली पाहिजे. लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. राजाभाऊ तुम्ही समाजाचे मन जिंकले आहे. २८ संघटना एकत्र येऊन क्रांती मोर्चा झाला. आजवर एकही मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाचे काही काम केले नाही. हे गद्दार असून मराठा म्हणण्याचे लायकीचे नाहीत. शुक्राचार्य शोधा. नोंदी सापडल्या त्यांना तात्काळ प्रमाणपत्र द्या. ओबीसी आरक्षण मिळेपर्यंत इडब्ल्यूएस सुरु ठेवा अन् ते देणार नसेल तर २५ पासून परभणीत आत्मक्लेश-आमरण उपोषणास बसणार आहे. आत्महत्या करु नका, लढण्यासाठी तयार राहा. मराठा कमजोर तर राज्य कमजोर होईल. सरकारने मराठा सक्षम करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मराठा आरक्षण समन्वय समितीचे अध्यक्ष सुभाष जावळे यांनी केले.

### बार्शीत पहिले मराठा मंदिर

राज्यातील पहिले मराठा मंदिर. मारणारे मराठे होऊ. मराठा बाणा टिकला पाहिजे. मराठा आमदार निवडून आले पाहिजेत, असे समाज मंदिर उभारणे हे अहिऱ्या गयऱ्याचे काम नाही. आडव्या येणाऱ्या मंजराच्या पाठीत काठी मारा, असे आवाहन विजयसिंह महाडिक यांनी केले.

## स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थितीवर २६ सप्टेंबरला अभिनेते शरद पोंक्षे बोलणार

### रेणुका महागांवकर, प्रशांत बडवे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थिती या विषयावर ज्येष्ठ अभिनेते आणि सावरकर भक्त शरद पोंक्षे हे बोलणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे गुरूवार, दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्षा रेणुका महागांवकर, कार्याध्यक्ष प्रशांत बडवे यांनी दिली.



हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीत आपले आयुष्य खर्ची घालून मोलाचे योगदान देणारे तसेच मराठी भाषा समृध्द करणारे राष्ट्रभक्त स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या राष्ट्रभक्ती आणि स्वातंत्र्यपूर्व काळातील विविध घडामोडी तसेच स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सद्य परिस्थिती यावर अभिनेते शरद पोंक्षे हे सविस्तरपणे व्याख्यानाच्या स्वरूपात बोलणार आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा दक्षिण सोलापूरच्या माध्यमातून समाजप्रबोधन आणि जनजागृतीसाठी अनेक उपक्रम राबवण्यात येतात दरवर्षी दिपावलीच्या निमित्ताने ज्येष्ठ निरूपणकार विवेकजी घळसासी यांची प्रवचनमाला, महाराष्ट्राचे प्रतिभावंत साहित्यिक कवी विंदा करंदीकर यांच्या जन्म शताब्दी निमित्त त्यांच्या कथा, कवितांवर आधारीत विंदा एक स्मरणसाखळी हा बहारदार कार्यक्रम तसेच महाराष्ट्राचे सुपुत्र असलेले आणि दुबईत मसाला किंग म्हणून ओळख निर्माण करणारे धनंजय दातार यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम सोलापुरातील उद्योजकांना मार्गदर्शक ठरला.

मसाप दक्षिण शाखेच्या अध्यक्षा रेणुका महागांवकर यांनी लेखन केलेल्या दोन पुस्तकाचे प्रकाशन अगदी थाटात करण्यात आले. त्यानंतर दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीच्या वृत्तनिवेदिका, सुप्रसिध्द निवेदिका ज्योती आंबेकर यांचे भाषण कला शिबीर हे शिबीर आणि महिलांसाठी राज्यस्तरीय पाककला शिबीर त्याचबरोबर सोलापूरचे सुपुत्र असलेले राज्याच्या आणि देशाच्या राजकारणातील सोलापूरच्या सुपुत्रांच्या मुलाखतीचा कार्यक्रम सोलापूर रंगे नेत्यांच्या संगे, महाकवी गदि माडगुळकर यांच्या स्मृती निमित्त काव्य जागर कार्यक्रम, महिलांसाठी श्रावण महोत्सव, श्री सूक्त ते राष्ट्र सूक्त असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यातूनच गुरूवार दि. २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६.२५ वाजाता हुतात्मा स्मृती मंदिर मध्ये हा स्वातंत्र्यवीर सावरकर आणि सद्य परिस्थिती चे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती राहावे असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## १४ अभियंत्यांचा भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंता पुरस्काराने आज होणार गौरव

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

शासकीय अधिकारी कर्मचारी कला, क्रिडा साहित्य व सांस्कृतिक मंच यांच्यावतीने १४ अभियंत्यांचा भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंता पुरस्काराने होणार गौरव करण्यात येणार आहे.

गेल्या १४ वर्षापासून उत्तम अभियंता पुरस्कार देवून सोलापूर शहर जिल्ह्यातील विविध शासकीय-निमशासकीय कार्यालये तसेच शासकीय महाविद्यालय यामधून शासकीय सेवेत उत्तुंग काम करणाऱ्या अभियत्यांना भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या उत्तम अभियंत्यांना पुरस्कार देवून गौरविण्यात येत असते.

यंदाचे पुरस्काराचे १५ वे वर्ष असून पुरस्कार वितरण समारंभ मंगळवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सायं. ५.१५ वा., शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, जनता बँकेशेजारी, नवी पेठ येथे होणार असून या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत प्रा. डॉ. नसिमा पठाण, सार्वनिक बांधकाम मंडळ कार्यालयाचे अधिक्षक अभियंता संजय माळी, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, महावितरणचे अधिक्षक अभियंता सुनिल माने, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी सुनिल सोनटक्के यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे.

### हे आहेत पुरस्काराचे मानकरी

इंजि. राकेश गिरीधर जवादे (प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय महामार्ग, सोलापूर), इंजि. विजय तानाजी पाटील (उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर), इंजि. सुजित बाबुराव विभुते (सहाय्यक यंत्र अभियंता, रा.प. विभागीय कार्याशाळा, सोलापूर), इंजि. अमर किशोर जाधव (प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (लेडिज आयटीआय), इंजि. पृथ्वीराज कृष्णा पारसे (सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक, रा.प. सांगोला आगार), इंजि. सौ. आरती हणुमंत वाडकर (सहाय्यक अभियंता श्रेणी २, सा.बां. उपविभाग, पंढरपूर), इंजि. जुबेर रसुलसाहेब शेख (सहाय्यक अभियंता, महावितरण ग्रामीण विभाग, सोलापूर), इंजि. भिमाशंकर सिद्राम कोंडगुळी (कनिष्ठ प्रशिक्षणार्थी सल्लागार, अनुसंगिक कार्यालय केंद्र, सोलापूर), इंजि. अजयकुमार एम. तेली (शाखा अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग, अक्कलकोट), इंजि. प्रशांत रविंद्र गायकवाड (कनिष्ठ अभियंता महावितरण, मंगळवेढा ग्रामीण), इंजि. अमोल कालिदास तिटवे (कनिष्ठ अभियंता, जिल्हा प्रयोगशाळा, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, सोलापूर), इंजि. श्रीशैल मल्लिकार्जुन बोधले (कनिष्ठ अभियंता उजनी, कॅनॉल उपविभाग क्र. ५७, सोलापूर), इंजि. सिद्राम रामचंद्र गोलेकर (गटनिदेशक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सोलापूर), इंजि. अविनाश दशरथ शिंदे (वरिष्ठ मोटार यांत्रिक, मोटार परिवहन विभाग, पो.अ. सोलापूर ग्रामीण), विशेष सन्मान शिल्प निदेशक विवेक चंदालिया राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार विजेते २०२४ आय.टी.आय. कोल्हापूर.



## लोकशाही बळकट करण्यासाठी न्यायव्यवस्थेची भूमिका महत्त्वाची

### मा. न्यायमूर्ती लोकायुक्त अंबादास जोशी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

भारताचे स्वातंत्र्य आणि लोकशाही बळकट करण्यासाठी न्यायव्यवस्थेने अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि गोव्याचे लोकायुक्त अंबादास जोशी यांनी केले. रविवारी, हिराचंद नेम चंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात (ॲम्पी थिएटर) सोलापूर शहर जिल्हा अधिवक्ता परिषदेने आयोजित केलेल्या रंगनाथ विष्णू लळीत वकील स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते.'भारताचे सार्वभौमत्व-एक न्यायिक दृष्टिकोन' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

मुंबई उच्च न्यायालयातील वरिष्ठ अधिवक्ता विलासराव सोनवणे प्रमुख वक्ते म्हणून यावेळी उपस्थित होते. त्यांनी सार्वभौमत्व ही संकल्पना स्पष्ट केली. रामायण, महाभारतातील संदर्भ देत त्यांनी ही संकल्पना मांडली. मुघल काळात भारतामध्ये सार्वमत कशा प्रकारचे होते याचेही वर्णन केले. भारतीय राज्यघटनेमध्येदेखील पूर्वीच्या काळातील भारतीय धर्मशास्त्राचा आधार घेतला गेला याचीही सुरेख मांडणी केली.भारतीय नागरिकांनी आणि वकिलांनी सतत जागृत राहून भारताचे सार्वभौमत्व टिकवून ठेवले पाहिजे अशी अपेक्षाही सोनवणे यांनी व्यक्त केली.

राज्य कशा पद्धतीने चालवायचे यासाठी राज्यघटनेची रचना समाजाने केली. रचना करताना संसद, न्यायालय आणि प्रशासन या तीन शाखा निर्माण झाल्या. त्यांनी कशा पद्धतीने काम करायचे हे संविधानात लिहिले. सरकार चालवायचे तर कायद्याप्रमाणे चालेल. कायद्याप्रमाणे आपण वागतो की नाही हे पाहण्यासाठी यंत्रणा काम करते. ही यंत्रणा एकमेकांवर अंकुश ठेवते. कायद्यापुढे कुणी मोठा नाही, असेही सोनवणे म्हणाले.

प्रारंभी मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. अधिवक्ता परिषदेचे शहराध्यक्ष ॲड. महेश अग्रवाल यांनी प्रास्ताविक भाषणातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. ॲड. परमानंद जवळकोटे यांनी अतिथींचा परिचय करुन दिला. अधिवक्ता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ॲड. धनंजय माने यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## शारदीय नवरात्रोत्सव २०२४

# आजपासून देवीची मंचकी निद्रा

## घटस्थापना ३ ऑक्टोबरला;१३ ऑक्टोबरला सीमोल्लंघन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवास ३ ऑक्टोवरपासून घटस्थापनेने प्रारंभ होणार आहे. त्यापूर्वी देवीच्या मंचकी निद्रेस मंगळवार, २४ सप्टेंवरपासून प्रारंभ होणार आहे. तर १३ ऑक्टोवरला सीमोल्लंघनाने देवीच्या नवरात्रोत्सवाचा समारोप होणार आहे.

साडेतीन शक्तिपीठापैकी पूर्णपीठ असलेल्या तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवाची पूर्वतयारी मंदिर प्रशासन व नगरपालिका प्रशासनाने जवळपास पूर्ण केली आहे. २४ सप्टेंवर रोजी तुळजाभवानी देवीची मंचकी निद्रा सुरू होणार आहे. ३ ऑक्टोबर रोजी मंचकी निद्रा संपल्यानंतर तुळजाभवानी देवीची सिंहासनावर प्रतिष्ठापना केली जाणार आहे. दुपारी १२ वाजता मंदिरात विधीवत घटस्थापना केली जाणार आहे. ७ ते ११ ऑक्टोवर या कालावधीत तुळजाभवानी देवीच्या विशेष अलंकार पूजा मांडण्यात येणार आहेत. त्यानुसार पहिल्या दिवशी स्थालंकार, त्यानंतर मुरलीअलंकार, शेषशाही अलंकार, भवानी तलवार अलंकार आणि शेवटी महिषासूरमर्दिनी अलंकार महापूजा देखाव्यासह मांडली जाणार आहे.



या कालावधीत मंदिर परिसरात दररोज तुळजाभवानी देवीचा छबीना मिरवणुकीचा धार्मिक विधी पार पडणार आहे. १२ ऑक्टोवर रोजी दुपारी धार्मिक विधी आणि त्यानंतर घटोत्थापनाने नवरात्र महोत्सवाची सांगता होणार आहे. त्याचदिवशी रात्री नगरहून येणाऱ्या मानाच्या पलंग पालखीसमवेत मिरवणूक आणि १३ ऑक्टोवरला पहाटे विजयादशमीच्या दिवशी तुळजाभवानी देवीचे सीमोल्लंघन होणार आहे. यंदाच्या सलमोल्लंघनात देवीच्या पालखीवर कुंकवाऐवजी फुलांची उधळण करण्याचा निर्णय मंदिर संस्थानने घेतला आहे. सलमोल्लंघनानंतर देवीची श्रमनिद्रा सुरू होईल. १६ ऑक्टोवर रोजी कोजागरी पौर्णिमा आणि १७ ऑक्टोवर रोजी पहाटे तुळजाभवानी देवीची पुन्हा एकदा सिंहासनावर प्रतिष्ठापना केली जाईल. त्याचदिवशी रात्रर सोलापूरच्या मानाच्या काठ्यांसह छबिना मिरवणूक, जोगवा व विविध धार्मिक विधी पार पडणार आहे. अशाप्रकारे नवरात्रोत्सवाचा दिनक्रम असणार आहे.

## वळसंगच्या दिव्यांग व्यक्ती अस्मिता अभियान शिबिरास ८०० जण सहभागी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे मिशन इन्स्टिट्युट फॉर ट्रेनिंग, रिसर्च ॲन्ड एक्शन या संस्थेद्वारे दिव्यांग व्यक्तीसाठी आयोजित शिबिरात ८०० जणांनी सहभाग नोंदविला असल्याची माहिती मित्रा संस्थेचे सदस्य अभिजित पाटील यांनी दिली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या संकल्पनेतून व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, वळसंगचे सरपंच जगदिश अंटद, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकिय अधिक्षक डॉ.अमोल कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग व्यक्तीसाठी या शिबिराचे आयोजन केले आहे. ज्या दिव्यांग व्यक्तीकडे जुने प्रमाणपत्र आहे व ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र (युडीआयडी) काढण्यासाठी हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. दक्षिण सोलापूर तालुक्यातील सुमारे १ हजार २९४ दिव्यांग लाभार्थी असून, यातील ८०० जणांनी यामध्ये सहभाग नोंदविला. दिव्यांग नोंदणी कक्षामध्ये अस्थिव्यंग १, मेडिसिन २, बालरोगतज्ञ ३, अंध/अल्पदृष्टी ४, श्रवण दोष/ कर्ण बधीर ५, बौध्दीक दिव्यांगता ६, समग्र शिक्षा, जिल्हा परिषद सोलापूर ७ कर्मचारी उपस्थित होते. सदर शिबीरासाठी ऑनलाईन नोंदणी याच सकाळी ९ वाजल्यापासून ते दुपारी २ वाजेपर्यंत केली आणि ८०० जणांची तपासणी करण्यात आली. अजून २ दिवस या शिबिराचे दक्षिण सोलापूर तालुक्यात नियोजन करण्यात आले असून, सर्व दिव्यांग व्यक्तींनी लाभ घ्यावा, असे आवाहन मित्रा संस्थेचे सदस्य अभिजीत राऊत आणि तहसीलदार जमदाडे यांनी केले आहे.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर : शहरातील व्हीआयपी रोडवरील दुभाजकातील झाडे कापली परंतु रोडवर पडलेला आजोरा मात्र तीन ते चार दिवसांपासून तसाच पडून आहे. महापालिका प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.
(छायाचित्र : केवल तिवारी)



## संक्षिप्त वृत्त...

### बाप-लेकाच्या अपहरणाप्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

शहरातील शुक्रवार पेठेत राहणाऱ्या बाप-लेकाचे अपहरण करणाऱ्याविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत काळम्मा उर्फ स्नेहा नागेश धर्माधिकारी (वय ५०, रा. ५३१, प्लॉट नं. २, दुसरा मजला, हरी प्रसाद अपार्टमेंट, शुक्रवार पेठ, सोलापूर) या महिलेच्या फिर्यादीवरुन अपहरणकर्त्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समर्थ नागेश धर्माधिकारी (वय २१) आणि नागेश शंकर धर्माधिकारी (वय ५४, रा. ५३१, प्लॉट नं. २, दुसरा मजला, हरी प्रसाद अपार्टमेंट, शुक्रवार पेठ, सोलापूर) अशी अपहरण झालेल्या बाप-लेकाची नावे आहेत. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी समर्थ व त्याचे वडील नागेश हे दोघे राहत्या घरातून काम आहे असे सांगून बाहेर गेले होते. ते परत आलेच नाहीत. त्यांचे फोन देखील बंद लागत असल्याने या दोघांना कोणीतरी अज्ञात कारणावरून पळवून नेले असल्याची नोंद फौजदार चावडी पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. पोलिस निरीक्षक विकास देशमुख पुढील तपास करीत आहेत.

### मल्लिकार्जुन नगरात तरूणास मारहाण

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

शहरातील अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगरात तरूणास हातातील गोल कड्याने मारून जखमी केल्याप्रकरणी चौघांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत मनोज नागनाथ गायकवाड (वय ३४, रा. नविन विडी घरकुल, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन लकी बाळशंकर, नितीन पवार, दादा खरटमल, महेश रद्दगी (रा. मल्लिकार्जुन नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १९ सप्टेंबर रोजी सायंकाळी मनोज गायकवाड हे मार्केट यार्डमधील काम संपवून घराकडे जात होते. त्यावेळी मल्लिकार्जुन नगर येथील राजयोग हॉटेल येथे आल्यानंतर गायकवाड यांच्या समोर एक दुचाकी आडवी आल्याने त्यास दुचाकी बाजूला घे असे म्हणाले. त्यावेळी लकी बाळशंकर व इतरांनी संगणमत करून शिवीगाळ करून हातातील गोल कड्याने डोक्यात मारून जखमी केले. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार पवार पुढील तपास करीत आहेत.



### वीजेचा शॉक लागून तरूणाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

सोलापूर - चिंचोळी एमआयडीसीमध्ये कारखान्यात काम करीत असताना वीजेचा शॉक लागून तरूणाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी सकाळी साडेआठच्या सुमारास घडली. मयुरेश मोहनराव पाटील (वय २९, रा. उत्कर्ष नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. सोमवारी सकाळी मयुरेश पाटील हे १०५-ए चिंचोळी एमआयडीसी येथे स्वतःच्या त्रिगुण प्लास्टीक इंडस्ट्रिज या पीयूसी पाईप बनविणाऱ्या कारखान्यात काम करीत होते. त्यावेळी वीजेचा शॉक लागल्याने ते बेशुध्द पडल्याने त्यांना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यावेळी डॉ. ओंकार तलकोकुल यांनी पाटील यांस मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिसात नोंद करण्यात आली आहे.



### काही तरी चावल्याने १५ वर्षीय मुलाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

काही तरी चावल्याने १५ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्याची घटना पेनूर (ता. मोहोळ) येथे घडली. अजय नागनाथ मोटे (वय १५, रा. पेनूर) असे मरण पावलेल्याचे नाव आहे. २२ सप्टेंबर रोजी रात्री साडेसातच्या सुमारास अजय हा घराशेजारी राहणाऱ्या मित्राकडून अभ्यासाची वही आणण्यासाठी गेला होता. त्यावेळी घरी परत येताना त्याच्या डाव्या पायास काही तरी चावल्याचे त्याने सांगितल्याने त्यास भाऊ प्रशांत मोटे याने उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. श्रीकृष्ण बागल यांनी अजय यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# मुसळधार पावसाने शहर-जिल्ह्याला झोडपले

**● आज जिल्ह्याला यलो अलर्ट; काढणीला आलेल्या सोयाबीनची हानी; शेतकरी हवालदिल**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

आठवड्याभरापासून विश्रांती घेतलेला पाऊस पुन्हा सक्रीय झाला असून रविवारी हजेरी लावल्यानंतर सोमवारी शहर व जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपून काढले. शहरातील सखल भागासह विविध रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचल्याने वालनचालकांना कसरत करत वाहने चालवावी लागली. मंगळवारी जिल्ह्याला यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

हवामान विभागाने महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यात पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. यामुळेच सोलापूर जिल्ह्यातही चार दोन तासाला पावसाची निब्बर हजेरी लागत आहे. अचानक ऊन पडते आणि काही वेळाने पाऊसही पडतो असे चित्र गेल्या काही दिवसांपासून आपल्याला दिसत आहे. सोमवारीही दुपारनंतर सोलापुरात पावसाचा जोर वाढला होता. सायंकाळी ५ नंतर तर या पावसाने कहरच केल्याने शहरातील सर्व रस्ते जलमय झाले होते. दरम्यान, हा पाऊस असाच पडत राहिला तर काढणीस आलेल्या सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची माहिती काही शेतकऱ्यांनी दिली.

काही दिवसांच्या विश्रांतीनंतर सोलापुरातही परतीचा पाऊस सुरु आहे. गेल्या ४ दिवसांपासून शहर-जिल्ह्यात पावसाचा जोर वाढला आहे. काही भागात विजांच्या कडकडाटासह पाऊस बरसायला सुरुवात झाली. दरम्यान, सोलापुरात पुढील काही दिवस जोरदार पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. मंगळवार दुपारपर्यंत जिल्ह्याला यलो अलर्ट दाखविण्यात आल्याने पाऊसधारा कोसळण्याची शक्यता आहे. या पावसामुळे सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. सोमवारी सायंकाळी ५ नंतर सोलापूर शहरात व जिल्ह्याच्या काही भागात परतीच्या या पावसाने जोरदार हजेरी लावल्याने पाणीच पाणी झाले. या पावसामुळे चाकरमाने आणि शहरवासियांचे प्रचंड हाल झाले. वाहनधारकांना वाहन चालविताना चांगलीच कसरत करावी लागली. अनेक शालेय मुलांना आपल्या घराकडे परत जाताना भीजतच जावे लागल्याचे चित्र आहे.



**सोमवारी सकाळपर्यंत जिल्ह्यात ५७२.८ मिमी पाऊस**

जिल्ह्यात सोमवार, दि. २३ रोजी सकाळी ८ पर्यंत ५७२.८ मिमी इतका रेकॉर्डब्रेक पाऊस झाला असून, यामध्ये सोमवारच्या पावसाची अजून भर पडली आहे. तालुकानिहाय आकडेवारी पाहिली तर यामध्ये उत्तर सोलापूर तालुक्यात ५९१.१ मिमी पाऊस पडला. तर द. सोलापूर ५३९.१, बार्शी ७४६.०, अक्कलकोट ५६८.२, मोहोळ ६५२.५, माढा ६३८.४, करमाळा ६०२.९, पंढरपूर ५४३.९, सांगोला ५४५.८, माळशिरस ३५२.६ आणि मंगळवेढा ५२५.६ मिमी इतका पाऊस झाला.

# सराईत गुन्हेगार सलमान पटेल, उजेर दफेदार तडीपार

**● मजरेवाडीत दहशत; सोलापूर, धाराशीव जिल्ह्यात बंदी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या कालावधीत शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहून शांतता रहावी तसेच गुन्हेगारांवर जरब बसावी या हेतून सोलापूर शहर पोलिस आयुक्तालयाच्यावतीने गुन्हेगारांवर कडक कारवाई करण्याची मोहिम सुरु करण्यात आली आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील मजरेवाडी परिसरातील दोन सराईत गुन्हेगारांना सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांनी दिले आहेत. या दोघां सराईत गुन्हेगारांना कर्नाटकात सोडण्यात आले आहे.

सलगान गुड्डुभाई पटेल (वय २८, रा. विष्णु नगर भाग २, मजरेवाडी, सोलापूर) आणि ऊजेर परवेश दफेदार (वय २६, रा. ५५, शोभादेवी नगर, मजरेवाडी, सोलापूर) अशी तडीपार करण्यात आलेल्यांची नावे आहेत. सलमान पटेल व ऊजेर दफेदार या दोघांविरुध्दही एमआयडीसी पोलिस ठाण्यात सन २०२२ व २०२४ या कालावधीमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. आपल्या साथीदारांसह घातक शस्त्रं जवळ बाळगून नागरीकांना मारहाण करून दुखापत करणे, जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे यासारखे गुन्हे दाखल असून या दोघांनाही तडीपार करण्याचा प्रस्ताव एमआयडीसी पोलिसांकडून पोलिस उपायुक्त विजय कबाडे यांच्याकडे पाठविण्यात आला होता. त्यास उपायुक्त कबाडे यांनी मंजूरी देत पटेल व दफेदार या दोघांनाही तडीपार करण्याचे आदेश दिले. तडीपारीच्या आदेशानंतर या दोघांनाही कर्नाटकात सोडण्यात आले आहे.





## घरगुती वादातून दोघांना मारहाण

**सोलापूर** - घरगुती वादातून दोघांना मारहाण करण्यात आल्याची घटना माळीनगर एमआयडीसी येथे घडली. गणेश अमरनाथ शिंदे (वय २५) आणि अमर नवनाथ शिंदे (वय ५०, रा. बामणे, ता. सांगोला) असे जखमीचे नाव असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

# दहा लाख, ११ तोळे सोन्यासाठी विवाहितेचा छळ

**● पतीसह पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

१० लाख रुपये हुंडा व ११ तोळे सोने माहेरून घेऊन येण्यासाठी विवाहितेचा छळ करून तिला घरातून हाकलून दिल्याप्रकरणी पतीसह पाचजणाविरुध्द सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत तन्वी अमोल उर्फ सोमनाथ गायकवाड (वय २०, रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ४, डोणगाव रोड, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती अमोल गायकवाड, सासरे महादेव गायकवाड, सासू संध्या गायकवाड, दीर आकाश गायकवाड, नणंद अमृता जाधव (सर्व रा. सेटलमेंट फ्री कॉलनी नं. ४, डोणगाव रोड, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नोव्हेंबर २०२० ते ९ मार्च २०२३ या कालावधीत तन्वी या सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व इतरांनी कोणत्या ना कोणत्या कारणावरून त्रास दिला. तन्वीस मुल झाल्यानंतर पती आकाश याने मुल माझे नाही, दुसऱ्या कोणाचे आहे असे म्हणून तिच्या चारित्र्यावर संशय घेतला व इतर स्त्रियांशी तुलना तन्वीशी करीत असे. तन्वीची मुलगी लहान असल्याने तिची जबाबदारी असल्याने ही बाब तन्वीने आई-वडीलांना सांगितली नाही. तरी मागील दोन महिन्यापासून पती अमोल व इतरांनी तन्वीस फारच तुच्छ दर्जाची वागणुक व त्रास दिला असून अमोल याने मुला मुलगी नको होती, मुलगा पाहिजे होता असे म्हणून सतत टोमणे मारून त्रास दिला. तसेच माहेरून १० लाख रुपये हुंडा व ११ तोळे सोने घेऊन ये म्हणून घरातून हाकलून दिले. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक कुतवळ पुढील तपास करीत आहेत.

# आयुष्यान भारत समिती प्रमुख शेटे प्रशासनावर नाराज

**● आयुष्मानची जिल्ह्यात फक्त २६ टक्के कार्ड वाटप तर ७४ टक्के पेंडिंग; शहर आयुक्तांचेही दुर्लक्ष**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

देशातील जनतेला मोफत आरोग्य सेवा सुविधा मिळण्यासाठी मोदी सरकारने २०१८ मध्ये आयुष्यमान भारत योजना सुरू केली होती. आतापर्यंत योजनेतंर्गत सोलापूरच्या नागरिकांचा सक्रीय सहभाग नाहीत तर कार्ड वाटपही कासवगतीने असल्यामुळे आयुष्यान भारत मिशन समितीचे महाराष्ट्राचे प्रमुख ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेत जिल्हा प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली.

१ जुलै २०२४ पासून जिल्ह्यात फक्त २६ टक्के आयुष्मान कार्ड वाटप झाली असून, उर्वरित ७४ टक्के कार्ड वाटप पेंडिंग असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. ऐन आजारपणात पळापळी न करता भविष्यात येणारे आजाराचे संकट ओळखून कार्ड गतीने काढावीत, असे आवाहन त्यांनी केले. जिल्ह्यातील आयुष्मान भारत योजनेचा आढावा घेण्यासाठी आयुष्यान भारत मिशन समितीचे प्रमुख शेटे हे सोलापुरात आल्यावर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यापूर्वी त्यांनी जिल्ह्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांशी संवाद साधून या योजनेचा धावता आढावा घेतला. यावेळी पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, जिल्ह्यातील ग्रामीण भागात आयुष्मान कार्डचे काम बऱ्यापैकी सुरू आहे मात्र शहरी भागात चक्क आयुक्तांचेच या योजनेकडे दुर्लक्ष होत असल्याने या योजनेचा बोजवारा उडत आहे.

**● आयुष्मान कार्डासाठी सक्रीय व्हा**

आयुष्मान भारतच्या कार्डवर ५ लाख रुपयांपर्यंत मोफत आरोग्य सुविधा मिळतात. सरकार प्रत्येक नागरिकामागे इतका खर्च करते. या योजनेचे जिल्ह्यातील लाभार्थी संख्या ४० लाख १२ हजार ६५२ इतकी आहे. मात्र यातील १० लाख ४३ हजार ६७१ लोकांनाच आयुष्मान कार्ड वाटप करण्यात आले आहेत. तर २९ लाख ६९ हजार ०४१ इतके आयुष्मान कार्ड पेंडिंग आहेत. यामुळे जिल्ह्यातील सर्व सामाजिक संस्था, जिल्हा प्रशासनातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी ही योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही आवाहन शेटे यांनी यावेळी केले. आपल्या जिल्ह्यात ६४ दवाखान्यांचा या योजनेसाठी सहभाग आहे.

**● २७ जिल्ह्यातील अधिकारी-नागरिकांच्या जाणल्या अडचणी**

गेल्या ३ महिन्यापासून राज्यातील २७ जिल्ह्यांचा दौरा केला असून, या काळात जिल्हा प्रशासनातील अधिकारी यांच्यासह काही नागरिकांशी, एनजीओंशी संवाद साधला आणि लोकांच्या अडचणी जाणून घेतल्या आहेत. आता मुंबईला गेल्यावर या त्यांच्या अडचणींवर मात करण्यासाठी मी विशेष प्रयत्न करणार असल्याचाही खुलासा यावेळी ओमप्रकाश शेटे यांनी केला.

**● जिल्ह्यात ३० कोटी ४९ लाखाचा निधी वितरित**

सोलापूर जिल्ह्यात आयुष्मान भारत कार्ड योजना कमी प्रमाणात राबविण्यात आली आहे. तरीही या तीन महिन्यात सोलापूर जिल्ह्यात १३ हजार ६८४ जणांना फायदा झाला असून, त्यांना ३० कोटी ४९ लाखाचा निधी वितरित केल्याची माहिती शेटे यांनी दिली. तर शासकीय रूग्णालयातील कारभारावर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. या रूग्णालयातील भोंगळ कारभाराबाबत २१ तक्रारी आणि त्यातील अवघ्या ३ तक्रारींचे निवारण झाले असून, अजूनही १८ तक्रारी प्रलंबित आहेत. जिल्ह्यातूनही ७६ तक्रारी आल्या असून, याबाबतही आम्ही कारवाईसाठी गतीने पावले उचलणार असल्याचे शेटे यांनी शेवटी सांगितले.

# १८ गुन्ह्यात ५ वर्षापासून फरारी आरोपीस अटक

**● मंगळवेढ्यातील आवताडे फॅक्टरीमधील चोरीचा गुन्हा उघडकीस**
**● स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई; चारचाकी वाहनासह ९ लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**

गेल्या ५ वर्षापासून जवळपास १८ गुन्ह्यातील फरारी आरोपीस सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी अटक करून त्याच्याकडून विविध गुन्ह्यातील सुमारे ९ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या अटक आरोपीकडून आवताडे शुगर फॅक्टरीमधील चोरीचा गुन्हादेखील उघडकीस आला आहे. या कारवाईत पोलिसांनी मोहोळ येथील एका भंगार व्यावसायिकसही अटक केली आहे.

सुरज उर्फ डग्या रवी चव्हाण (रा. सौंदणकट, ता. मोहोळ) असे अटक करण्यात आलेल्या गुन्हेगाराचे नाव असून जावेद शेख (रा. मोहोळ) असे अटक करण्यात आलेल्या भंगार व्यावसायिकाचे नाव आहे. या दोघांना मंगळवेढा पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून दोघांनाही न्यायालयाने पोलिस कोठडी सुनावली आहे.

१३ जुलै २०२४ रोजी मध्यरात्रीच्या सुमारास आवताडे शुगर फॅक्टरी (बालाजी नगर, नंदूर, ता. मंगळवेढा) येथील कारखान्याच्या आवारातील डब्ल्यूटीपी प्लॅन्टजवळील स्टोअर रूमच्या खिडकीचे लोखंडी गज तोडून तसेच शटर उचकटून चोरट्यांनी ५ लाख ९४ हजार ७२० रुपये किंमतीचे ६०० किलो वजनाचे गनमेटल (ब्रास मटेरियल) चोरून नेले होते. याबाबत सुरक्षा अधिकारी चंद्रकांत नारायण राठोड (वय ४८) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मंगळवेढा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्याचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर यांना आवताडे शुगर फॅक्टरीमध्ये चोरी करणाऱ्या टोळीतील संशयित सुरज चव्हाण हा सौंदणकट येथे राहण्यास असल्याची माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी सौंदणकट येथे सापळा लावून सुरज चव्हाण यास ताब्यात घेतले व त्याच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्याने व त्याच्या साथीदारांनी मिळून गेल्या दोन महिन्यापूर्वी मोहोळ येथील भंगार व्यावसायिकाचे चारचाकी व दुचाकी वाहनावरून आवताडे शुगर फॅक्टरीमध्ये चोरी केल्याचे सांगितले. त्यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मोहोळ येथील भंगार व्यावसायिक जावेद शेख यासदेखील ताब्यात घेऊन त्याच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला ६०० किलो गनमेटल ब्रास व गुन्ह्यात वापरलेली चारचाकी कार असा ८ लाख ९४ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलिस अधिक्षक प्रितम यावलकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलिस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलिस उपनिरीक्षक ख्वाजा मुजावर, सहायक फौजदार नारायण गोलेकर, हवालदार धनाजी गाडे, सलीम बागवान, मोहन मन्सावाले, पोलिस शिपाई सागर ढोरे-पाटील, अक्षय डोंगरे, समीर शेख, सायबर पोलिस ठाण्याकडील शिपाई रतन जाधव यांनी केली.



**डग्या १८ गुन्ह्यातील फरारी पाहिजे असलेला आरोपी...**

या गुन्ह्यातील आरोपी सुरज उर्फ डग्या चव्हाण हा पोलिसांच्या रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार असून तो सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील टेंभुर्णी पोलिस ठाण्यातील ३, वैराग १, अकलूज १, पंढरपूर तालुका ४, करकंब १, मंगळवेढा १, बार्शी तालुका ३, मोहोळ १ पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या सन २०१८ पासूनच्या दरोडा व घरफोडी यासारख्या विविध १८ गुन्ह्यातील फरारी पाहिजे असलेला आरोपी आहे.

## दवाखान्याच्या बहाण्याने तरूणीचा विनयभंग करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**




दवाखान्याच्या बहाण्याने तरूणीला घरी नेऊन तिचा विनयभंग करणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नरेंद्र सिद्राम कमलापूरे (वय २६, रा. नविन विडी घरकुल, कुंभारी) असे गुन्हा दाखल झालेल्याचे नाव आहे. याबाबत पिडीत तरूणीने फिर्याद दाखल केली आहे. १२ एप्रिल रोजी यातील पिडीत तरूणीला नरेंद्र कमलापूरे याने दवाखान्याच्या बहाण्याने तिच्या राहत्या घरातून दुचाकीवरून आपल्या घरी नेले. तिथे पिडीतेशी जबरदस्तीने लगट करून तिचा विनयभंग केला. तसेच झालेला प्रकार कोणालाही सांगितला तर तुला सोडणार नाही अशी धमकीही दिल्याची जेलरोडमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहा.पोलिस निरीक्षक भांभिष्टे तपास करीत आहेत.

## देशमुख वस्ती येथे जागेच्या वादातून माय-लेकास मारहाण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर -**



शहरातील देशमुख वस्ती येथे जागेच्या वादातून माय-लेकास जबर मारहाण करण्यात आली.

सखाराम अभिमन्यू घोरपडे (वय ३८), यमुनाबाई अभिमन्यू घोरपडे (वय ६०, रा. देशमुख वस्ती, देगाव, ता. उत्तर सोलापूर) अशी जखमींची नावे असून त्यांच्यावर सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरु आहेत. सोमवारी दुपारी घराजवळ यमनाबाई यांचा पुतण्या नागेश बब्रुवान घोरपडे, प्रदीप नागेश घोरपडे व इतर दोघांनी मिळून जागेच्या वादावरून लोखंडी अँगलने यमुनाबाई व त्यांचा मुलगा सखाराम यांस मारहाण केली. यामध्ये दोघांच्या डोक्यास जबर जखम झाली असून दोघांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - ८९४

**कर्पूरकेळीचीं गर्भ पुटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटें ।**
**पुलिका गळती तेवीं थेंबुटे । नेत्रोंनि पडती ।।**

अर्जुनाच्या विनंतीवरुन भगवंत अर्जुनाला विश्वरुप दाखवित आहेत. हे सत्यस्वरुप पाहून अर्जुन खूप आनंदी झाला आहे. डोळे बंद केले तरी त्याला विश्वरुप दिसत आहे. आत-बाहेर सर्वत्र एक भगवंतच त्याला दिसत आहे सर्वप्राणीमात्रांना एका भगवंताच्या ठिकाणी पाहून अर्जुनाला ईश्वर म्हणजे समतेचे, अभेदयतेचे स्वरुप असल्याचे जाणवले. आपण एक सामान्य जीव असतांनाही भगवंताची अशी विभूती, स्वरुप पाहायला, अनुभवयाला मिळाले याचा अर्जुनाला मनोमन खूप आनंद होत होता. हे विश्वरुप व आपण वेगवेगळे आहोत अशी अर्जुनाची भावना आता संपली होती. अर्जुन मनाने, अंत:करणाने विश्वरुपात विलीन झाला होता. पायापासून मस्तकापर्यन्तचा भाग रोमांचीत झाला होता. पावसाळयाच्या प्रारंभा नंतर पाझर सुटलेल्या पर्वतांचे सर्व भाग कोमल तृणांकुरांनी वेढलेले दिसतात, त्याप्रमाणे अर्जुनाचे सर्वांग रोमांचित झाले होते. चंद्र किरणांच्या स्पर्शाने जसा चंद्रकांत मणी द्रवतो तसे अर्जुनाचे शरीर घर्मबिंदुनी दाटले होते. कमल कोशात अडकलेल्या भ्रमराच्या हालचालीने कमलकळी जशी पाण्यावर इकडे तिकडे झोके घेते, त्याप्रमाणे अर्जुनाचे आंतरीक सुखाच्या उसळीने त्याचे शरीर बाहेर कापत होते. या अनुषंगाने बोलतांना संजय म्हणाला, कर्पूरकेळीचीं गर्भपूटें । उकलतां कापुराचेनि कोंदाटें । पुलिका गळती तेवीं थेंबुटे नेत्रोंनि पडती ।।. अर्थात, कापूर ज्या केळीत तयार होतो, त्या केळीच्या गाभ्यावरील सोपटे उकलीत असता, आत कापूर कोंदल्यामुळे प्रत्येक सोपटांतून कापराचे कण खाली पडतात. त्याप्रमाणे अर्जुनाच्या डोळयातून आनंदाश्रु पडत होते.


ज्ञानेश्वर महाराज

भरलेल्या सागराला जशा चंद्रोदयाने भरत्या येतात, तसा अर्जुन सुखाच्या भावनेने प्रत्येक क्षणी उचंबळून येत होता. अर्जुनाप्रमाणे संजयही आनंदाश्रु गाळत होता. त्यालाही आनंदाने उचंबळून येत होते. राजा धृतराष्ट्रालाही या आनंदात सहभागी होता आले असते, पण पुत्रमोहाने मोहीत झालेला राजा पुत्रमोहाशिवाय, पुत्राच्या विजयाशिवाय इतर कांही ऐकुच इच्छित नव्हता. हा राजा केवळ डोळयाने आंधळा नव्हता तर तो मनाने, अंत:करणानेही आंधळा आहे असे संजयाला वाटत होते. त्या विश्वरुपाचे आनंदाने अर्जुन दर्शन घेता होता. पाहिल तिकडे एक विश्वरुपच त्याला दिसत होते. म्हणून तो चोहीकडे या विश्वरुपाला नमस्कार करीत प्रभुच्या नांवाने जयजयकार करीत होता. संजयही बसल्या ठिकाणाहून या विश्वरुपाला नमस्ते, नमस्ते म्हणत होता. या विश्वरुपात सर्व जीवमात्राला एकत्र पाहिल्याने अर्जुनाला समतेची दृष्टी प्राप्त झाली होती. हे सर्व चराचर म्हणजेच ब्रम्ह असे जाणवत होते. आपण माणसा-माणसांत, जीवमात्रात अकारण भेद करतो. ईश्वराला सर्व समान असतांना, आपण असमानता पाळतो. ईश्वर म्हणजे दुसरे-तिसरे कांही नसुन या सर्व जीवमांत्राची गोळा बेरीजच होय. ईश्वर नाही असे स्थानच नाही, अशी अर्जुनाची आता खात्री पटली होती. माणसाणे स्वत:ला मी-मी म्हणण्याचे कांही कारण नाही, कारण माणूस या विश्वरुपाचाच एक भाग आहे, असे अर्जुनाच्या लक्षात आले. आपणही अर्जुनाप्रमाणे प्रत्येक प्राणीमात्रात ईश्वराला पाहू या. मी पणाच्या भोव-यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करु या. मी पणाच्या भोव-यातून बाहेर पडण्याची मानसीक तयारी म्हणजे आत्म सुखाच्या वाटेवर चालण्यास प्रारंभ होय. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : मंगळवार
दि. २४ सप्टेंबर २०२४
विक्रम संवत् २०८०,
शके - १९४६
संवत्सर - क्रोधी नाम
मास - भाद्रपद
कृ. सप्तमी (१२.३८)
ऋतु - वसंत
नक्षत्र- मृग (२१.५३)
योग - व्यतिपात (२५.२५)
करण - बालव (२४.१९)
सुर्योदय - ०६.३०
सूर्यास्त - १८.३१

दिनविशेष -
अष्टमी महालय
मध्याष्टमी श्राद्ध
चांगला दिवस

....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००
सोमवार : स. ७.३० ते ९.००
मंगळवार : दु. ३ ते ४.३०
बुधवार : दु. १२ ते १.३०
गुरुवार : दु. १.३० ते ३.००
शुक्रवार : स.१०.३० ते १२
शनिवार : स. ९ ते १०.३०

### राशीभविष्य

**मेष :** आपले प्रत्येक प्रश्न सध्या महत्त्वाचे आहेत. नोकरी-व्यवसायात सध्या चांगली गती असल्याने कोणताही प्रश्न रेंगाळत राहणे आजतरी परवडणार नाही.

**वृषभ :** आपली नेमकी कोणा-कोणाची गाठ पडते हे लक्षात घेणे आवश्यक आहे. घरातील एखादी व्यक्ती बाहेर जाऊन लवकर न आल्यामुळे जीवाला घोर लागणे शक्य.

**मिथुन :** कितीही कमावले तरी थोडे सबुरीनेच खाणारे आपण आयुष्यही उपभोगण्यासाठी असते हे बऱ्याचदा विसरल्यासारखे असते.

**कर्क :** वैवाहिक जोडीदाराची आपणास मिळणारी साथ आज एखाद्या मोठ्या कामात यश देणारे ठरू शकते.

**सिंह :** आज नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी आपण अतिशय कार्यमग्न राहणार आहात नव्हे तसे राहणे फायद्याचे ठरणार आहे.

**कन्या :** आपणास आपल्या अभ्यासाचा, विचाराचा, चिंतनाचा आणि बौद्धिक कौशल्याचा उपयोग करून घेता येणार आहे.

**तूळ :** आजचा दिवस आपणासाठी आरोग्याकडे लक्ष द्यायला लावणारा ठरू शकतो. खाण्यापिण्यावर थोडेसे निर्बंध ठेवा. नोकरी-व्यवसायात आगामी काळाचा विचार करण्यासाठी बरेच पर्याय समोर असणार आहेत.

**वृश्चिक :** आर्थिकदृष्ट्या आज आपण कितीही मोठे-लहान अवश्य घेऊ शकता. बऱ्याच महत्त्वाच्या निर्णयांमध्ये आजचा दिवस संस्मरणीय ठरणार आहे.

**धनू :** विचारातला भडकपणा मुळातूनच टाळायचा आहे. आरोग्याकडे लक्ष द्यायचे आहे. आज होणाऱ्या व्यवहारात उगाच कोणाचा खोटा आळ येणार नाही असे पाहा.

**मकर :** जे काही असेल ते अतिशय चांगले असणे हा आपला स्थायी भाव आहे.

**कुंभ :** आज खाण्यापिण्याकडे थोडेसे बारीक लक्ष असणे हिताचे असणार आहे. नवीन मित्रांसमवेत चुकून काही खाल आणि नसते उद्योग पाठीशी लागतील.

**मीन :** अपेक्षित आणि आवश्यक असे प्रवास काहीजणांच्या बाबतीत शक्य आहे. नोकरी-व्यवसायातील एखादा महत्त्वाचा निर्णय आरामात घेऊ शकाल.

# शिक्षक संघटनेचा बुधवारी आक्रोश मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने बुधवार दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता शासनाच्या चुकीच्या धोरणा विरोधात आक्रोश मोर्चाचे काढण्यात येणार आहे, अशी माहिती शाम राव जवंजाळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. चार हुतात्मा पुतळा ते जिल्हा परिषद सोलापूर (हरिभाई देवकरण प्रशाला मार्गे) हा पायी मोर्चा काढला जाणार असून जिल्हा परिषद उपोषण गेट येथे मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत होईल. या मोर्चात जिल्हाभरातून हजारो शिक्षक, पालक, ग्रामस्थ, विद्यार्थी सहभागी होणार आहेत, अशी माहिती समन्वय समितीच्या वतीने देण्यात आली.



दरम्यान, आंदोलनाची सुरुवात १७ सप्टेंबर पासून झाली असून तीन टप्प्यांत आंदोलन केले जात आहे. आता तिसऱ्या टप्प्यात २५ सप्टेंबर रोजी पायी मोर्चा काढला जात आहे. १५ मार्चचा संचमान्यतेचा शासन निर्णय रद्द करावा. २० किंवा २० पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांच्या बाबतीत कार्यरत शिक्षकाचे एक पद बंद करण्याचा आणि कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त व अन्य नियुक्ती देण्याचा ५ सप्टेंबर २०२४ चा शासन निर्णय रद्द करावा. विद्यार्थी आधार कार्ड संबंधाने असणाऱ्या वास्तव अडचणी लक्षात घेऊन आधार कार्ड आधारित शिक्षक पद निर्धारण धोरण रद्द करावे.

शैक्षणिक-अशैक्षणिक कामाच्या शासन निर्णयात शिक्षक संघटनांसह चर्चा करून दुरुस्ती करावी. १ नोव्हेंबर २००५ नंतर नियुक्त सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना १९८२-८४ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. विद्यार्थ्यांना मोफत गणवेश विनाविलंब मिळावेत. २०२४-२५ वर्षात राबविली गणवेश योजना रद्द करुन जुन्याच पद्धतीने गणवेश योजना कार्यान्वित करावी, अद्यापही अनेक ठिकाणी पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. त्याठिकाणी तातडीने पाठ्यपुस्तके व पुरवावीत. पाठ्यपुस्तकांना कोरी पाने न देता स्वतंत्र स्वाध्याय पुस्तिका द्याव्यात. जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांना मुख्यालयी निवासाची सक्ती रद्द करणे. राज्यातील शिक्षकांना १०-२०-३० सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करावी. सर्व पदवीधर विषय शिक्षकांना सरसकट पदवीधर वेतनश्रेणी मिळावी. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात / अधिसूचना निघालेल्या आणि नंतर सेवेत आलेल्या जिल्हा परिषदांच्या शाळांतील शिक्षक व जि प कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १९८२ च्या पेन्शनचे आदेश निर्गमित करावे. अनुकंपा तत्त्वावर नियुक्त शिक्षकांना टीईटी अनिवार्यतेचा शासन निर्णय रद्द करावा यासह विविध मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे. प्रशांत गंभिरे, विरभद्र यादवाड, बसवराज गुरव, संजीव चाफाकरंडे, अनिरुद्ध पवार, मच्छिंद्रनाथ जेरापुरे, दत्तात्रय काकडे, रविराज खडाखडे आदी उपस्थित होते.



# महापालिकेच्यावतीने कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त सम्राट चौक येथील त्यांच्या पुतळ्यास उपायुक्त आशिष लोकरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी प्र.कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा, माजी गटनेते आनंद चंदनशिवे, डॉ. श्रीकांत येळेगावकर, इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर, माधुरी पाटील, केतन शहा, कर सल्लागार धीरज जवळकर, संस्था सदस्य डॉ. सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापिका कल्पना सर्वगोड, प्रतीक चंदनशिवे, शिवम सोनकांबळे, महादेव बागल, रामचंद्र हक्के, अंजली पिराले, राहुल कांबळे, उपस्थित होते.

● महाराष्ट्र राज्य तेलुगु भाषिक एकता संघर्ष समितीची स्थापना

# राज्य निमंत्रकपदी डॉ.सुंचू तर अध्यक्षपदी संगा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

महाराष्ट्र राज्य तेलुगु भाषिक एकता संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली आहे. राज्य निमंत्रकपदी डॉ. गोवर्धन सुंचू तर राज्य अध्यक्षपदी श्रीनिवास संगा यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती हणमंतु सायबोळू यांनी पत्रकार परिषदेत दिली.

राज्यातील विविध जिल्ह्यातील तेलुगु भाषकांच्या आग्रहास्तव या समितीची स्थापना करण्यात आली आहे. लवकरच या समितीची राज्य कार्यकारणी जाहीर करण्यात येणार आहे. तेलुगु भाषेत आर्थिक महामंडळ स्थापन करावे. एक हजार कोटी रुपये अनुदान या महामंडळास द्यावे. अल्पभाषिक समाजातील सर्व सवलती मिळाव्यात. एसबीसी व ओबीसी साठी सवलती कायम ठेवाव्यात. तेलुगु भाषकांना जीएसटी मध्ये सवलत मिळावी. राज्यातील महिला विडी कामगारांना तेलंगणाच्या धर्तीवर किमान तीन हजार




रुपये पेन्शन महाराष्ट्र शासनाकडून मिळावी. महाराष्ट्र राज्यात जास्तीत जास्त प्रमाणात तेलुगु बीडी कामगार काम करीत असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा विचार करून धूम्रपान कायद्यातून विडी उद्योग वगळण्याची शिफारस महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे करावी. तेलुगु भाषिकांसाठी शिक्षण क्षेत्रात आरक्षण वाढवून द्यावे यासह विविध मागण्यांसाठी पाठपुरावा करण्यात येणार आहे, असे डॉ. गोवर्धन सुंचू आणि श्रीनिवास संगा यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस तिप्पणा गणेरी, अंबादास देवरे, नागप्पा कणकी, बालाजी श्रीचिप्पा, देविदास गुंडेटी, बालाजी जक्का, भास्कर तमनुर आदी उपस्थित होते.

# भांडणामुळे महिलेचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

सोलापूर - नवरा-बायकोचे भांडण झाल्याने पत्नीने आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना २२ सप्टेंबर रोजी रात्री ११ च्या सुमारास घडली.

सुनिता उत्तम शिंदे (वय ३५, रा. सात रस्ता म्युनसिपल कॉलनी, सोलापूर) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिलेचे नाव आहे. सुनिता शिंदे यांनी राहत्या घरी नवरा-बायकोचे भांडणझाल्याने त्या रागाच्या भरात स्वतः चाकूने डाव्या हातावर मारून घेऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्यांना उपचारसाठी रुग्णालयात दाखल केल्यानंतर उपचार करून सोमवारी पहाटेच्या सुमारास पळून गेली. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.



# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात राजभाषा सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

सोलापूर शहरात मध्य रेल्वेच्या विभागीय कार्यालयामध्ये १६ ते २० सप्टेंबर या कालावधीत राजभाषा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राजभाषा विभागातील कर्मचाऱ्यांनी विविध शाखांमध्ये दि. १६, १७ सप्टेंबर टेबल प्रशिक्षण दिले आणि दिनांक १८ सप्टेंबर रोजी कंप्यूटर प्रयोगकर्तांना हिंदी टाइपिंग आणि व्हॉईस टायपिंगचे प्रशिक्षण देण्यात आले.

अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक व अतिरिक्त मुख्य राजभाषा अधिकारी अंशुमाली कुमार यांच्या अध्यक्षतेखाली हिंदी दिन सोहळ्याचे आयोजन आणि विभागीय राजभाषा कार्यान्वयन समिती, सोलापूरची त्रैमासिक बैठक आणि महाव्यवस्थापकांचा हिंदी दिन संदेशचे वाचन आणि राजभाषा त्रैमासिक संदेश सूचनापत्राचे विमोचन करण्यात आले. यावेळी विभागीय स्तरावर आयोजित हिंदी निबंध, वक्तृत्व आणि मसुदा लेखन स्पर्धेतील यशस्वी कर्मचाऱ्यांना अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक व अतिरिक्त मुख्य राजभाषा अधिकारी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. सूत्रसंचालन सहायक कार्मिक अधिकारी आणि संपर्क राजभाषा अधिकारी एस.एल. खोत यांनी केले. सभा यशस्वी करण्यासाठी राजभाषा विभागाचे व्ही.बी. काडगे, मुश्ताक शेख, शिवसाहेब यादव, किरण माने यांनी योगदान दिले.

# एसआरपीएफ कॅम्प येथे वृक्षारोपण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

एक मूल एक झाड या योजनेअंतर्गत श्री सिद्धेश्वर इंग्लिश मीडियम हायस्कूलकडून एसआरपीएफ कॅम्प गट क्रमांक १० येथे वृक्षारोपण करण्यात आले.



वृक्ष लागवड संगोपन व संवर्धन हाच आमच्या संस्थेचा यावर्षीचा उपक्रम असून विद्यार्थ्यांकडून स्वेच्छेने झाडांची रोपे संकलित करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्येही लहानपणापासूनच याविषयीची जागरूकता सतत असावी यासाठी हा उपक्रम राबविला गेला. कार्यक्रमाची प्रेरणा श्री सिद्धेश्वर देवस्थान शिक्षण समितीचे सदस्य व गुणवत्तावाढ शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. राजशेखर येळीकर यांच्याकडून मिळाली. तसेच त्यास मूर्त स्वरूप मुख्याध्यापक योगेश राऊत पर्यवेक्षिका नीता तमशेट्टी यांच्या सहयोगाने प्राप्त झाले. वृक्षारोपण कार्यक्रमास विद्यार्थी तसेच पालकांची ही उपस्थिती होती. सांस्कृतिक विभाग प्रमुख विजयालक्ष्मी बिराजदार, कविता बिराजदार, प्रतिमा ठाकूर तसेच वैशाली नाडगीर सुधा उमदी, अर्चना रामपुरे, मोहिनी घंटे, वैष्णवी बिजर्गी, ज्योती अरिकेरी, कुलदीप कमळे, परवेज पटेल नागेश माळगे आदींनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

कार्यक्रमास राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १० सोलापूर येथील पोलीस निरीक्षक डी. जी. शेडमाके, पोलीस निरीक्षक एस. पी. पोटे, प्रशस्त पो. नाईक गजानन मेटकरी, पोलीस नाईक मल्लू बिराजदार यांचे सहकार्य लाभले.

# कार्यालयीन कामकाजात हिंदी भाषेचा वापर करावा

● बँक ऑफ महाराष्ट्र सर्कल मॅनेजर संजीव कुमार यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

आपापल्या कार्यालयात हिंदी भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा आणि दैनंदिन कार्यालयीन कामकाजात हिंदी भाषेचा वापर करण्याची आवश्यकता असल्याचे मत बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर सर्कल मॅनेजर संजीव कुमार यांनी व्यक्त केले.



परिमंडळ व्यवस्थापन व उप-परिमंडळाच्या वतीने अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. संजीव कुमार आणि डेप्युटी सर्कल मॅनेजर अभिषेक दुबे यांच्या उपस्थितीत हिंदी महिन्याच्या मुहूर्तावर एका विशेष कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी सोलापूर झोन उपव्यवस्थापक (राजभाषा) बिनय प्रसाद साव उपस्थित होते. नवनियुक्त स्केल वन अधिकाऱ्यांना राजभाषा धोरणातील महत्त्वाच्या मुद्यांची जाणीव करून देणे आणि त्रैमासिक अहवाल दाखल करण्याच्या प्रक्रियेची त्यांना ओळख करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या कार्यशाळेत राजभाषा विभाग सोलापूरच्या वतीने करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती देण्यात आली आणि नरकांच्या संक्षिप्त परिचयासोबतच दैनंदिन कार्यालयीन कामकाजात हिंदी भाषेचा वापर करण्याची आवश्यकता व महत्त्व पटवून देण्यात आले. परिमंडळ व्यवस्थापन व उप-परिमंडळाच्या वतीने अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी आपापल्या कार्यालयात हिंदी भाषेचा जास्तीत जास्त वापर करावा, अशी विनंतीही त्यांच्यासमोर करण्यात आली. कार्यशाळेला उपस्थित अधिकाऱ्यांनी या उपक्रमाचे स्वागत केले आणि राजभाषेबाबत आपली बांधिलकी व्यक्त केली. त्यांच्या प्रतिक्रियांवरून त्यांना त्यांच्या अधिकृत कामात हिंदीचा वापर वाढवण्याची प्रेरणा मिळाल्याचे स्पष्ट झाले.

# विद्यापीठाच्या सभागृहात कर्मवीरांचे तैलचित्र लावणार

● प्र. कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची द्वारे खुली केली. त्यांच्यासाठी कमवा व शिका योजना कार्यान्वित केली. त्यांची हीच तत्वे विद्यापीठाने सुद्धा अंगीकारली आहेत. त्यांच्या कार्याचे सतत स्मरण व्हावे म्हणून विद्यापीठाच्या सभागृहात कर्मवीरांचे भव्य तैलचित्र लावण्यात येईल असे प्रतिपादन विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी व्यक्त केले.



### रयत शिक्षण संकुलाच्या वतीने शोभायात्रा

रावजी सखाराम हायस्कूल, प्राथमिक विभाग व ज्युनिअर महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कर्मवीरांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा सम्राट चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, बुधवार पेठ, छत्रपती शिवाजी चौक या मार्गावरून काढण्यात आली. लेझीम, झांज पथक, टिपऱ्याच्या तालावर विद्यार्थ्यांनी केलेले नृत्य पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी कर्मवीर अमर रहे, रयत शिक्षण संस्थेचा विजय असो, स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद अशा घोषणा दिल्या.

पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त सम्राट चौकातील कर्मवीरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केल्यानंतर ते बोलत होते. यावेळी मनपा उपायुक्त आशिष लोकरे, आनंद चंदनशिवे, डॉ. श्रीकांत येळेगावकर, इतिहास अभ्यासक नितीन अणवेकर, माधुरी पाटील, केतनभाई शहा, प्रख्यात कर सल्लागार धीरज जवळकर, संस्था सदस्य डॉ. सुरेश ढेरे, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापिका कल्पना सर्वगोड, प्रतीक चंदनशिवे, शिवम सोनकांबळे, महादेव बागल, रामचंद्र हक्के, अंजली पिराले, राहुल कांबळे, उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य संतोष वालवडकर यांनी केले. सूत्रसंचलन गजानन गोरे यांनी केले तर आभार आण्णा दिक्षित यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रकला भोरे, अमर देशमुख, अंकुश राठोड, अझहर शेख, वंदना डांगे, साजेदा बागवान, प्रतिभा भोसले, वनिता व्होटकर, मीनाक्षी बिराजदार, अंजली कोळी, महावीर आळंदकर, सुनीता पाटील, गौतम शिंदे यांनी प्रयत्न केले.

**रयत शिक्षण संकुलात कर्मवीर जयंतीनिमित्त अभिवादन**



# जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत राजराजेश्वरी प्रशाला द्वितीय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ सप्टेंबर-**

राष्ट्रीय विज्ञान नाट्य महोत्सवाच्या निमित्ताने राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धेत विनायक नगर येथील राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेने ६२ गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविले. प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी और हम हे विज्ञान नाट्य सादर केले.

जिल्हास्तरीय स्पर्धा सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेत पार पडल्या. राजराजेश्वरी माध्यमिक प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेत आर्टिफिशियल इंटेलिजन्स कृत्रिम बुद्धिमत्ता या विषयावर हे नाट्य सादर केले. रोहित बसुदे, कार्तिक बोम्मा, भाग्येश पवार,श्रीचरण निली, नंदकिशोर सामल, दिलीप प्यारकी, संगीता कलशेट्टी, संगीता माळी, शितल फुलारी, शमिका जाधव, श्रद्धा माने, राकेश पाटील, गायत्री गिनानी आदी विद्यार्थ्यांनी नाटिकेचे सादरीकरण केले. प्रशालेचे विज्ञान शिक्षक शीतल पाटील यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले असून सहशिक्षिका संगीता नरगिडे यांचे सहकार्य लाभले.

प्रशालेच्या यशाबद्दल माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप, संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदींनी अभिनंदन केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त



### सामाजिक शास्त्राच्या आधारे कौशल्य विकसित करा : अणवेकर

**अक्कलकोट, दि.२३ सप्टेंबर**


महाविद्यालयीन जीवनात सामाजिक शास्त्राच्या आधारे विद्यार्थ्यांनी आपले जीवन कौशल्य आत्मसात करावे, असे आवाहन इतिहास संशोधक नितीन अणवेकर यांनी केले. अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे सी. बी. खेडगी महाविद्यालयात आयोजित सामाजिक शास्त्र मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना आयोजित सामाजिक शास्त्र मंडळाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शिवराय अडवितोट होते. डॉ. अडवितोटे ायंनी ग्रामीण ते जागतिक पातळीपर्यंत पर्यटनाचे स्वरूप कसे बदलत आहे, याचे विश्लेषण करताना, पर्यटन हे लोकल टू ग्लोबल झाले असून बदलत्या तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विद्यार्थ्यांनी आपले स्वतःचे जीवन सुसह्य करावे, असे मत व्यक्त केले. प्रास्ताविक भाषण डॉ. किशोर थोरे यांनी केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. लक्ष्मी रेड्डी यांनी करुन दिला. सूत्रसंचालन डॉ. लता हिंडोळे यांनी केले. आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. गुरुसिद्धय्या स्वामी यांनी केले. याप्रसंगी अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. गणपतराव कलशेट्टी, प्रा. सिद्धाराम पाटील, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अप्पासाहेब देशमुख उपस्थित होते.



### निराशेतून अपयश येते तर मनाच्या प्रसन्नतेवरच प्रगती शक्य : श्रुती पाठक

**अक्कलकोट, दि. २३ सप्टेंबर-**

जीवनाच्या वाटेवर मनाची प्रसन्नता आपल्या प्रगतीस तर मनाची निराशा आपल्या अधोगतीस कारणीभूत ठरत असते. मन खंबीर असेल तर खूप कमी सामग्री असताना आणि परिस्थिती पूर्णपणे विरोधात असली, तरी हमखास यश प्राप्त करता येते, असे प्रतिपादन डोंबिवलीच्या सामाजिक कार्यकर्त्या श्रुती पाठक यांनी केले. कर्नाटक लिंगायत एज्युकेशन सोसायटी संचलित मंगरूळे प्रशालेत सेवानिवृत्त शिक्षक सिद्धप्पा इचगे यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त आयोजित 'मन करा रे प्रसन्न' या विषयावर श्रुती पाठक बोलत होत्या. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक नंदाजी कदम होते. यावेळी माजी नगरसेवक रामचंद्र समाणे, उद्योगपती प्रफुल्ल इचगे उपस्थित होते. प्रारंभी सिद्धप्पा इचगे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मुख्याध्यापक नंदाजी कदम यांनी प्रास्ताविक भाषण केले. परिचय अभिजित लोके यांनी करून दिला. यावेळी बसवराज इचगे, प्रा. विजयकुमार स्वामी, अमोल पाटील, माधव कुलकर्णी, अप्पाराव पाटील, शिवशरण इचगे, स्वामीनाथ आलदी, अभिमन्यू ताड, भीमाशंकर नवभागे, शिवानंद जमगे, अरुण शिंदे, सिद्धाराम लाळशेरी, तन्मय इचगे उपस्थित होते. सूत्रसंचालन जयंत उपासे यांनी केले, तर प्रफुल्ल इचगे यांनी आभार मानले.



### अक्कलकोटमधील समर्थ पार्कतर्फे बालाजी हादवे यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. २३ सप्टेबर-**

अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक सोसायटी याच्यावतीने गुणवंत आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ साठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सिंदखेडचे उपशिक्षक बालाजी हादवे यांची निवड झाल्याबद्दल समर्थ पार्क सोसायटी मैंदर्गी रोडच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी योगेश बारसकर, गजानन मिराशे, गणेश माळी उपस्थित होते. वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, मनोज जाधव, सुधाकर काशेट्टी, जयंत कोतवाल, पंचायत समितीचे माजी सदस्य सिद्धेश्वर मठपती, प्रविण देशमुख, ज्योतिषी सल्लागार, चन्ना स्वामी, बाळशंकर फुलारी, मेजर संदीप सलगरे, किशोर खरात, विश्वनाथ सुतार, तात्या जामदार, सागर इंगळे, पुंडलिंक बिराजदार, रत्नाकर गुरव, महेश बंदिछोडे यांनी अभिनंदन केले.



### आयकर उपायुक्त कवी महेश लोंढे यांना कविवर्य ना. धो. महानोर पुरस्कार प्रदान

**कुर्डूवाडी, दि. २३ सप्टेंबर-**

बारलोणी (ता. माढा) येथील कवी महेश दत्तात्रय लोंढे यांना सेंटरचे अध्यक्ष शरदचंद्र पवार व जैन फाउंडेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्या हस्ते कविवर्य ना. धो. महानोर पुरस्कार प्रदान करण्यात आला. महेश लोंढे हे सध्या पुणे येथे उपायुक्त म्हणून इन्कम टॅक्स विभागात कार्यरत आहेत मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर व जळगावच्या भवरलाल अँड कांताबाई जैन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रानकवी ना. धो. महानोर यांच्या नावाने त्यांच्या स्मरणार्थ साहित्य आणि शेती, पाणी या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी एकूण सहा पुरस्कार जाहीर केलेले होते. यापैकी चार पुरस्कार साहित्य व दोन पुरस्कार शेती व पाणी यासाठी दिले गेले. त्यांनी आजवर नवाक्षर दर्शन, नवा अनुष्टुभ, अभिधानंतर, परिवर्तनाचा वाटसरू इत्यादी नियतकालिकात नियमित कविता लेखन केलेले आहे. तसेच त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झालेला आहे. सध्या ते आपल्या पहिल्या कादंबरीवर काम करीत आहेत.

# शेतीसाठी आता दिवसाच वीज, संपूर्ण बील माफ

## उपमुख्यमंत्री अजित पवार : टेंभुर्णी येथील जनसन्मान यात्रेत हमी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि. २३ सप्टेंबर-**

शेतकऱ्यांना तीन, पाच व साडेसात एचपी वीज मोफत देणार असून मागचे पण बिल माफ करणार आहे. यापुढे शेतकऱ्यांना फक्त दिवसा वीज देणार असल्याची महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी केली.

टेंभुर्णी येथे रविवारी झालेल्या जनसन्मान यात्रेत ते बोलत होते. अजित पवार म्हणाले की, टेंभुर्णीत आल्यावर बहिणींनी रक्षाबंधन केले. किती दिवस झाले रक्षाबंधन झाले आहे? क्वचितच एखाद्या भावाला जिव्हाळा, प्रेम मिळतो. महापुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राज्यकारभार सुरू आहे. संत सावता महाराजांच्या संजीवन समाधी असलेल्या अरण येथील संत सावता माळी जन्मभूमीस अ वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा दिला आहे. यामुळे भरीव निधी उपलब्ध होईल. आ. बबनराव शिंदे हे यासाठी सतत पाठपुरावा करीत आहेत.तीर्थक्षेत्राचा विकास करण्याचा शब्द देतो. तेथे भक्त निवास व वास्तू शिल्पाचे उद्‌घाटन झाले आहे. सर्वांनी संतांचे विचार आचरणात आणण्याची गरज आहे असे ते म्हणाले. पूर्वी कुसळाशिवाय काही उगवत नव्हते तेथे उजनी धरण झाल्याने समुद्राएवढे पाणी उशाला आले. बॅकवॉटरमुळे उपसा सिंचन झाले. ज्वारी पिकत नव्हती, तेथे लाखो टन ऊस पिकवला जात आहे. हे बबनदादांच्या दूरदृष्टीमुळे होत आहे. शेतकऱ्यांना आर्थिक संपन्न करण्याचा प्रयत्न दादांचा असून एमआयडीसी उभारण्यात आली. तेथे मोठे उद्योग यावेत त्यासाठी त्यांचा प्रयत्न आहे.



### शपथा कशाला घेताय?

माढा मतदारसंघातील विरोधकांना उद्देशून पवार म्हणाले की, एकास एक उमेदवार देण्यासाठी देवळात जाऊन शपथा काय घेताय. स्वतःवर विश्वास राहत नाही, तेव्हा शपथ घ्यायची वेळ येते. लाथ मारीन तिथे पाणी काढीन अशी धमक असल्यासही वेळ येत नाही

### निवडणुकीत आशीर्वाद द्या : आ. बबनदादा शिंदे

अजितदादांनी माढा, बार्शी, उपसा योजना, खैराव, मानेगाव, अंजनगाव खे. या योजना मंजूर करून दिल्या. दोन वर्षात ५५० कोटींची कामे मंजूर केली. १३५ कोटींचा दुष्काळ निधी माढा मतदारसंघात मिळाला आहे. कुंभेज-माढा पूल, तहसील इमारत, नगरपंचायत, निधी ही कामे दादांच्या मार्गदर्शनाखाली झाली आहेत. माढा, पंढरपूर, माळशिरसमध्ये प्रत्येक योजनेस पैसे दिले. अनेक गोष्टी दादांच्या माध्यमातून केलेल्या आहेत. निवडणुकीत सर्वांनी आशीर्वाद द्यावा असे आवाहन आ.बबनराव शिंदे यांनी केले.

पवार पुढे ते म्हणाले की, तुम्हाला सक्षम, सबला करावयाचे आहे. शेतात राबणारी महिला, गोरगरीब महिला अशा बहिणींना आर्थिक ताकद दिली पाहिजे. यासाठी सर्वांनी योजना तयार केली आहे. आतापर्यंत ४६ हजार कोटी दिले आहेत. महिलांना काय घ्यावेसे वाटले तर पैशाअभावी मुरड घालावी लागते. एक कोटी साठ लाख महिलांना रक्कम मिळाली आहे. कोणी राहिले असल्यास तातडीने आणखी फार्म भरून द्या, असे आवाहन त्यांनी केले. मोफत वीज, मुलींना फ्री शिक्षण, एक रुपयात पीकविमा, सारथी अमृत योजना, महाज्योति योजना या योजनाद्वारे सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न आहे. तुम्हाला मानसन्मान, सबला करतोय. ही संकल्पना महायुतीची आहे. राज्य पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. आ. दादांची साथ सोडू नका असा सल्ला अजित पवारांनी उपस्थित सर्वांना दिला. प्रास्ताविक शिवाजी पाटील यांनी केले तर आभार रमेश पाटील यांनी मानले.

यावेळी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, महिला अध्यक्षा रुपाली चाकणकर, आ. संजयमामा शिंदे, कल्याणराव काळे, रणजितसिंह शिंदे, समन्वयक लतीफ तांबोळी, वामनराव उबाळे, संजय पाटील-भीमानगरकर, तुकाराम ढवळे, सुहास पाटील-जामगावकर, कैलास तोडकरी, शंभूराजे मोरे, वसीमभाई बुऱ्हाण, संभाजी पाटील, शब्बीर जहागीरदार, विद्या पाटील, सविता जगताप आदी उपस्थित होते.

## १५०० किमी सायकल प्रवासाला निघाला करकंबचा ध्येयवेडा तरुण

### प्रवासामध्ये देणार स्वच्छता, पर्यावरण रक्षणाचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.२३ सप्टेंबर-**

एखाद्या व्यक्तीने जर एखादी गोष्ट जिद्दीने करावयाची ठरविल्यास ती व्यक्ती त्याने ठरविलेल्या कार्यात नक्कीच यशस्वी होते यात शंका नाही. स्वच्छता व पर्यावरण रक्षणाचा संदेश विविध ठिकाणच्या नागरिकांना देण्यासाठी करकंब येथील असाच एक २७ वर्षीय ध्येयवेडा तरुण नागेश नाना खारे जंजिरा किल्ला, लोणावळा, कोरेगड, लोहगड, सिंहगड, पुरंदरकिल्ला, जेजुरी, मोरगाव, सिद्धटेक, करकंब या मार्गावरून १३ दिवसांमध्ये सायकलवरुन १५०० किमीचा प्रवास करणार आहे.

पंढरपूर येथील संत नामदेव पायरीचे दर्शन घेऊन त्यांनी प्रवासाला सुरुवात केली. या मार्गावरून प्रवास करताना स्वच्छता व पर्यावरण रक्षणाबाबत त्या परिसरातील नागरिकांमध्ये जनजागृती करण्याच्यादृष्टीने प्रबोधन करणार आहेत. आपले घर व घराभोवतीचा, गावाचा परिसर कशाप्रकारे स्वच्छ ठेवण्यात यावा, तो परिसर स्वच्छ ठेवल्यास सर्वांचेच आरोग्य निरोगी होण्यास मदतच होणार आहे. वाहने, कारखानदारीच्या वाढत्या संख्येमुळे वातावरण प्रदूषित होत आहे. त्यासाठी सर्वांनी झाडांची लागवड करून त्यांचे योग्य रीतीने संगोपन केल्यास ऑक्सिजन वाढीस मदतच होणार आहे. जास्तीत जास्त नागरिकांनी वृक्षांची लागवड करून ती जोपासावी यासाठी या मार्गावरील नागरिकांमध्ये जनजागृती, स्वच्छता व पर्यावरण रक्षणाबरोबरच गड किल्ल्यांना भेटी देताना त्यांचे पावित्र्य कसे राखावे, स्वच्छता कशी करता येईल याबाबतही जनजागृती करणार असल्याचे त्यांनी सांगितले. २२ इंची साध्या सायकलवरून हा तरुण प्रवास करणार आहे.



> माणसा आता तरी जागा होशील का? एक तरी झाड लावशील का? आता वाढल्या पाहिजेत वृक्षवेली.तुकारामांच्या अभंगातील वृक्षवल्ली. फुलतील वने येथील पक्षी गातील मंजुळ गाणी. चराचरातून फुटतील झरे, दऱ्याखोऱ्यातून खळखळेल पाणी. सावलीसाठी झाड नाही, पाण्यासाठी आड नाही. नाही आंबरी पाखरांचा थवा करपतो अंकुर उगवण्यापूर्विच नवा.
>
> **-नागेश खारे,** टीम सदस्य, जागर स्वच्छता, करकंब गावच्या लेकीच झाड अभियान

## वागदरीत एकावर हल्ला; चौघांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ सप्टेंबर-**

तालुक्यातील वागदरी येथे फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने लोखंडी धारदार हत्याराने फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. याबाबत उत्तर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून अहमद शेख, प्रकाश सोनकांबळे दोघे (रा. पुणे), प्रेमरतन उर्फ बापू मुंदीनकेरी (रा. वागदरी, ता. अक्कलकोट) ही आरोपींची नावे आहेत.

याबाबत उत्तर पोलीस ठाण्यात गोविंद साईनाथ वडतिले (वय २८), यांनी फिर्याद दिली आहे. २० सप्टेंबर २४ रोजी रोजी सकाळी दहाच्या सुमारास वागदरी ते अक्कलकोट जाणारे मुख्य रोडवर सिद्धगंगा ढाब्यापासून काही अंतरावर दोन महिन्यांपूर्वी अहमद याच्यासोबत झालेल्या मोबाईलवर झालेल्या वादाचा राग मनात धरुन अहमद शेख, जावेद शेख, प्रकाश सोनकांबळे तिघे (रा. पुणे) प्रेमरतन उर्फ बापू मुंदीनकेरी यांनी संगनमत करुन अहमद शेख याने पायाने फिर्यादीच्या पोटात मारल्यावर फिर्यादी जमिनीवर पडला. तेव्हा प्रेमरतन उर्फ बापू मुंदीनकेरी याने फिर्यादीस लाथाने मारहाण केली. प्रकाश सोनकांबळे याने माझ्या मित्राशी वाद घालता काय? असे म्हणून शिवीगाळी, दमदाटी करत फिर्यादीच्या शर्टाची गच्ची धरुन उठवल्यावर जावेद शेख याने हातात दगड घेऊन त्या दगडाने फिर्यादीच्या डावे मानेवर, छातीवर डावे बाजूस व डावे खांद्यावर मारले. अहमद शेख याने 'तू आता यापुढे माझ्याशी पुन्हा वाद घालणार नाहीस, तुला जीवंत सोडणार नाही, असे म्हणून तालुक्यातील वागदरी येथे फिर्यादीला जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने कोणत्यातरी लोखंडी धारदार हत्याराने फिर्यादीच्या डोक्यात मारुन गंभीर जखमी केले. बाबत चौघाविरुध्द गुन्हा दाखल झाला असून एका आरोपीस अटक केली आहे

## कुर्डूवाडी बसस्थानकामधील कॉँक्रिटीकारणाचा प्रश्न अखेर मार्गी

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. २३ सप्टेंबर-**

कुर्डूवाडी बसस्थानक परिसरातील कॉँक्रिटीकरणाची मागणी बऱ्याच दिवसापासून होती. आ. संजयमामा शिंदे यांनी निवडून आल्यापासून सातत्याने या विषयीचा पाठपुरावा केला होता. प्रवाशांची खूप मोठी गैरसोय होत होती. पावसाळयांच्या दिवसात तर खूपच बिकट अवस्था होती. धुळीमुळे प्रवासी तसेच स्थानकामधील सर्व व्यायसायिकांना खूपच त्रास होता. हा प्रश्न आता मार्गी लागला असून, कॉँक्रीटीकरणाला सुरुवात झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा यांना जोडणारे महत्त्वाचे बसस्थानक आहे. हजारो वारकरी पंढरपूरला व कोल्हापूर, कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात प्रवासी वाहतूक होत असते. पंढरपूर चौक ते अहिल्यादेवी होळकर चौक हा रस्त्याची उभारणी चालू असून बस स्टँडचेही काम लवकरच पूर्ण होणार आहे.

या कामाचे उद्‌घाटन निमगावचे सरपंच यशवंत शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डेपो मॅनेजर रत्नाकर लाड, वाघमारे, माजी नगरसेवक बाबासाहेब गवळी, अर्जुन बागल, दादा गोरे, संजय गोरे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष दत्ताजी काकडे, आरपीआयचे आकाश जगताप, वसीम मुलाणी, अय्युब मुलाणी, वालिम मोहम्मद मुलाणी, हरिभाऊ बागल, माजी नगरसेवक नितीन पवार, वंचितचे शहराध्यक्ष प्रदीप सोनटक्के, श्रीकांत पाटील, शिवसेनेचे समाधान दास, भाजपा शहराध्यक्ष अतुल फरतडे,ड ॉ. मोहसीन मकनू, मस्जिद बागवान, दर्शन शर्मा, सुभाष खोत, दर्शन काशीद, मनोज् धायगुडे, माऊली बागल, सज्जन लोंढे, अस्लम शेख, हरी भराटे, पांडुरंग सुतार, खरेदी-विक्री संघाचे पप्पू ननवरे, इर्शाद कुरेशी, शिवाजी चौधरी उपस्थित होते.

## अनिल सावंत यांची तुतारीच्या दिशेने वाटचाल

### राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांची घेतली भेट; आतापर्यंत केलेल्या कामांवर चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २३ सप्टेंबर-**

भैरवनाथ शुगरचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांनी रविवारी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे यांची भेट घेतल्याने पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात चर्चा सुरू झाल्या आहेत. पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघामधून तुतारी या चिन्हावर निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असलेले अनिल सावंत यांच्या उमेदवारीवरून बळीरामकाका साठे यांचे सोबत अनिल सावंत आणि त्यांचे बरोबर गेलेले राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे मंगळवेढा शहराध्यक्ष चंद्रशेखर कोंडुभैरी, पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा कार्याध्यक्ष संतोष रंदवे, युवक अध्यक्ष जमीर इनामदार यांची सकारात्मक चर्चा झाली असल्याची माहिती मिळत आहे. अनिल सावंत हे तुतारी या चिन्हावर विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक आहेत. याआधी त्यांनी खा. शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांची भेट घेत राष्ट्रवादी पक्षाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असल्याचे सांगितले आहे. याशिवाय माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचीही त्यांनी नुकतीच भेट घेतली होती. त्यानंतर आता राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीराम काका साठे यांची त्यांनी भेट घेतली आहे. सावंत यांनी याआधी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातील नेत्यांच्या घेतलेल्या भेटीचा संदर्भही यावेळी देण्यात आला. आता याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.



## कायद्याच्या रक्षकांसाठी आता प्रशस्त सहारा

### आ. सचिन कल्याणशेट्टी यांचा पुढाकार; अक्कलकोट येथील दोन्ही पोलीस ठाण्यांच्या इमारत बांधकामासाठी १० कोटी निधी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.२३ सप्टेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील उत्तर आणि दक्षिण पोलीस ठाण्याच्या दोन्ही इमारती या अतिशय जुनाट आणि जीर्ण झाल्या आहेत. त्या दोन्ही पोलीस ठाण्याच्या एकत्रित नवीन बांधकामांसाठी १० कोटी ३४ लाख रुपयांच्या निधीस मंजुरी मिळाली आहे. कित्येक वर्ष प्रतिक्षेत असलेला हा प्रश्न आ. सचिन कल्याणशेट्टी यांच्या पुढाकारातून मार्गी लागला आहे. यामुळे कायद्याच्या रक्षकांना आता प्रशस्त सहारा मिळणार आहे.

महाराष्ट्र व कर्नाटकाच्या सीमेवर अक्कलकोट तालुका असल्यामुळे नेहमीच कायद्याचा प्रश्न ऐरणीवर आलेला. यामुळे या ठिकाणी पोलिसांचा कार्यभार मोठा आहे. त्यांना कामकाज करण्यासाठी आत्याधुनिक आणि सुसज्ज अशी नवीन इमारत फर्निचरसह असणे अत्यंत आवश्यक होते. नेमकी हीच गरजेची बाब ओळखून आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी गृह विभाग आणि पोलीस कल्याण विभागाकडे सतत पाठपुरावा करून १०.३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याने हा प्रश्न निकाली निघाला आहे. थोड्याच दिवसात सुधारित अंदाजपत्रक आणि निविद्याची प्रक्रिया पूर्ण करून इमारत बांधकाम सुरू होणार आहे. अक्कलकोट शहर आणि तालुक्यातील सुमारे १४० च्या आसपास असलेली सर्व गावे या ठिकाणी असणाऱ्या पोलीस प्रशासनावर असणाऱ्या कामाचा ताण कमी होऊन त्यांना अधिक चांगल्या प्रकारे काम करणे सोपे जावे यासाठी सदर इमारतीच्या बांधकामास निधीची मंजुरी मिळणे आवश्यक होते. तो प्रश्न आता पूर्णत्वास जात आहे.

### अशी असणार रचना

तळमजला, वर दोन मजले अशी भव्य दिव्य तीन मजली इमारत बांधली जाणार आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या २८ हजार ४०० चौरस फूट जागेपैकी १८ हजार ९० चौरस फूट जागेत बांधकाम होणार आहे. या प्रकल्पाची निविदा अंतिम करून काम सुरु होणे बाकी आहे.




> अक्कलकोट शहरातील दोन्ही पोलीस ठाण्याच्या इमारती या संस्थानकालीन आहेत. त्या खूपच जीर्ण झाल्याने वाढत्या कार्यभाराला अनुरूप असे कामकाज करणे अडचणीचे ठरत होते. सर्वच शासकीय कार्यालयाच्या इमारती या सर्व सुखसोयीने सुसज्ज आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केलेला असावा. यासाठी सतत पाठपुरावा करून दहा कोटींपेक्षा जास्त निधी मंजूर करून आणलेला आहे.
>
> **- सचिन कल्याणशेट्टी,** आमदार, अक्कलकोट

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## कुर्डूवाडी काँग्रेस अल्पसंख्यांकतर्फे संविधान प्रतीचे वाटप

**कुर्डूवाडी, दि. २३ सप्टेंबर-**

कुर्डूवाडी काँग्रेस अल्पसंख्यक विभागातर्फे प्रेषित पैगंबर यांच्या जयंतीनिमित्त भारताच्या संविधानाचे वाटप करण्यात आले. यावेळी हाफीज सहाब, जामा मशीद सदर नासिर दाळवले, कुर्डूवाडीचे माजी नगराध्यक्ष समीर मुलाणी, माजी नगरसेवक दत्ताजी गवळी, काँग्रेसचे नेते अखलाक दाळवले, तिरंगा ग्रुपचे अध्यक्ष अर्शद मुलाणी, माजी नगरसेवक शकील तांबोळी, ॲड. बी. एस. बागल, काँग्रेस कमिटी शहाराध्यक्ष फिरोज खान, जमीर पठाण, डॉ. संतोष सुर्वे, साबीर शिकलकर, माजी नगरसेवक किसन हनवते, कय्यूम मुलाणी, आर.जी. ग्रुप अध्यक्ष राहुल गायकवाड, बँक मॅनेजर किशोर हजारे, जहाँगीर शेख, जावेद शेख, कुणाल गायकवाड उपस्थित होते. काँग्रेस अल्पसंख्यक शहर अध्यक्ष हमीद शिकलकर यांनी आभार मानले.





## संक्षिप्त वृत्त...

### माढा कला, वाणिज्य महाविद्यालयात कर्मवीर जयंती सप्ताहाचे आयोजन

**माढा, दि. २३ सप्टेंबर-**

माढा कला व वाणिज्य महाविद्यालय येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३७ व्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २२ सप्टेंबर रोजी कर्मवीर प्रतिमेची मिरवणूक, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांच्या उपस्थितीत कर्मवीर जयंती सोहळा, बक्षीस वितरण, सांस्कृतिक विभागाकडून वक्तृत्व, चित्रकला, निबंध, मेहंदी इत्यादी स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येईल. सोलापूर विद्यापीठ व पुणे बोर्डाच्या परीक्षेमध्ये महाविद्यालयाच्या गुणवत्ता यादीत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. इमारत भूमिपूजन कार्यक्रमांतर्गत पी. एम. उषा योजनेतून मंजूर झालेल्या आय. के. एस बहुउद्देशीय सभागृह, कौशल्य विकास केंद्र, रनिंग ट्रॅकचे भूमिपूजन होणार आहे. महाविद्यालयाकडून जनार्दन वामनराव चव्हाण विद्यार्थी वसतिगृह व विज्ञान विभागाच्या इमारतीचे भूमिपूजनही मान्यवरांच्या हस्ते होणार असल्याचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. या कार्यक्रमासाठी मध्य विभागचे चेअरमन संजीव पाटील, नगराध्यक्षा ॲड. मीनलताई साठे, रामदास भाजीभाकरे उपस्थित राहणार आहेत.





### बार्शीतील वृक्षसंवर्धन समितीने केली सार्वजनिक वाचनालयाची स्वच्छता

**बार्शी, दि. २३ सप्टेंबर-**

बार्शीतील वृक्ष लागवड आणि संवर्धन चळवळीचे आद्य प्रवर्तक वायुपुत्र नारायण बाबा जगदाळे यांच्या जयंतीनिमित्त वृक्ष संवर्धन समितीमार्फत शहरातील दीडशे वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या ऐतिहासिक सार्वजनिक वाचनालयाची रविवारी स्वच्छता केली. यावेळी वायूपुत्र बाबांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी प्रा. शशिकांत धोत्रे, माजी शिक्षणाधिकारी विष्णूपंत कांबळे, वाचनालयाचे अध्यक्ष अशोक सावळे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी रिलायन्स गॅस पॉईंटचे सरव्यवस्थापक पवनकुमार देशमुख, टेक्निकल हायस्कूलचे मुख्याध्यापक टकले उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. प्रा. सचिन चव्हाण यांनी केले. प्रस्ताविक वृक्ष संवर्धन समितीचे अध्यक्ष उमेश काळे यांनी केले तर आभार सचिन मस्के यांनी मानले. या उपक्रमात योगेश गाडे, दीपक जाधव, चंद्रकांत बुगडे, दादा गवळी, उदय पोतदार, मोहम्मद शेख, महेश बकशेट्टी, हमने, रतीकांत हामने, अक्षय भुईटे, प्रवीण गटकुळ, ग्रंथपाल आशिष चौधरी, सचिन यादव उपस्थित होते.

### अणदूरच्या जय भवानी नवरात्र महोत्सवाच्या अध्यक्षपदी शशिकांत तोग्गी

**अणदूर, दि. २३ सप्टेंबर-**

येथील भवानी नवरात्र महोत्सव मंडळाच्या सलग दुसऱ्यांदा अध्यक्षपदी सचिन शशिकांत तोग्गी, सुभान पाटील व महादेव तोग्गी यांची अनुक्रमे दोघे हीदुसऱ्यांदा उपाध्यक्ष व सचिवपदी सर्वानुमते निवड करण्यात झाली. जयभवानी नवरात्र महोत्सव मंडळाकडून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. विशेष म्हणजे प्रत्येक वर्षी तुळजापूरला चालत जाऊन ज्योत घेऊन येण्याची परंपरा आजही अणदूर येथील सर्वच नवरात्र महोत्सव मंडळाच्या युवकांकडून अखंडितपणे चालू आहे. सलग दोन वर्षे या जय भवानी मंडळाकडून मानाची पैठणी मिळविणारा होम मिनिस्टरचा उपक्रम अणदूर व परिसरातील माता-भगिनींसाठी विशेष लक्षवेधी ठरला. यंदा लहान मुलांपासून युवक मित्रांपर्यंत विविध प्रकारचे क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती नवनिर्वाचित पदाधिकारी व सदस्यांनी दिली.



### अल्पवयीन मुलीस फूस लावून पळविले

**मंगळवेढा, दि.२३ सप्टेंबर-**

मंगळवेढ्याच्या ग्रामीण भागातून एका १६ वर्षीय मुलीला ती अल्पवयीन असल्याने तिला फुस लावून पळवून नेण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्ती विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी व फिर्यादीच्या कुटूंबातील सर्व सदस्य हे दि. २१ रोजी रात्री १० वाजता जेवणखाण करुन ते ११ वाजता सर्व झोपी गेले होते. फिर्यादी तथा पिडीत मुलीचे वडील पहाटे पाच वाजता लघुशंकेसाठी उठले असता सदर अल्पवयीन मुलगी घरामध्ये दिसून आली नसल्याने फिर्यादीने त्यांच्या पत्नीकडे मुलीबाबत विचारणा केली असता काही माहित नसल्याचे सांगितले. त्या बेपत्ता मुलीचा इतरत्र व तिच्या मैत्रिणीकडे शोध घेतला मात्र ती मिळून आली नसल्याने ती अल्पवयीन असल्याचा गैरफायदा घेवून तिला फुस लावून पळवून नेली असल्याची फिर्याद दाखल केली आहे. तिचे वर्णन उंची १४० सें.मी.,रंग गोरा, शिक्षण १० वी, अंगात नेसनेस गुलाबी रंगाचा चुडीदार,चेहरा उभट,भाषा हिंदी व मराठी अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास तपासिक अंमलदार पोलीस हवालदार महेश कोळी यांच्याशी ८२०८२३७३२१ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## माळशिरस विधानसभा मतदारसंघात चमकणार भाजपाचा भूमिपुत्र सूरज

**आतापासूनच भाजपा सावध**

**परका उमेदवार टाळण्यासाठी पक्ष प्रमुखांकडून तयारी**

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २३ सप्टेंबर-**

माळशिरस मतदारसंघांमध्ये स्थानिक आणि भूमिपुत्र उमेदवार द्यावा अशी मागणी सध्या जोर धरताना दिसत आहे. अशा अवस्थेत भाजपा सावध झालेली दिसत असून भूमिपुत्रालाच संधी देऊन विजयाची पुनरावृत्ती करू शकते. यामध्ये संघ परिवारातील विश्वसनीय चेहरा म्हणून सूरज मस्के यांची ओळख आहे. त्यांना या ठिकाणी उमेदवारी देऊन भाजपा परिपूर्ण ताकदीने माळशिरसच्या रणांगणात पुन्हा एकदा उतरेल अशीच शक्यता आहे.



विधानसभा निवडणुकीचे नगारे वाजू लागले आहेत. प्रत्येक पक्षाची अगदी जोरदार तयारी सुरू आहे. याच धर्तीवर माळशिरस राखीव विधानसभा मतदारसंघ पुन्हा एकदा ताब्यात घेण्यासाठी भाजपाने रणनीती आखलेली दिसत असून भूमिपुत्र असणाऱ्या सुरज मस्के यांचे नाव या निमित्ताने आघाडीवर असल्याचे चित्र आहे. माळशिरस विधानसभा मतदारसंघ २००९ साली राखीव झाल्यापासून स्थानिक आमदार हवा अशी मागणी प्रत्येक निवडणुकीत लोक करताना दिसतात. मात्र बाहेरून आलेले उमेदवारच आमदारपदी विराजमान होत असल्याने तालुक्याची पुरती आजपर्यंत निराशा झालेली दिसते आहे. त्यामुळे स्थानिक उमेदवार असावा अशी मागणी सध्या गावागावातून होताना दिसत आहे. याच पार्श्वभूमीवर माळशिरस तालुक्यातील भूमिपुत्र असणारे सूरज मस्के यांचे नाव सध्या भाजपाकडून जोरदार चर्चिले जात आहे. विद्यार्थ्यांच्या अनेक प्रश्नांना हात घालत शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे अनमोल कार्य राहिले आहे. याशिवाय भाजपाचे एकनिष्ठ कार्यकर्ते म्हणून त्यांची विशेष ओळख राहिली आहे. मागील गेल्या दहा वर्षात पक्षात ईमानेइतबारे काम करून वरिष्ठांची त्यांनी विशेष मर्जीदेखील संपादन केलेली आहे. २०१९ च्या गत निवडणुकीत भाजपावर परका उमेदवार लादल्याची टीका झाली होती. पण आता विधानसभेच्या तोंडावर पुन्हा एकदा भूमिपुत्राला संधी मिळावी व तालुक्यातीलच आमदार व्हावा अशा मागण्या जोर धरू लागल्या आहेत. त्यामुळे सूरज मस्के या नव्या दमाच्या चेहऱ्याला भाजपा संधी देऊ शकते. कोरोना काळात त्यांनी विशेष कामगिरी बजावली आहे त्याचबरोबर पक्षाचे काम करत असताना अकरा तालुक्यामध्ये सक्रिय संघटन निर्माण केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या योजना लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी ते आजही सक्रियपणे कार्य करताना दिसतात.

### आतापर्यंत या पदावर केली कामे

भारतीय जनता पक्षाच्या माळशिरस तालुका संघटन सरचिटणीस पदाची त्यांनी जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडली आहे. याचबरोबर शक्ती केंद्र प्रमुख, बूथ सशक्तिकरण, सेवा पंधरवडा, मन की बात, परीक्षा पे चर्चा, हर घर तिरंगा, नमो नवमतदाता संमेलन, नमो चषक अशा माध्यमातून त्यांनी भाजपामध्ये आपला विश्वास निर्माण केला आहे. वरिष्ठ पातळीवर देखील त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली आहे त्यामुळेच त्यांना राज्यपाल नियुक्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सिनेट सदस्य पदी संधी देण्यात आली आहे. त्याचबरोबर अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे ते पूर्व कार्यकर्ते देखील राहिलेले आहेत.

### भूमिपुत्र कार्डचा वापर

एकूणच भूमिपुत्र म्हणून त्यांचे कार्ड भाजपा वापरू शकते, अशी शक्यता आहे. संघ परिवारातील एक क्रियाशील सदस्य म्हणून त्यांची विशेष ओळख राहिली आहे. तालुक्यातील गावागावाशी त्यांचा दांडगा संपर्क आहे.प्रत्येकाशी त्यांनी ऋणानुबंध जपले आहेत.अनेकांच्या कार्यात सुखदुःखात ते समरूप झाल्यामुळे त्यांची एक तालुक्यामध्ये विशेष ओळख आहे.अनेकांच्या अडीअडचणींना ते धावून गेल्यामुळे प्रत्येकाला आपल्या घरातील ते एक सदस्य वाटतात. त्यामुळे भाजपासाठी एक सक्षम पर्याय म्हणून त्यांचे नाव पुढे येताना दिसत आहे. त्यामुळे भाजपाचा सूरज माळशिरस तालुक्यात चमकेल अशीच स्थिती आहे.

## कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त पंढरीत रॅली





**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ सप्टेंबर-**

येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालय व यशवंत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या एकशे सदतीसव्या जयंतीनिमित्त फुलांनी सजविलेल्या रथातून पंढरपूर शहरामधून काढण्यात आली. या रॅलीचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेच्या मनेजिंग कौन्सिलचे सदस्य व माजी सचिव प्रिं. डॉ. जे. जी. जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सदस्य अमरजित पाटील, डॉ. राजेंद्र जाधव, सुनेत्राताई पवार, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. दादासाहेब साळुंखे, उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, उपप्राचार्य प्रा. राजेश कवडे, अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बळवंत, अधिष्ठाता डॉ. अनिल चोपडे, मुख्याध्यापिका अनिता साळवे आदी मान्यवर उपस्थित होते. ढोल ताशा, लेझीम आणि टिपरी नृत्याने या रॅलीची रंगत वाढविली. या रॅलीत यशवंत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील, रयतमाऊली लक्ष्मिबाई, आर्मीचे सैनिक यांचा जीवंत देखावा तयार केला होता. ही रॅली पंढरपूर शहरातील कॉलेज -सरगम चौक-इंदिरा गांधी चौक-भोसले चौक-अर्बन बँक-भादुले चौक -नगर पालिका-छत्रपती शिवाजी चौक-सावरकर पुतळा-डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक-पंढरपूर तालुका पोलीस स्टेशन-मार्केट यार्ड-कॉलेज या मार्गाने मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली. या रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची महती सांगणारे फलक धारण केले होते. रिक्षातून लाउड स्पीकर वरून कर्मवीरांचे कार्य, त्यांच्या विषयी अभ्यासक आणि साहित्यिकांनी व्यक्त केलेली मते उधृत केली गेली. या रॅलीच्या वेळी कर्मवीरांच्या प्रतिमेस पंढरपूर शहरातील रयतप्रेमी संतोष नेहतराव, बाळासाहेब नेहतराव, जयवंतराव माने, शंकर खरात, नवनाथ खरात, तानाजी खरात, महादेव लोहकरे, माजी नगराध्यक्ष सुभाष भोसले, धर्मवीर शिवाजी आप्पा कोळी, राजकुमार लवटे, भारत भिंगे, राजू निंबाळकर, संजय मुळे, संत सद्गुरू गाडगे महाराज येथील अशोक माने, एम. एम. पावले यांनी पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

### खाऊ वाटपाने रॅलीची सांगता

ही रॅली यशस्वी करण्यासाठी पंढरपूर शहर पोलीस स्टेशन प्रशासन, पंढरपूर नगर पालिका प्रशासन यांनी विशेष सहकार्य केले. शेवटी रॅलीत सहभागी झालेल्या सर्वांचे आभार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे आणि सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी मानले. विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करून रॅलीची सांगता करण्यात आली.

## आ. सचिन कल्याणशेट्टींमुळे बौद्ध समाजाला कोट्यावधीचा निधी

**सरचिटणीस गोतसुर्वे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २३ सप्टेंबर-**

आ. सचिन कल्याणशेट्टी आमदार झाल्यापासून बौद्ध समाजाला कोट्यावधीचा निधी वेगवेगळ्या माध्यमातून मिळू लागल्याची माहिती भारतीय जनता पार्टी अनु. जाती जिल्हा सरचिटणीस बलवान गोतसुर्वे यांनी दिली.



वळसंग, आचेगांव, कुंभारी, मुस्ती अशा अनेक गावात बौद्ध वस्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आमदार फंड, सामाजिक न्याय, समाजकल्याण, २५१५, जनसुविधा, जिल्हा नियोजन समिती अशा अनेक माध्यमातून निधी उपलब्ध करून दिला आहे. त्यात बुद्ध विहार, समाजमंदिर, अस्थीविहार, ऐतिहासिक भूमी स्मारक व सुशोभीकरण, वस्तीअंतर्गत रस्ते, बंदिस्त गटार, पेव्हर ब्लॉक, एलईडी दिवे, जीम साहित्य असे विविध कामे मार्गी लावली आहेत. यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेंतर्गत कधीच निधी मिळाला नाही. पण आ. कल्याणशेट्टी यांनी २५-३० कोटींचा निधी एका या योजनेतून तालुक्यात खेचून आणला आहे. आचेगाव येथे बौद्ध समाजासाठी आमदार स्थानिक विकास निधी अंतर्गत व्यायामशाळा इमारत ७ लाख, मागासवर्गीय वस्ती बंदिस्त गटार ६ लाख, ओपन जीम साहित्य ७ लाख, आमदार फंडातून २० लाख त्याचप्रमाणे विविध योजनेंतर्गत बौद्ध सभामंडप १० लाख, व्यायामशाळा संरक्षक भिंत ८ लाख, बौद्ध स्मशानभूमी संरक्षक भिंत २३ लाख पेव्हर ब्लॉक सिमेंट रस्ता १० लाख, एलईडी हायमास्ट व विद्युत्तीकरण या पूर्वी १.२५ लाख व पुन्हा ३ लाख असे ५५ लाख, बौद्ध वस्ती अंतर्गत सिमेंट रस्ते, पाणीपुरवठा, बंदिस्त गटार व पेव्हर ब्लॉक याकरीता आतापर्यंत साधारण ५० लाख असे दीड कोटीपर्यंत निधी मंजूर केला आहे.



## जेऊर रेल्वे स्थानकावर पार्सल सुविधा सुरू करा : बागल

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २३ सप्टेंबर-**

जेऊर रेल्वेस्थानकावर पार्सल सुविधा सुरू करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा नियोजन समिती सदस्य दिग्विजय बागल यांनी पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



ग्रामीण भागातील सर्वांत जास्त प्रवासी उत्पन्नही असलेले जेऊर रेल्वे स्थानक आहे. या स्थानकाचा करमाळा, जामखेड, परंडा या तीन तालुक्यातील नागरिकांचा संपर्क आहे. त्यामुळे येथील शेतकरी, व्यापारी आणि यांची सोय व्हावी यासाठी लोडिंग-अनलोडिंग पार्सलची सुविधा सुरू करणे आवश्यक आहे. दळणवळणाच्या दृष्टिकोनातून जेऊर स्थानक सुलभ व सोयीचे असल्यामुळे येथून नागरिक प्रवास करतात. येथील नागरिकांची, व्यापाऱ्यांची, शेतकऱ्यांची सोय व्हावी म्हणून या स्थानकावर पार्सल सुविधा ऑफिस चालू करणे गरजेचे आहे. पार्सल ऑफिस सुरू झाल्यास तीन तालुक्यांतील शेतकऱ्यांचा भाजीपाला, फळे, दूध, अंडी, मासळी तसेच व्यापाऱ्यांचे व सर्वसामान्य नागरिकांचे सामान फ्रीज, टीव्ही, कुलर, टू व्हीलर, सायकल तसेच विविध प्रकारचे छोटे-मोठे सामान व वस्तू सोलापूर, कुर्डूवाडी, दौंड, मिरज, पंढरपूर, लातूर, पुणे, लोणावळा, कल्याण, मुंबई, अशा अनेक शहरांच्या ठिकाणी साहित्य पाठविणे शक्य आहे. पार्सल सुविधा सुरू झाल्यास येथील नागरिकांची सोय होऊन रेल्वे प्रशासनाला उत्पन्नही मिळणार आहे.

## पिलीव येथे धनगर समाजाचा मेंढ्यासह रस्ता रोको

**अनुसुचित जमातीमध्ये समावेश करण्याची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २३ सप्टेंबर-**



माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे परिसरातील सकल धनगर समाजाच्या वतीने धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा, महाराष्ट्रात धनगड जमात अस्तित्वात नाही तरीही शासनाच्या चुकीच्या निर्णयामुळे धनगर समाजबांधव १९५६ पासून अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला मुकले आहेत. पिढ्यान्पिढ्या मेंढपाळ व पशुपालक असणारा हा समाज संविधानामध्ये अनुसूचित जमाती(एस टी) मध्ये असताना राज्यकर्त्यांनी या समाजावर कायमच अन्याय केला आहे. गेल्या पंधरा दिवसापासून सहा समाजबांधव पंढरपूर येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. तरीही शासनाने याची दखल घेतली नाही. यामुळे आता संपूर्ण महाराष्ट्रातील धनगर समाज पेटून उठला असून संपूर्ण पिलीवसह महाराष्ट्रात रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाला पाठिंबा म्हणूनच पिलीव परिसरातील संपूर्ण धनगर समाज सोमवारी मेंढ्यासह रस्त्यावर उतरला होता.

सोमवारी सकाळी ९ वाजल्यापासून अहिल्यादेवी चौकात पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड, काळमवाडी, सुळेवाडी, बचेरी, चांदापुरी या गावातील धनगर बांधव मोठ्या संख्येने रस्ता रोको आंदोलन नामध्ये सामील झाले होते. यावेळी विठ्ठल मदने, शिवराज पुकळे, वैभव सुळे, माजी सरपंच अमोल मदने, अर्जुन वाघ, विश्वजीत गोरड, राहुल मदने, काळमवाडीचे सरपंच भुजंगराव शिंगाडे, सुळेवाडीचे सामाजिक कार्यकर्ते भानुदास सुळे, श्यामतात्या मदने या समाजबांधवानी उपस्थिती समाजबांधवांना मार्गदर्शन केले व येथून पुढे आरक्षण मिळेपर्यंत पक्षाचा झेंडा बाजूला ठेवून फक्त आणी फक्त पिवळ्या झेंड्याखाली एकत्र येऊन हा आरक्षणाचा लढा यशस्वी करायचा निर्धार करुन पंढरपूर येथील मेळाव्याला पिलीव परिसरातील धनगर समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

### शांततेच्या मार्गाने आंदोलन

माळशिरस पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदशनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. संपूर्ण रस्ता रोको शांततेच्या मार्गाने पार पडला. यावेळी धनगर समाज बांधवाचे निवेदन पोलीस निरीक्षक नारायण पवार व मंडल अधिकारी विजय एकतपुरे यांनी स्वीकारले.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ मंगरूळ येथे कडकडीत बंद

तभा वृत्तसेवा
**मंगरूळ, दि.२३ सप्टेंबर -**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे , गोरगरीब मराठा समाजातील युवकांना शिक्षण व नोकरीत ओबीसी प्रमाणे सवलती मिळाव्यात यासाठी अंतरवली सराटी येथे उपोषणास बसलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथे शनिवार २१ सप्टेंबर रोजी गाव बंद ठेऊन कडकडीत बंद पाळण्यात आला.

यापूर्वीही मनोज जरांगे-पाटील यांनी हाक दिलेल्या साखळी उपोषण, रास्ता रोको, धरणे आंदोलन यासारख्या विविध आंदोलनास मंगरूळ ग्रामस्थांनी भरघोस प्रतिसाद दिला होता.

हा बंद कडकडीत पाळण्यासाठी सुहास डोंगरे, मनोज डोंगरे, विपीन खोपडे, राजकुमार कोरेकर, आबासाहेब धुरगुडे यांच्यासह युवकांनी परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### सकल धनगर समाज बांधवांचे तेर येथे रास्ता रोको आंदोलन

**तेर, दि.२३ सप्टेंबर -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे धनगर समाजाचा एस.टी. प्रमाणपत्रासाठीच्या मागणीसाठी धनगर समाज बांधवांच्या वतीने शेळ्या मेंढयासह रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. धाराशिव तालुक्यातील तेर येथे सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने पेठ विभागात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून वाजत गाजत मुख्य रस्त्यांवरून सकल धनगर समाज बांधव तेर धाराशिव रस्त्यावर येऊन रास्ता रोको मेंढरासह आंदोलन करण्यात आले. यावेळी सक्षणा सलगर, गोरोबा पाडूळे, हनुमंत कोळपे, सचिन देवकते, प्रभाकर घाटूळे, रमेश लकडे, तानाजी पिंपळे, रणधिर सलगर, सचिन शेंडगे यांनी यावेळी आपले विचार व्यक्त केले. यावेळी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने ढोकी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक व्ही.बी. हजारे, मंडल अधिकारी शरद पवार, तलाठी पी.सी. देशमूख यांना निवेदन देण्यात आले.



### फ्लाईंग किड्स शाळेच्या मुलींचा संघ विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी पात्र

**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय, धाराशिव आयोजित जिल्हास्तरीय क्रिडा स्पर्धा १७ वर्षे वयोगटातील क्रिकेट स्पर्धा फ्लाइंग किड्स इंटरनेशनल इंग्लिश स्कूलच्या भव्य मैदानावर आयोजित करण्यात आले होते. फ्लाईंग किड्स शाळेचे क्रिडा प्रशिक्षक इंद्रजित वाले मार्गदर्शनाखाली फ्लाईंग किड्सच्या मुलींचा संघ जिल्हास्तरावर विजयी ठरला असून विभागस्तरीय क्रिकेट स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे. आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील, फ्लाइंग किड्सच्या संचालिका डॉ. मंजुळा पाटील तसेच सर्व शिक्षक-पालकवर्ग यांनी विजयी संघाचे व प्रशिक्षकांचे अभिनंदन केले.



### वाठवडा येथे शेतकऱ्यांना मोफत फवारणी पंपाचे वाटप

**नायगांव, दि.२३ सप्टेंबर -**

राज्य पुरस्कृत कापूस सोयाबीन योजना सन २०२४ ते २०२५ अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी ऑनलाइन अर्ज भरला होता त्यांना नुकतेच १०० टक्के अनुदानावर बॅटरीवरील फवारणी पंप मिळाले आहेत. यावेळी हे मोफत पंप वाटप वाठवडा (ता.कळंब) येथील ग्रा.पं. कार्यालयासमोर करण्यात आले. याप्रसंगी सर्व तीस लाभार्थ्यांना बॅटरी फवारणी पंप देण्यात आला असून यावेळी तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे, मंडळ अधिकारी भुजंग लोकरे, एस.एस. अडसूळ, कृषी सहाय्यक पाखरे, ग्रामसेवक निरज मानकरी, सरपंच सुरेखा आल्टे, उपसरपंच नंदा साळुंके, ग्रा.पं. सदस्य सोमनाथ टिंगरे, दिलीप राऊत, अशोक इरपतगिरे, बालाजी आल्टे आदी गावातील नागरिक उपस्थित होते.


### आ.चौगुले यांच्या हस्ते क्रिडा संकुलासह रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन

**लोहारा, दि.२३ सप्टेंबर -**

आ. ज्ञानराज चौगुले यांच्या प्रयत्नातून लोहारा तालुक्यातील जेवळी येथे क्रिडा संकुल उभारणे ५ कोटी रुपये व जेवळी ते तुगाव या रस्त्याचे डांबरीकरण करणे ५० लक्ष रुपये या कामाचे दि.२२ सप्टेंबर २०२४ रोजी आ.ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते युवा सेना मराठवाडा निरीक्षक किरण गायकवाड व जिल्हाप्रमुख मोहन पणुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत भूमिपूजन संपन्न झाले.. आ. ज्ञाराज चौगुले यांच्या प्रयत्नातून भव्य क्रिडा संकुल उभारणे या कामासाठी ५०० लक्ष रुपये व जेवळी ते तुगाव या रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी ५० लक्ष रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

### प्रयागाबाई मुंढे यांचे निधन

**येरमाळा, दि.२३ सप्टेंबर -**



येरमाळा येथील प्रयागाबाई गोरख मुंढे (वय ६६) यांचे शनिवारी रात्री हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले. शनिवारी रात्री त्यांना अस्वस्थ वाटू लागले आणि त्या बेशुद्ध झाल्या त्यांना येथील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेव्हा त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. त्यांच्या पश्चात पती, पाच मुली, एक मुलगा, नातवंडे असा परिवार आहे.

# मराठा कुणबी नोंदी : हैद्राबादहून आणले महत्त्वाचे दस्तावेज

### मुख्यमंत्र्यांना बैठक बोलविण्याची आमदार राणादादा यांची विनंती...

तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

मराठा आरक्षणप्रश्नी महत्वपूर्ण कागदपत्रे उपलब्ध झाली आहेत. तेलंगणा राज्य अभिलेखागार आणि संशोधन केंद्रातून उपलब्ध झालेल्या दुर्मिळ दस्तऐवजामधून अनेक महत्वाची कागदपत्रे स्कॅन करून घेतली आहेत. तज्ञांकडून त्याचा सर्वांगाने अभ्यास सुरु आहे. कोणावरही अन्याय न करता मराठा आरक्षणाच्या ऐतिहासिक निर्णयायासाठी राज्य सरकारला त्यातून मूलभूत पुरावे उपलब्ध होतील असा विश्वास आहे. मागील सहा दिवसापासून मनोज जरांगे-पाटील उपोषणास बसले आहेत. त्यांची प्रकृती खालावत चालली असून याबाबत तातडीने निर्णय होणे गरजेचे आहे. त्यामुळे हैदराबाद गॅझेटचे महत्व विचारात घेऊन जेष्ठ विधीज्ञ, मनोज जरांगे पाटील यांनी प्राधिकृत केलेले वकील यांच्यासह संबंधितांची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घ्यावी अशी विनंती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केली आहे.

तसेच पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी यांच्यासोबत देखील याबाबत बैठक आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. उपलब्ध झालेल्या दस्ताऐवजात हैद्राबाद गॅझेटीयरसह इतर अनेक कागदपत्रांचाही समावेश आहे. जेष्ठ विधीज्ञ तसेच मराठा आरक्षणासाठी उपोषणास बसलेले मनोज जरांगे-पाटील यांच्याशी संबंधित कायदे सल्लागार यांच्यासह याबाबत आढावा बैठक आयोजीत केल्यास यातून योग्य कायदेशीर मार्ग निघण्यास सहकार्य होईल.



त्यानुसार आढावा बैठक आयोजित करण्याची आग्रही विनंती आमदार पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे.

आ. पाटील यांच्या सूचनेनुसार कुणबी नोंदीचे दस्तावेज शोधण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी समिती गठीत केली होती. या समितीमध्ये उपजिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यासह, तहसिलदार, मोडी व उर्दू लिपी जाणकार, तुळजाभवानी मंदिराचे महंत तुकोजी बुवा यांच्यासह स्थानिक युवकांनाही समाविष्ट करून घेण्यात आले होते.

#### तरूण बांधवांनी टोकाचे पाऊल उचलू नये..

धाराशिव तालुक्यातील कोंबडवाडी येथील परमेश्वर मिसाळ व पाटोदा येथील शिवाजी निलंगे या युवकांनी मराठा समाजाला आरक्षण मिळत नसल्याच्या नाराजीतून आत्महत्या केली आहे. त्यामुळे मिसाळ आणि निलंगे परिवारावर मोठे संकट कोसळले आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी सरकार वेगाने प्रयत्न करीत आहे.

लवकरच आशादायक निर्णय येण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे समाजातील तरुणांनी कोणत्याही प्रकारचे टोकाचे पाऊल उचलून कुटुंबातील सदस्यांना दुःखाच्या खाईत लोटू नये, असे नम्र आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले आहे.

दोन वेळा या समितीने हैदराबाद येथील तेलंगणा सरकारच्या अखत्यारीत असलेल्या तेलंगणा राज्य अभिलेखागार आणि संशोधन केंद्रातील निजामकालीन कागदपत्रांचा धांडोळा घेऊन अनेक महत्वाची कागदपत्रे स्कॅन करून आणली आहेत. ज्याचा राज्य सरकारला न्यायालयीन पातळीवर देखील मोठा लाभ होऊ शकतो असा विश्वास आ. पाटील यांनी व्यक्त केला आहे. पहिल्या भेटीतील कागदपत्रे मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे सुपूर्द केली आहेत.

पुढील आठवड्यात जिल्हाधिकारी डॉ. ओम्बासे यांच्यासोबत या बाबींचा आढावा घेणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

## तुळजापूर-नंदगाव बसला अपघात; ३० प्रवाशी जखमी



तभा वृत्तसेवा
**नळदुर्ग, दि.२३ सप्टेंबर -**

तुळजापुर-नंदगाव या बसचा ब्रेक निकामी होऊन झालेल्या अपघातामध्ये ३० प्रवाशी जखमी झाले आहेत. हा अपघात दि.२३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मुर्टा पाटीजवळ झाला आहे. दैव बलवत्तर म्हणुन यामध्ये जीवितहानी झाली नाही.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दि.२३ सप्टेंबर रोजी तुळजापुरहुन नंदगावकडे जाणारी बस (क्र.एम.एच.२०/बीएल ४२३५) ही किलजमार्गे नंदगावाकडे जात असताना सकाळी १० वाजण्याच्या सुमारास मुर्टा पाटीजवळ बसचा ब्रेक निकामी झाल्यामुळे अपघातग्रस्त झाली. ब्रेक निकामी झाल्यामुळे बस रस्त्याच्या कडेला असलेल्या मातीच्या ढीगाऱ्यावर गेली. सध्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु असुन या कामासाठी खोदकाम केलेला हा मातीचा ढिगारा होता. हा ढिगारा होता म्हणुन भीषण अपघात होता होता वाचला. या मातीच्या ढिगाऱ्यामुळे बस थांबली. अन्यथा बस खाली लांब जाऊन पलटी झाली असती.

अपघातामध्ये जवळपास ३० प्रवाशी किरकोळ जखमी झाले आहेत. जखमीमध्ये सर्वाधिक प्रवाशी हे मुर्टा आणि चिकुंद्रा येथील आहेत. या सर्व जखमींवर नळदुर्ग तेथील उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. सध्या अनेक बस नादुरुस्त व खिळखीळ्या झालेल्या आहेत.

परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी नादुरुस्त व खिळखीळ्या बस दुर करून चांगल्या बस प्रवासासाठी आणणे गरजेचे आहे.

## तेरणावर आज सभासद व ऊस उत्पादक शेतकरी स्नेह-संवाद मेळावा

तभा वृत्तसेवा
**ढोकी, दि.२३ सप्टेंबर -**

धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. तानाजीराव सावंत यांनी जिल्हा बँकेकडून भाडेतत्त्वावरतेरणा कारखाना २५ वर्षासाठी घेतला असून पहिले सीजन यशस्वी पार पाडून तीन लाख १२ हजार गळीत करून २८२५ रुपये असा प्रतिटन भाव दिलेला आहे.

या पार्श्वभूमीवर मंगळवार दि.२४ रोजी सकाळी १० वाजता सभासद व ऊस उत्पादकशेतकरी स्नेह-संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले असून या मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन भैरवनाथ शुगर संचलित तेरणा कारखान्याचे कार्यकारी संचालक केशव उर्फ विक्रम सावंत यांनी एका पत्रकाद्वारे केले आहे.

या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून पालकमंत्री धाराशिव व आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ना.प्रा.डॉ. तानाजीराव सावंत हे मार्गदर्शन करणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी भैरवनाथ शुगरचे चेअरमन शिवाजीराव सावंत हे असून या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष डॉ. धनंजय सावंत, ऊस विकास मार्गदर्शक संजीव माने यांची लाभणार आहे.

तरी या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आलेले आहे.

## नवरात्र महोत्सवाची तयारी; श्री तुळजाभवानी मंदिरात रंगरंगोटी सुरू



तभा वृत्तसेवा
**तुळजापूर, दि.२३ सप्टेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामीनी श्री तुळजाभवानी मातेच्या मंदीरातील तीन व घाटशिळ शिखरे शारदीय नवरात्र महोत्सवा पुर्वी रंगाने उजळुन निघणार आहे.

२०१४ नंतर तब्बल दहा वर्षानंतर श्री तुळजाभवानी मंदीरातील शिखरांना रंगकाम केले जात आहे. चार शिखरासाठी आठ लाख पंचाऐंशी हजार रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे समजते. श्री तुळजाभवानी मंदीरात मुख्य प्राचीन असे तीन शिखर आहेत. तर एक घाटशिळ मंदीरावर ऐक शिखर आहेत. त्यात श्री तुळजाभवानी मातेचे वास्तव्य असणाऱ्या गर्भगृहावरील भवानी शंकर होमकुंड हे वरील तीन मुख्य शिखर आहेत. या तिन्ही शिखरांच्या रंगरंगोठी काम चालु करण्यात आले आहे. या शिखरांना आकर्षक पध्दतीने दर्जदार ऊन वारा पाऊस सहन करुन कायम तेजेदार दिसणारा रंग दिला जात आहे. शिखर रंगकाम श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवापर्यत पुर्ण केले जाण्याचे प्रयत्न चालु आहेत.

श्री तुळजाभवानी मातेच्या शारदीय नवरात्र महोत्सवाला ३ ऑक्टोबरपासून सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर मंदीरातील विविध छबिना वाहनांची रंगरंगोठी केली जात आहे.

#### छबिना वाहनांची रंगरंगोटी

श्री तुळजाभवानी मातेच्या छबिना वाहनांची रंगरंगोठी सुरु असुन हे काम अंतिम टप्प्यात आहे. छबिना वाहनांची दरवर्षी रंगरंगोठी केली जाते.

## आडत दुकानाचे कुलूप तोडून ११ पोती उडीद व रोख रक्कम चोरीला

तभा वृत्तसेवा
**मंगरूळ, दि.२३ सप्टेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील मंगरूळ येथील बापुराव लिंबाजी सरडे यांचे इंदीरानगर मंगरुळ येथील आडत दुकानाचे शटरचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.२१ सप्टेंबर रोजी रात्री तोडून आत प्रवेश करुन दुकानातील ११ उडदाचे पोते व रोख रक्कम १४ हजार रूपये असा एकुण ७१ हजार ७५० रूपये किंमतीचा माल चोरुन नेला.

याबाबत माहिती अशी की, फिर्याद बापुराव सरडे यांनी दि.२२ सप्टेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

याप्रकरणी अधिक तपास तुळजापूर पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी करत आहेतमंगरूळ व परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले आहे.

## सहकार भारतीच्या लातूर सहविभाग प्रमुखपदी प्रा. संतोष तौर यांची नियुक्ती

तभा वृत्तसेवा
**येरमाळा, दि.२३ सप्टेंबर -**

येथील जनहित पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. संतोष बाबासाहेब तौर यांची सहकार भारतीच्या लातूर सहविभाग प्रमुख म्हणुन ३ वर्षासाठी निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र प्रदेश सहकार भारतीच्या शिर्डी येथे आयोजीत केलेल्या त्रैवार्षिक अधिवेशानामध्ये प्रदेश अध्यक्ष दत्ताराम चाळके, महामंत्री विवेक जुगादे यांनी संतोष तौर यांची सहकार भारतीच्या लातूर सहविभाग प्रमुख म्हणुन ३ वर्षासाठी निवड केली आहे. यावेळी राष्ट्रीय महामंत्री डॉ. उदय जोशी राष्ट्रीय संघटनमंत्री संजय पाचपोर प्रदेश सहप्रमुख विजयराज देशमुख यांची उपस्थिती होती. यावेळी संतोष तौर यांची निवड बिनविरोध करण्यात आली. प्रदेशअध्यक्ष यांनी संतोष तौर यांच्या निवडी नंतर त्यांचा सत्कार केला. लातूर विभागात धाराशिव, लातूर, नांदेड, बीड या चार जिल्ह्यांचा समावेश आहे.




संतोष तौर हे येरमाळा येथील जनहीत पतसंस्थेचे संस्थापक, अध्यक्ष आहेत सहकार भारतीचे धाराशिव जिल्हा प्रमुख म्हणुन त्यांनी गेली ६ वर्ष त्यांनी कार्य केले आहे. ते महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मुंबई चे निमंत्रीत सदस्य आहेत.त्यांना मिळालेल्या सहप्रमुख पदाबद्दल त्याचे सहकार क्षेत्रातुन अभिनंदन होत आहे.

## उस्मानाबाद जिल्हा मध्यवर्ती बँकेस गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी जिल्हावासियांनी पुढे यावे : सच्चिदानंद नाईकवाडी



तभा वृत्तसेवा
**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

आर्थिक अडचणीत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी जिल्हावासियांनी पुढे येऊन भाग भांडवलातून २०० कोटी जमा करण्यासाठी मदत करावी, असे आवाहन संनियंत्रण समितीचे सदस्य तथा सेवानिवृत्त सहनिबंधक सच्चिदानंद नाईकवाडी यांनी वित्तिय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत केले.



जिल्हा बँकेला पुन्हा गतवैभव मिळवून देण्यासाठी शासनाने जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती तयार केली आहे. समितीकडून यासाठी प्रयत्न म्हणून पतसंस्था, मल्टीस्टेट व वित्तिय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांची मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या डीपिडीसी हॉल येथे शुक्रवारी २० सप्टेंबर रोजी बैठक बोलवण्यात आली होती. यावेळी बँकेचे अध्यक्ष बापुराव पाटील, उपाध्यक्ष मधुकर मोटे, सदस्य नाईकवाडी, राज्य बँकेचे प्रतिनिधी गंगाधर चौरे, विभागीय सहनिबंधक सुनिल शिरापूरकर, कार्यकारी संचालक विजय घोणसे पाटील उपस्थित होते. बँकेला उर्जितावस्था निर्माण करून देण्यासाठी यापुढे जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतचे सरपंच,सर्व कारखाने व जिल्हा प्रशासन यांच्या बैठका घेऊन त्यांना सभासद तसेच भागभांडवल उभे करण्यासाठी आवाहन करण्यात येणार आहे. वित्तिय संस्था व नागरिकांना वैयक्तिक सभासद करून घेण्याची कल्पना मांडली. यामध्ये संस्थांकडून २५ हजार तर शेतकरी, नोकरदार, नागरिकांकडून १० हजार रुपये भाग भांडवल घेण्याची सूचना केली. यामधून सुमारे २०० कोटी रुपये जमा करून बँकेचा गाडा रुळावर आणण्यासाठी योजना तयार करण्याचे आवाहन केले. हे भाग भांडवल उभा करण्याच्या कल्पनेला संचालकांसह उपस्थित सर्वच वित्तीय संस्थांच्या प्रतिनिधींनी मान्यता दिली. जिल्हा मध्यवर्ती बँक पुन्हा आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या एका आवाहनावर वित्तिय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी सभागृह खचाखच भरून गेले होते.

यावेळी वित्तीय संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी आपली मते मांडली.

### धाराशिव आदिवासी विकास पॅटर्न महाराष्ट्रभर राबविणार : काळे

**धाराशिव, दि.२३ सप्टेंबर -**

पारधी समाज हा भटक्या विमुक्त जमातीत येत नसून तो आदिवासी प्रवर्गात आहे. या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी डॉ.आंबेडकर यांनी घटनेत खास तरतूद करून ठेवलेल्या आहेत. मात्र आत्तापर्यंत याकडे फारसे कोणाचे लक्ष आणि प्रभावी अंमलबजावणी अभावी पारधी समाजातील लोकांसाठी असलेल्या सुविधांचा लाभ बोगस नागरिक घेत आहेत. जिल्ह्यामध्ये पारधी आदिवासींसाठी घरकुलांसह इतर विकासात्मक योजना राबविल्या आहेत. मात्र राज्याच्या इतर भागात स्पर्धेच्या विकासासाठी कुठल्याही योजना राबविल्या गेलेल्या नाहीत. त्यामुळे धाराशिवचा आदिवासी विकास पॅटर्न यापुढे महाराष्ट्रात राबविणार असल्याची ग्वाही सुनील काळे यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### निवळी येथील गणेशोत्सव मंडळातर्फे गुणवंतांचा गौरव

**लातूर, दि. २३ सप्टेंबर-**

विलास साखर कारखाना लि. वैशालीनगर, निवळी येथे गणेशोत्सव मंडळ विविध समाज उपयोगी व प्रबोधनपर कार्यक्रम आयोजीत करते. त्यानुसार गणेशोत्सव मंडळातर्फे सचिन रावल, प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांच्या प्रमुख उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. विशेष प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन गणेशोत्सव साजरा करावा अशी सूचना गणशोत्सव मंडळाचे अध्यक्ष व कारखान्याचे संस्थापक आ.अमित देशमुख यांनी केली होती, त्याच्या सुचनेनुसार विलास साखर गणेशोत्सव मंडळातर्फे कारखाना कर्मचारी व कामगारांच्या पाल्यांना दहावी, बारावी, पदवीका व पदवी तसेच इतर कला क्षेत्रातील चित्रकला, संगीत कला (हार्मोनीयम व पखवाज वादन) तसेच निळकंठेश्वर विद्यालय, निवळी येथील गुणवंत विद्यार्थी व गुणवंत विद्यार्थी घडविणारे तेथील शिक्षक वर्ग यांचा सत्कार सोहळा गणेशोत्सव मंडळातर्फे. सचिन रावल, प्रादेशिक सहसंचालक (साखर), नांदेड यांचे हस्ते, कारखान्याचे व्हा. चेअरमन रविंद्र काळे यांच्या अध्यक्षतेखाली व मंडळाचे कार्याध्यक्ष व कार्यकारी संचालक संजीव देसाई यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी चैतन्य रामभाऊ कापरे, वैष्णव विजय वडजे, रोहण बालाजी टरके, श्रावणी उत्तम साळुंके, पंकजा अनंत पांचाळ, समीर जानुमियाँ शेख, चैत्राली आनंद मोरे, उत्कर्षा बालाजी रणखांब इत्यादी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच निळकंठेश्वर विद्यालय निवळी येथील इयत्ता १० वी च्या परिक्षितील गुणवंत आकांक्षा श्रीमंत जाधव, प्रतिक्षा संतोष शिंदे व आदित्य व्यंकट शिंदे यांचा व त्यांच्या गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. यावेळी कारखान्याचे सेक्रेटरी एन.एन.काळोखे, जनरल मॅनेजर (टेक्नि) एम.पी.भोरकडे, फायनान्स मॅनेजर ओ.पी.ठाकरे, चिफ केमिस्ट एल.एम.देशमुख, मुख्य शेतकी अधिकारी एस.एस.कल्याणकर, डिस्टीलरी मॅनेजर डी.जे. जाधव, चिफ अकौंटट सी.एच. कानवटे, मंडळाचे पदाधिकारी, नागरिक व विद्यार्थी उपस्थित होते. मांजरा परिवाराचे दिलीपराव देशमुख, माजी मंत्री कारखान्याचे संस्थापक आ. अमित देशमुख, आ. धिरज देशमुख व कारखान्याच्या अध्यक्षा वैशाली देशमुख यांनी अभिनंदन केले.




### किलबिल शाळेत फन डे कार्यक्रम

**अहमदपूर, दि. २३ सप्टेंबर-**

किलबिल नॅशनल स्कूल मिरकले नगर शाळेमध्ये फन डे प्रोग्राम पार पडला. या रंगतदार कार्यक्रमात मुले व त्यांच्या पालकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शहरातील ओम गॅस एजन्सी च्या संचालिका संगीता खंडागळे , ऑयुर्वेद तज्ञ डॉ. शरयू चलवदे , सुप्रसिद्ध दंतशल्यचिकित्सक डॉ. सुचिता कापसे , स्त्रीरोग तज्ञ डॉ. लक्ष्मी पेड पाटील, सोनोग्राफी तज्ञ डॉ. विशाखा पलमटे, राष्ट्रवादी युवती काँग्रेस च्या तालुकाध्यक्षा सुप्रियाताई भालेराव, सेवानिवृत्त शिक्षिका लेखिका सय्यद शाहिदा, संगीता मिरकले, रिया घाटोळ आदी उपस्थित होते. यावेळी शाळेचे संचालक ज्ञानोबा भोसले, मुख्याध्यापिका सरोजा भोसले, इन्चार्ज किमी चोगोलाई, सुपरवायझर रमा गुडसुरकर, कोऑर्डीनेटर दिना भूईया, सहशिक्षीका संगिता भोसले, स्वाती पवार, स्वाती चापकानडे, शीतल जगताप, महानंदा मोहजकर, पूजा परतवाघ, आरती भोगे यांनी परिश्रम घेतले. सर्व पालकांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी झाला.



### ॲड. संगीता पाटील-निलंगेकरांची गावभेटी; कार्यकर्त्यांची चर्चा

**शिरूर अनंतपाळ, दि. २१ सप्टेंबर-**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील मौजे आरी येथील श्री. क्षेत्र वैकुंठ धाम बेट येथील रामकृष्ण महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन अशोक पाटील-निलंगेकर यांच्या प्रचारासाठी थेरगाव, हिप्पळगाव आरी येथील प्रमुख कार्यकर्त्यांच्या घरी जाऊन भेटी घेऊन विधानसभा निवडणुकीत जोमाने कामाला सुरुवात करण्याच्या दृष्टीने चर्चा करून पुढील रणनीती ठरविण्यात आली. ॲड. संगीता पाटील-निलंगेकर यांनी श्री. क्षेत्र वैकुंठ पुरी भक्ती धाम आरी बेट तालुका शिरूर अनंतपाळ येथे पौर्णिमानिमित्त आयोजित काल्याच्या कार्यक्रमात सहभागी होवून विठ्ठल रुक्मिणी मंदीर व रामकृष्ण महाराज भिंगोलीकर यांच्या समाधीचे दर्शन घेऊन काल्याच्या प्रसादाचा आस्वाद घेतला. व पती अशोक पाटील-निलंगेकर यांना आमदार करण्यासाठी तालुक्यात संपर्क दौरा केला असून हिप्पळगाव, थेरगाव, आरी गावातील मान्यवरांच्या घरी कार्यकर्त्यांसह भेट देत आगामी विधानसभा निवडणुकी संदर्भात चर्चा केली. या संपर्क दौऱ्यात सहभागी डी. एन. शेळके,महिला काँग्रेसच्या शहराअध्यक्षा करुणा पारशेट्टे, संजय बिराजदार, नगरसेवक सुधीर लखनगावे, कांबळगा येथील चेअरमन. अंगद गुणाले, रमेश मोगरगे, उमेश मोहिते, वैशंपायन जागले, रमेश सोनवणे, दिलीप गड्डीमे,पंडीतराव भदरगे, प्रसाद झरकर, सचिन गायकवाड, प्रल्हाद गड्डीमे, नारायण पवार यांच्यासह प्रमुख पदाधिकारी तसेच हिप्पळगाव, थेरगाव, आरी गावातील असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# ७०० हेक्टर सोयाबीन पिकाच्या नुकसानीचा अंदाज

**कृषी विभागाकडून पाहणी**

**नुकसानीचे क्षेत्र वाढण्याची शक्यता**

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. २३ सप्टेंबर-**

औसा तालुक्यातील सोन चिंचोली, पोमादेवी जवळगा, तुंगी व अनेक गावातील ढगफुटी सदृश्य वादळी पावसाने झालेल्या पिकांच्या नुकसानीची आ. अभिमन्यू पवार, तालुका कृषी अधिकारी संजयकुमार ढाकणे, कार्यालयीन कृषी अधिकारी सतीश घुले, कृषी पर्यवेक्षक रवी चव्हाण, कृषी सहाय्यक धीरज भोसले यांनी पाण्यात उभा असलेल्या सोयाबीन पिकांची सोमवार दि. २३ रोजी पाहणी केली. या पाहणीत तालुक्यातील ७०० हेक्टरावरील सोयाबीन पिकाचे नुकसान झाले असल्याचा प्राथमिक अंदाज कृषी विभागाने या दरम्यान व्यक्त केला असून यामध्ये नुकसानीत होण्याची शक्यता असल्याचे म्हटले आहे.

औसा तालुक्यात शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी वादळी पावसाने ४ सायंकाळी ४ वा. सुमारास सुरुवात केली. सलग दोन तासापेक्षा अधिक पाऊस झाल्याने शेतातील ताली फुटून सोयाबीन पिकात पाणी घुसले. या पावसाने काढणी केलेले व काढणीला आलेले सोयाबीन भिजले असून काळे पडून सडणार आहे. तर उभ्या सोयाबीनमध्ये पाणी उभारल्याने अनावश्यक ओलाव्यामुळे बुरशीजन्य रोगाला बळी पडून शेतकऱ्यांच्या हातून जाणार आहे. केवळ एकाच पावसात खरिप हंगामातील नगदी पिकाचे होत्याचे नव्हते झाले. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी विभागाने पाहणी करीत पाहणी पूर्ण झाल्यानंतर शासनाकडे नुकसानीचा अहवाल पाठविणार असल्याचे तालुका कृषी अधिकारी संजयकुमार ढाकणे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले आहे.




**आमदारांनी दिला शेतकऱ्यांना धीर**

आ. अभिमन्यू पवार यांनी कृषी अधिकाऱ्यांना सोबत घेऊन तालुक्यातील अनेक गावात झालेल्या सोयाबीन पिकाच्या नुकसानीची पाहणी केली. या पावसामुळे पिकाचे कोणते नुकसान झाले आहे. याची कृषी अधिकाऱ्यांसमोर शेतकऱ्यांशी चर्चा केली. यानंतर संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना धीर देत, मी शेतकऱ्यांसोबत खंबीरपणे उभा आहे. असे स्पष्ट करीत शेतकऱ्यांना धीर दिला.



### महाराष्ट्र महाविद्यालयात आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन

निलंगा, दि. २२ सप्टेंबर

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्घाटन भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वेबेक्स दूरदृष्य प्रणालीद्वारे केले. या कौशल्य विकास केंद्रांतर्गत महाराष्ट्र महाविद्यालयास ग्राफिक डिझायनर आणि जाम जेली व केचप प्रोसेसिंग टेक्निशियन या दोन कोर्सेसची मान्यता प्राप्त झाली आहे. त्याचेही उद्घाटन याप्रसंगी पार पडले. महाराष्ट्र शासनाच्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र मार्फत मान्यताप्राप्त या दोन कोर्सेसच्या माध्यमातून १५ ते ४५ वयोगटातील युवक युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी दूरदृष्य प्रणालीमध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय पाटील-निलंगेकर, निलंगा उपविभागीय कार्यालयाचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके, निलंगा तहसीलचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, जिल्हा आयुक्त कार्यालयातचे प्रतीनिधी महामुनी, महाराष्ट्र औषध निर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत पौळ, डॉ. एस. एस. पाटील, प्राचार्य डॉ. माधव कोलपुके, उपप्राचार्य प्रा. प्रशांत गायकवाड आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, प्रा. श्रीनिवास काकडे, प्रा. सचिन शिंदे, प्रा. राजेश जाधव, प्रा. अभिमन्यू गंगाजी, प्रा. सोनम पाटील, समन्वयक प्रा. गिरीश पाटील, व दुरदृष्य प्रणालीचे तंत्रसहाय्य सिध्देश्वर कुंभार, शेख आजम, प्रकाश सुरवसे यांनी परिश्रम घेतले.



### बंजारा समाजाचा लक्षवेधी मोर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २३ सप्टेंबर-**

अनुसूचीत जमाती प्रवर्गात बंजारा समाजाचा समावेश करावा, या माणगीसाठी लातूर येथे मोठा मोर्चा काढण्यात आला. महिला-तरूण फलक घेऊन सहभागी झाले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून मोर्चास प्रारंभ झाला.

जिल्हाभरातील समाज बांधव या मोर्चात सहभागी होते विशेषतः महिलांचा सहभाग मोठा होता. अनेक महिलांनी पारंपारिक पोषाख परिधान केला होता. अनेकांच्या हातात मागण्यांच्या घोष असलेले फलक व डोक्यावर मी बंजारा असा मजकूर असलेल्या टोप्या होत्या.

## नारी अदालतीतून सामाजिक, कौटुंबिक प्रश्न सोडवावेत : नागमोडे

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि.२३ सप्टेंबर-**

महिलांनी बेटी पढाओ, बेटी बचाओ, हेल्पलाईन या उपक्रमासह नारी अदालत उपक्रम राबवावा. या नव्या उपक्रमातून समाजातील व कुटुंबातील वादविवाद आणि लिंगभेद याचा न्यायनिवाडा करता येतो. यासाठी महिलांनी कौटुंबिक व सामाजिक प्रश्न नारी अदालतीतून सोडवावेत. असे आवाहन सखी वन स्टाप सेंटरच्या कांचन नागमोडे यांनी केले.

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्निक लातूर येथे एन एस एस मार्फत महिला सक्षमीकरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . त्यायावेळी त्या महिला व मुलींना मार्गदर्शन करताना बोलत होत्या. सखी वन स्टॉप सेंटरच्या कांचन नागमोडे व स्वाती डोके यांची प्रमुख उपस्थिती होती. सरस्वती प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करुन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर महिला सुरक्षा व कायदे विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कांचन नागमोडे म्हणाल्या, महिलांवर होणारे अत्याचार आजही थांबले नाहीत.आपला आत्मसन्मान टिकवून ठेवण्यासाठी पुढे येणे गरजेचे आहे .शक्ती अभियान योजनेतून महिलांची सुरक्षितता, संरक्षण आणि सक्षमीकरण करण्यासाठी व उपाययोजनांना अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने राबविण्यात येत आहे. श्वेता कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. जान्हवी लवटे यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष भिमाशंकर बावगे, सचिव वेताळेश्वर बावगे, प्राचार्य संतोष म`तगे, उपप्राचार्या योगिता बावगे, संचालिका माधुरी बावगे, प्राचार्य एम.जी. सोनहिवरे, एनएसएस समन्वयक सवाई मनदीप, आर. एस. कोरे, एस. आर. समुद्रे, आर.एस. सांगवे उपस्थित होते.





### बोरोळ येथे गायीने दिला दोन जुळ्या वासरांना जन्म

**तभा वृत्तसेवा,**
**देवणी, दि. २३ सप्टेंबर-**

गाय एकावेळी एकाच वासराला जन्म देते. मात्र, देवणी तालुक्यातील बोरोळ येथील शेतकरी प्रशांत मनोहर पाटील यांच्या देवणी जातीच्या गायीने दोन जुळ्या वासरांना जन्म दिला आहे. ही दोन्ही वासरे पाहण्यासाठी गावकऱ्यांनी गर्दी केली होती.

शेतकरी प्रशांत पाटील यांच्या देवणी जातीच्या गायीने रविवारी दोन जुळ्या वासरांना जन्म दिला. विशेष म्हणजे गाय व दोन्ही वासरांची प्रकृती ठणठणीत असून हजारो गायींमध्ये अशा घटना क्वचित घडतात. गायीला जुळे झाल्याने शेतकरी पाटील मात्र जाम खुश आहेत. ही गोष्ट गावात पसरल्यानंतर ग्रामस्थांनी गाय व वासरांना पाहण्यासाठी एकच गर्दी केली होती. देवणी गायीचे संशोधन केंद्र सरकारने परळी वैद्यनाथ स्थलांतरित केले पण मूळ जगप्रसिद्ध देवणी जातीच्या गायी,वळू लातूर जिल्हा व देवणी तालुका व परिसरात असून पशुपालक, शेतकरी यांनी या देवणी गाय,वळू दोन्हीला पण मोठ्या कष्टाने प्रतिकूल परिस्थितीत जोपासली आहे.पुढे यात आणखी सुधारणा होण्यासाठी संशोधन केंद्र देवणी येथे करण्याची मागणी होत आहे.

### महाराष्ट्र महाविद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

**विभागीय स्तरासाठी निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. २२ सप्टेंबर-**

जिल्हास्तरीय १९ वर्ष वयोगट टेनिक्राईट व रग्बी स्पर्धेमध्ये महाराष्ट्र महाविद्यालयाचे मुलांचा व मुलींचा संघ प्रथम व विभागीय स्तरावर निवड करण्यात आली.

टेनिक्राईट स्पर्धेसाठी १९ वर्ष वयोगट मुले यात कदम श्रेयस, पटेल नावेदअली, पठाण समीरखा, पठाण शाहेदखॉ, काकडे बसवराज, शेख महंमद आदी खेळाडूनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

टेनिक्राईट स्पर्धेसाठी १९ वर्ष वयोगट मुली- माळी राधा, दिव्या गायकवाड, पाटील रितू, जाधव जान्हवी, माने श्रद्धा, स्नेहा कासराळे आदी खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

रग्बी स्पर्धेसाठी १९ वर्ष वयोगट मुले यात कदम श्रेयश, सय्यद अरसलान, शेख मन्नान, जाधव विश्वजीत, लदाफ सैफ, पठाण समीरखा, पठाण शाहेदखा, पठाण शोएबखा, काकडे बसवराज, कोरे आदित्य, सय्यद काशीमशा, शेख रेहान आदी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे.

रग्बी स्पर्धेसाठी १९ वर्ष वयोगट मुली यात धोंडदेव साक्षी, शेख सिमरन, भोपी दीक्षा, निटूरे अतिफा, शेख काजल, चव्हाण प्रिया, कोल्हे प्रिया, मुल्ला अस्मा, जवळगे प्रतिज्ञा, हंगरगे प्रगती, पाटील श्रुती, पवार सृष्टी आदी खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक पटकावला आहे. जिल्हास्तरीय कॅरम स्पर्धेमध्ये लखने स्नेहा या खेळाडूची विभागीय स्तरावर निवड झालेली आहे. जिल्हास्तरीय १९ वर्ष वयोगट अर्चेरी (खपवळरप ठशर्लीशी) या क्रीडा प्रकारात संकल्प शिंगारे, (कंपाऊंड) या क्रीडा प्रकारात जमालशा सय्यद (Recover Round) या क्रीडा प्रकारात शाहिदखाँ पठाण व समीरखाँ पठाण या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन प्रथम क्रमांक मिळवला व विभागीय स्तरावर निवडली. तसेच जिल्हास्तरीय फ्रीस्टाईल कुस्तीमध्ये सृष्टी पवार या विद्यार्थ्यांनीने प्रथम क्रमांक मिळवला व विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरली. या सर्व खेळाडूंना क्रीडा समन्वयक सूर्यकांत वाघमारे व यशोदा पाटील यांनी मार्गदर्शन केले.

### शिवाजी महाविद्यालयास नॅककडून अ दर्जा

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २३ सप्टेंबर-**

येथील शिवाजी महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाची स्वायत्तसंस्था राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद ( National ssessment and ccreditation Council- NC ) कडून अ + (CGP ३.२७) दर्जा देण्यात आला.

या समितीमध्ये अध्यक्ष म्हणून नॉलेज कंन्सोर्टियम गुजरात येथील माजी संचालक प्रो.डॉ.नरेंद्र चौटालिया, सदस्य तामिळनाडू येथील अंजा कॉलेज शिवकाशीचे माजी प्राचार्य प्रो.डॉ. पंड्याराजन वाल्लीमुथू यांची उपस्थिती होती. NC पीअर टीमच्या द्विसदस्यीय समितीने महाविद्यालयाची पाहणी करून समाधान व्यक्त केले. यापूर्वीचा 'ब' दर्जा प्राप्त केल्यानंतर यावर्षी शैक्षणिक गुणवत्ता व प्रगतीमध्ये भरीव योगदान देऊन अ+ (+) हा दर्जा प्राप्त केला. महाविद्यालयाने शैक्षणिक प्रगतीचा आलेख उंचावत ठेवला आहे. ग्रामीण भागातील व सीमावर्ती भागातील शेतकरी, शेतमजुरांच्या विशेषतः मुलींच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सतत उपक्रमशील योजना राबवून या महाविद्यालयाने छउ समितीचे लक्ष वेधून घेतले. यामुळे महाविद्यालयास हे यश संपादन करता आले. नॅकच्या मूल्यांकनासाठी संस्थेचे अध्यक्ष मा. श्रीरंगराव पाटील एकंबेकर, सचिव पी.टी.शिंदे, प्रभारी प्राचार्य डॉ. अरविंद नवले यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेऊन योगदान दिले. दि. ४ व ५ सप्टेंबर रोजी नॅकच्या समितीने संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयातील माजी विद्यार्थी, पालक, विद्यार्थी, सर्व कर्मचारी यांची संवाद बैठक घेऊन व सर्व विभागास भेटी देऊन महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. नॅक मूल्यांकनाच्या यशस्वीतेसाठी आयक्वेसी समन्वयक प्रा. डॉ. व्ही.एम.पवार, सात क्रायट्रियाचे प्रमुख,उपप्राचार्य डॉ.आर.एम. मांजरे तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी,शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांच्या सहकार्याने महाविद्यालयाने नॅक मूल्यांकन पूर्ण केले.

# धुता येथील शेतकऱ्याला मेथीची साथ

**केवळ एका एकरामध्ये महिनाभरात लाखाचे उत्पन्न**

**तभा वृत्तसेवा । सुधीर गंगणे**
**औसा, दि.२३ सप्टेंबर-**

निसर्गाच्या लहरीपणात पारंपरिक पीक पध्दतीत शेती बेभरवशाची झाली आहे. भरवशाने उत्पन्न मिळेल. यासाठी कांदा, कोथिंबीर या मोसमी व अल्पकालीन पिकाकडे पिकाकडे शेतकरी वळला आहे. परंतू यातूनही नैसर्गिक समस्यांतून नुकसानीस सामोरे जावे लागत आहे. यामुळे धुता येथील शेतकरी विवेक देशपांडे यांनी या पिक पध्दतीला बगल देत एक एकर मेथीची शेती या खरिप हंगामात केली. व अध्या ३८ ते ४० दिवसात एक लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न मिळाले असून या नव्या प्रयोगामुळे कोथिंबीरला पर्याय सापडला असून शेतकऱ्यांना नवी दिशा मिळाली आहे.

पारंपरिक पिक पध्दतीतून फारच कमी प्रमाणात शेतकरी शेतकरी हायटेक यंत्रणा राबवून व पर्यायाने अल्पभुधारक शेतकरी अख्खे कुटुंब शेतात राबवित शेती करतात. अशा कुटुंबाची गुजरान होऊन जेमतेम चार पैसे हातात येतात. परंतू बहुतांश शेतकरी कधी पाऊस जास्त होवून, कधी पाऊस कमी पडून तर कधी अवेळी पडून नुकसान होऊन शेतकरी संकटासह आर्थिक विवंचनेत सापडत आहे. आणि गेल्या दशकात असा एकही हंगाम पुर्णपणे शेतर्क्यांच्या पदरी पडून कर्जाचा डोंगर डोक्यावरून खाली उतरला असे उदाहरण शोधूनही सापडत नाही. यामुळे दरवर्षी शेतकरी हंगामात नव्या पीक प्रणालीचा शोध घेतात. यातून कोथींबीरची शेती हा पर्याय पुढे आला. यातून या परिसरातील कोथींबीरने मुंबई, नागपूर, हैद्राबाद, पुणे अशा नामांकित बाजारपेठेत वेगळी ओळख निर्माण केली.यामुळे या परिसरातील कास्ती बियाणाला पेटेंट मिळाले आहे. मात्र सलग दोन वर्ष एकाच जमिनीत या पीक पध्दतीचा अवलंब केला तर या जमिनीतून तिसऱ्या वर्षी कोथींबीरचे पीक येत नाही. याचबरोबर दुसरे पारंपरिक पीक व्यवस्थितपणे येत नाही. तसेच बाजारातील मिळणाऱ्या चढउतारीतील भावात नुकसान झाले तरी हजारात होत होते. आणि फायदा लाखात मिळतो. यामुळे शेतकरी हजारो एकरावर या मोसमी पिकाची शेती करतात. पण या पिकातून उत्पन्न भरवशाने मिळेल याची शास्वती नाही. या पिकाला पर्याय म्हणून कांही शेतकरी कांदा पिकाकडे वळले आहेत. ऐणवेळेचे सरकारी धोरणणातून बाजारात होणारी चढउतार पाहून मोजकेच शेतकरी या पिकाची शेती करतात. तर बहुतांश शेतकरी नव्या पिकातून हमखास उत्पन्न देणाऱ्या पिकाच्या शोधात दिसत आहेत. अशाच नव्या पिकाचा शोध घेणाऱ्या उजनीपासून चार किलोमिटर अंतरातील धाराशिव जिल्ह्यातील धुता येथे शेती असलेल्या शेतकरी विवेक विजयकुमार देशपांडे यांनी या वर्षी खरिप हंगामात कोथींबीरची पेरणी केली. सततच्या पावसाने पीक हातातून गेले. म्हणून निराश न होता . एक एकरात मेथी शेतीचा प्रयोग केला. जवळपास २५ किलो बियाणे एकरी एक पोते रासायनिक खताचा वापर करुन पेरणी केली. सततच्या ढगाळ वातावरणामुळे तीन चार किरकोळ फवारण्या कराव्या लागल्या. तर निसर्गाच्या लहरीपणात ओल टिकुन राहण्यासाठी स्पंकलरच्या सहय्याने तीन चार पाण्याचे शिंतोडे द्यावे लागले. या एक एकरासाठी



१२ हजार रुपये खर्च झाला. तर २७५ करेट मेथीच्या पेंडीतून ४६० रुपये करेटप्रमाणे एक लाख २५ हजाराचे उत्पन्न अवघ्या चाळीस दिवसाच्या आत शेतकऱ्याला एक एकरात व नव्या पीक पध्दतीतून मिळाले आहे. शेतकऱ्याने केलेल्या या धाडसी प्रयोगामुळे व शेतीतील नव्या पीक पध्दतीमुळे नवी दिशा मिळाली आहे.

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल





https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

सोलापूर तरुण भारत


## धनंजय गुडसूरकर यांना मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर

### ८ ऑक्टोबर रोजी पुण्यात सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**उदगीर, दि. २३ सप्टेंबर-**

मराठवाडा सेवक प्रतिष्ठान यांच्या वतीने देण्यात येणारे मराठवाडा रत्न २०२४ ची पुरस्कार जाहीर झाले असून या पुरस्कारासाठी उदगीर येथील प्रसिद्ध साहित्यिक व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य धनंजय गुडसूरकर यांना मराठवाडा रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या मराठवाड्यातील व्यक्तींचा हा सन्मान देऊन गौरव केला जातो.



गुडसूरकर यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल यावर्षीच्या मराठवाडा रत्न पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली असल्याचे प्रतिष्ठानच्या वतीने कळविण्यात आले आहे.

पद्मश्री भिकुजी इदाते यांच्या हस्ते पुण्याच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात या पुरस्काराचे ८ऑक्टोबर रोजी वितरण होणार असून कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डेक्कन अभिमत महाविद्यालयाचे कुलसचिव गो.बं. देगलूरकर हे राहणार असून मराठवाडा मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष भाऊसाहेब जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. गुडसूरकर यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

## संक्षिप्त वृत्त



### मतदार संघातील वाडी, तांडे शहराला जोडणार : क्रीडा मंत्री संजय बनसोडे

**उदगीर, दि. २३ सप्टेंबर-**

मतदार संघात अनेक वाडी तांडे असुन मागील काळात विविध योजनेतून निधी उपलब्ध करुन देवून तांड्यांचा विकास केला. मात्र अनेक तांडे हे रस्ते नसल्यामुळे शहराला जोडले नव्हते म्हणून या भागातील नागरिकांना अनेक समस्याला सामोरे जावे लागत होते. नागरिकांची हिच मागणी लक्षात घेवुन सदर तांडे हे शहराला जोडण्यासाठी मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून मतदार संघातील राहिलेले सर्व वाडी तांडे शहराला जोडणार असल्याचे मत क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. ते मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत उदगीर तालुक्यातील बोरताळा तांडा येथील रामा - ६३ बोरताळा तांडा ते टिकाराम तांडा ते मारुती तांडा रस्ता भुमीपुजन सोहळ्याप्रसंगी बोलत होते. यावेळी तहसीलदार राम बोरगावकर, कार्यकारी अभियंता सायस दराडे, गटविकास अधिकारी प्रवीण सुरडकर, पो.नि. राजकुमार पुजारी, माजी उपसभापती प्रकाश राठोड, माजी पं.स. सदस्य संजय पवार, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, कुणाल बागबंदे, नागलगावचे सरपंच सुभाष पवार, राजीव वागे, विकास जाधव, संजय जाधव, जे ई निलेवाड आदी उपस्थित होते. उदगीर हे सांस्कृतिक केंद्र आहे इथे कलाकारांची खाण आहे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने सांस्कृतिक भवन उभारले. आता महाराष्ट्रात उदगीरची नवी ओळख एम.एच.५५ या मुळे झाली आहे. उदगीर ते देगलूर ८१० कोटींचा रस्ता नुकताच मंजुर केला असुन लवकरच त्याचे ही काम सुरु होणार आहे. भविष्यात उदगीरला विमानतळ, आरोग्याच्या सेवेसाठी रिसर्च सेंटर व मेडिकल कॉलेज करणार ग्वाही ना. बनसोडे यांनी दिली.



### खेळांमुळे संघभावना वाढते : ढगे

**उदगीर, दि. २३ सप्टेंबर-**

खेळाच्या माध्यमातून खेळाडूवृत्ती तसेच संघभावना विकसित होते. आयुष्यात यशापयश पचविण्याचीही शक्ती खेळाच्या माध्यमातून आत्मसात करता येते, असे मत विद्यालयाचे विद्यार्थी प्रिय मुख्याध्यापक राम ढगे यांनी शाळेत संपन्न झालेल्या १७ वर्षे वयोगटातील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत तालुक्यात प्रथम आलेल्या खेळाडूंच्या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.ही स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय लातूर द्वारा संपन्न झाली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक राम ढगे यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हिरागिर गिरी, कोषाध्यक्ष गुंडेराव पाटील, उपमुख्याध्यापक बी.बी नागरवाड,प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक दिलीप हणमंते, पर्यवेक्षक राजेंद्रकुमार वलाकटे, रूपाली बालूरे,सुनंदा मूर्कीकर, परीक्षा विभाग प्रमुख बाबासाहेब पाटील, कला शिक्षक एन.आर जवळे यांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी रुद्राणी राठोड, वैष्णवी पवार, अंकिता बिरादार, धनश्री जाधव, सायली नरुदे, गुंजन कांबळे, दुर्गेश्वरी स्वामी, सिद्धी वारंगकर, संघमित्रा मसुरे, अक्षरात देशट वार, दीक्षा मसुरे, पार्वती कदम, मयुरी पवार, शिवकृपा गवळी, संजीवनी भालेराव, आरती राठोड या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. सूत्रसंचालन डी.के जाधव यांनी केले तर आभार अविनाश पोशेट्टी यांनी मानले.



### दसरा महोत्सव समिती अध्यक्षपदी ॲड. चामे

**अहमदपूर, दि. २३ सप्टेंबर-**

येथील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्याची व्यापक बैठक मार्गदर्शक तथा संस्थापक अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच शासकीय विश्रामगृहात संपन्न झाली. यावेळी सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा कार्यकर्ते ॲड. अजिंक्य भारत चामे यांची तर सचिवपदी सतीश सूर्यवंशी यांची बिनविरोध निवड करण्यात आली.उपाध्यक्ष जयराज तेलंग, वैभव बल्लोरे, सहसचिव ऋषिकेश गुट्टे, कोषाध्यक्ष योगेश शेटकार यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून बालाजी काडवादे, गंगाधर सूर्यवंशी, अमर पाटील, अक्षय कदम, रवी कदम, संतोष निटूरे, रोहन कंधारकर, पद्माकर पेंढारकर, पांडुरंग लोकरे यांची सर्वांनूमते निवड करण्यात आली. या बैठकीला माजी आमदार रामभाऊ गुंडिले, मार्गदर्शक ओम भाऊ पुणे, शिवसेना जिल्हा प्रमुख बालाजी रेड्डी, माधव पुणे, पापा आय्या, अभय मिरकले, रवी महाजन, जुगल शर्मा, सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, विकास महाजन,राजकुमार कल्याणे, दत्ता गोरे, दयानंद पाटील, राजू गाढवे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविक शिवकुमार उटगे यांनी सूत्रसंचालन राम तत्तापुरे यांनी तर आभार गोविंद गिरी यांनी तर गेल्या वर्षीच्या अहवालाचे वाचन माजी अध्यक्ष सुभाष गुंडिले यांनी केले. यावेळी माजी आमदार रामभाऊ गुंडिले, ओम भाऊ पुणे, माधव पुणे यांचे भाषणे झाली.

# लातूर जिल्ह्यात कडकडीत बंद

## मराठा समाजाच्या आरक्षण मागणीला सर्वस्तरातून पाठिंबा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि. २३ सप्टेंबर-**

मराठा समाजास ओबीसीमधून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी आंतरवाली सराटी येथे आमरण उपोषणास बसलेले मनोज जरांगे-पाटील यांना पाठिंबा म्हणून आज लातूर बंदचे आवाहन करण्यात आले. शहरात बंदला चांगला प्रतिसाद मिळाला. शहरातील सर्व व्यवहार होते. काही वेळ एस. टी. ही बंद होती; पण ती पुर्ववत चालू करण्यात आली. काही तरूण बंदचे आवाहन करत



असल्याचेही दिसून आले.

मराठा आंदोलकांनी आज गंजगोलाई येथे देवीची आरती केली आणि मराठ्यांना आरक्षण देण्या संदर्भात सरकारला सद्बुद्धी दे आणि मराठा योद्धे मनोज जरांगे-पाटील यांना चांगलं आरोग्य मिळू दे अशी प्रार्थना केली. यावेळी आंदोलकांनी सोबत आणलेले भोजनाचे डब्बे एकत्रीत करून सर्वांसोबत गोलाई येथे गोपाळकाला केला.

# निलंग्यात सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून निषेध

**निलंगा, दि. २३ सप्टेंबर-**

गेल्या सात दिवसांपासून मराठा योध्दा मनोज जरांगे-पाटील यांच्या सुरू असलेल्या अंतरवाली सराटी येथील आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सरकारच्या विरोधात निलंगा बाजारपेठ कडकडीत बंद ठेऊन छत्रपती शिवाजी महाराज चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालय पर्यंत सरकारची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून सरकारचा जाहीर निषेध करण्यात आला.

मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र द्यावे, मराठा समाजाचा सरसकट ओबीसींमध्ये समावेश करावा या मागणीसाठी गेली तेरा महिने झाले मराठा आंदोलन सुरू आहे. राज्य सरकारने आश्वासन देऊन ही मागण्या मान्य केल्या नाहीत म्हणून मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा अंतर वाली सराटी येथे आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या आमरण उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी महाराष्ट्रात अनेक प्रकारचे आंदोलने केले जात आहेत तरी आंदोलनाला यश मिळत नाही. या अंत्ययात्रेसाठी निलंगा तालुक्यातील गावागावातुन मराठा समाज शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. ही अंत्ययात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते उपविभागीय अधिकारी कार्यालय पर्यंत घेऊन जाण्यात आली. त्याठिकाणी उपस्थित सकल मराठा समाज बांधवांनी उपविभागीय अधिकारी यांच्या समोर मराठा समाजाच्या मागण्यांचा पाढाच वाचून दाखवला त्यावेळी उपस्थित महिला मुली बांधव यांच्या तीव्र भावना ऐकायला मिळाल्या, मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या तात्काळ मान्य करून त्यांचे उपोषण सोडवावे अशी विनंती उपस्थित महिलांनी केली. यावेळी उपस्थित मराठा बांधवांनी 'आरक्षण आमच्या हक्काचे नाही कोणाच्या बापाचे', 'एक मराठा लाख मराठा', 'जय जिजाऊ जय शिवराय',निष्क्रिय सरकारच्या नावाने बो..बो.. बो.. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

दरम्यान आज सकाळपासूनच निलंगा शहरातील बाजारपेठ कडेकोट बंद होती,सर्व व्यापाऱ्यांनी या बंदला पाठींबा दिला होता. उपविभागीय अधिकारी शरद झाडके व पोलीस निरीक्षक सुधीर सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी मराठा समाजाच्या मागण्या शासन दरबारी मांडू असा शब्द दिल्यानंतर आंदोलक शांत झाले.



मुंडण आंदोलन दरम्यान ३०० फूट उंच टॉवर वर चढून विविध रंगाच्या नाळकांडया फोडून शासनाच्या विरोधात घोषणाबाजी करत आंदोलन करणारे सतीश फट्टे, राहुल बिराजदार, दत्ता बाबळसुरे, सुजित बाबळसुरे, विजयकुमार हंकारे यांचा व मुंडण केलेले गणेश सूर्यवंशी,डिगंबर जाधव, सचिन पवार,अंकुश धनुरे, चक्रधर शेळके, किरण पाटील, माधव वाडीकर, राजेंद्र राघो, श्लोक जाधव या आंदोलकांचा सकल मराठा समाज निलंगा तालुक्याच्या वतीने आंदोलनाचे प्रतिक असलेले भगवी टोवी व शाल, हार, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

# एकल मराठा समाजाच्या वतीने वलांडी कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**वलांडी, दि. २३ सप्टेंबर-**

देवणी तालुक्यातील वलांडी व परीसरातील मनोज जरांगे पाटील यांच्या अंतरवली सराटी येथे सहा दिवसांपासुन सूरू असलेल्या अमरण उपोषणास पाठींबा म्हणून एकल मराठा समाजाच्या वतीने बंदचे आवाहन करण्यात आले. याला प्रतिसाद देत वलांडीतील बाजारपेठेतील दुकाने,शाळा, महाविद्यालय,एसटी बस आदी बंद ठेवून सरकार विरोधात तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला.

तालुक्यातील मुख्य बाजार पेठ असलेल्या वलांडी येथे कर्नाटक सीमाभागातील नागरीकांची मोठ्या संख्येने खरेदी साठी मोठी वर्दळ असते, मात्र सोमवार (ता. २३) रोजी मराठा समाजाच्या वतीने बंदचे आवाहन केल्यामूळे बाजारपेठेत शुकशुकाट पहावयास मिळाला. राज्य शासन आणि केंद्र शासनाच्या मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्याची उदासीनता ही गरजवंत मराठ्यांच्या जीवावर उठत आहे. या आरक्षणासाठी कित्येक मराठा युवकांनी आपले प्राण दिले आहेत म्हणून राज्य व केंद्र सरकारचा विरोध करण्यासाठी २३ सप्टेंबर रोजी लातूर बंद पुकारण्यात आला.

### शासनाने विलंब न करता आरक्षण जाहीर करावे

मुद्दामहून मराठा आरक्षणाचे घोंगडे भिजत ठेवले आहे यावर शासनाने ठोस भुमिका घ्यावी व मराठा समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा आगामी विधानसभा मराठ्यांची ताकद पून्हा दाखवून देण्याचा इशारा वलांडी सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आला.



## जरांगे-पाटलांना पाठिंबा देण्यासाठी शिरूर अनंतपाळ कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि.२३ सप्टेंबर-**

सकल मराठा महासंघाच्या वतीने लातूर जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. त्यामध्ये शिरूर अनंतपाळ शहरांमध्ये शंभर टक्के दुकाने कडकडीत बंद ठेवून पाठिंबा देण्यात आला.

त्यामध्ये व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ओमप्रकाश गलबले, उपाध्यक्ष मनोज दुरुगकर, सचिव गंगाधर चाकोते, बालाजी येरमलवार,जयलिंग कोरे,व्यंकट दादा धुमाळे, उद्धव पोद्दार, मदन पोद्दार, बाबू सावकार देवसटवार,नागनाथ उंबर्गे, सुमित तांबोळकर, इत्यादी व्यापारी असोसिएशनचे सभासदांनी या बंदला पाठिंबा दिला.

# देवणी येथे शाळा, महाविद्यालये बंद

**तभा वृत्तसेवा,**
**देवणी, दि.२३ सप्टेंबर-**

मराठा समाजाला ओबीसीतुन आरक्षण द्यावे या मागणीसाठी जरांगे पाटील सहाव्यांदा उपोषणाला बसले आहेत.उपोषणाचा सात दिवस झाले जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली असून प्रशासन लक्ष देत नसल्याने सकल मराठा समाज लातुर जिल्ह्यातच्या वतीने जिल्हा बंदचे आव्हान रोजी केले होते, या आवाहनाला प्रतिसाद देत देवणी तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने देवणीत सोमवारी (दि.२३) बंद पुकारण्यात आला.

देवणी तालुक्यातील व्यवसायिक बांधवांनी शहरातील आस्थापना व शाळा महाविद्यालये



बंद ठेऊन देवणी शहरासह , वलांडी ,बोरोळ धनेगाव यासह तालुक्यातील अनेक गावांत कडकडीत बंद ठेवण्यात आले

आंतरवली सराटी येथे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील बेमुदत उपोषणाला बसलेले असताना यांच्या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी सोमवारी देवणी तालुक्यात कडकडीत बंद पाळण्यात आला. अत्यावश्यक सेवा वगळता कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील शाळा आणि महाविद्यालये बंद ठेवण्यात आले. अत्यावश्यक सेवा वगळता कडकडीत बंद पाळण्यात आला. शहरातील शाळा व महाविद्यालये बंद ठेवण्यात आली. दवाखाने, मेडिकल वगळता जवळपास सर्वच दुकाने बंद होती. देवणी शहरातील व वलांडी , बोरोळज, धनेगाव, हेळंब येथील व्यापाऱ्यांनी सर्व दुकाने बंद ठेवली होती. तसेच शहरातील सर्व दुकाने बंद ठेवून व्यापाऱ्यांनी देवणी बंदला पाठिंबा दिला.

सकल मराठा समाजाच्या वतीने शांती मार्च रॅली काढून देवणी बंदीसाठी आह्वान सकाळी साडेदहा वाजता शहरातून शांती मार्च काढुन देवणी बंदला आव्हान सकल मराठा समाज देवीच्या वतीने शहरातील लासोना चौक ते बोरोळचौक, हनुमान कट्टा असा शांतीमार्च काढण्यात आला मराठा समाज बांधवांनी देवीच्या वतीने सरकारला आरक्षणाचा विषय लवकरात लवकर निकाली काढून मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करून मराठा समाजाला आरक्षण देण्याची मागणी केली.

# रेणापुरात बंदला व्यापाऱ्यांचा प्रतिसाद



**तभा वृत्तसेवा,**
**रेणापूर, दि. २३ सप्टेंबर-**

मराठा समाजास ओबीसीतून तातडीने आरक्षण द्यावे, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवार,२३ सप्टेंबर रोजी लातूर जिल्हा बंदचे आवाहन करण्यात आले होते त्याचाच भाग म्हणून रेणापूर शहरासह तालुक्यात सकल मराठा समाजाच्या बंद पुकारला यातव्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत दुकाने बंद ठेवून कडकडीत बंद पाळला.

मराठा आरक्षणासाठी समाज सातत्याने संघर्ष करीत आहे. आरक्षणाअभावी होत असलेली समाजाची परवड दिसत असताना सरकार व विरोधक हा प्रश्न गांभीर्याने न घेता त्याचे सातत्याने राजकारण करीत आहेत. शिक्षण घेऊन नोकरी मिळत नसल्याने अनेक युवकांनी आत्महत्या केल्या आहेत व त्या सुरूच आहेत. आर्थिक हतबलतेने अनेकांना शिक्षण अर्ध्यावर सोडावे लागत आहे. या आपत्तीतून समाजाला बाहेर काढण्यासाठी व त्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी मराठा समाजास ओबीसीतून आरक्षण मिळणे हाच एकमेव पर्याय आहे. हे आरक्षण मिळावे यासाठी अंतरवाली सराटी येथे मराठा आरक्षण योध्दे मनोज जरांगे पाटील हे सहाव्यांदा प्राणांतिक उपोषण करीत आहेत. त्यांची प्रकृती ढासळली आहे तरीही शासन हा विषय मार्गी लावण्यासाठी टाळाटाळ करीत याच्या निषेधार्थ, तसेच जरांगे पाटलांच्या समर्थनार्थ देण्यासाठी सोमवार दि. २३ सप्टेबर रोजी सकल मराठा समाजाच्या वतीने सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत रेणापूर बंदचे आवाहन करण्यात आले होते. अत्यावश्यक सेवा वगळता शाळा महाविद्यालय बंद करण्यात आली होती बंद दरम्यान तालुक्यात कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.



# आरीमोडला सकल धनगर समाजाचा रस्ता रोको आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**शिरूर अनंतपाळ, दि. २३ सप्टेंबर-**

तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने एसटी आरक्षण आमलबजावणी साठी निलंगा ते घरणी रस्त्यावरील आरीमोड येथे सोमवार (ता.२३) रोजी रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.

महाराष्ट्रात धनगर जमात पिढ्यानपिढ्या मेंढपाळ चा व्यवसाय करीत असून ते पशुपालक आहेत. १९५६ च्या एस. सी./एस.टी यादीत महाराष्ट्रातील अनु. जमातीच्या यादीत अनु.क्र.३६ वर धनगड (उ्हरपसरव) आल्याने धनगर (उ्हरपसरी) जमात त्यांच्या सांविधानिक हक्क गेली ६८ वर्षापासून वंचित आहे. वास्तविक धनगड नावाची जमात देशात काय जगात कुठेच अस्तित्वात नाही. त्यामुळे धनगर जमातीला अनुसुचित जमातीत समावेश करावे यासाठी

लातूरसह विविध ठिकाणी व सुरू असलेल्या अमरण उपोषणास पाठिंबा दर्शविण्यासाठी शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आरीमोड येथे रस्तारोको अंदोलन करण्यात आले आहे . अंदोलन कर्त्यांचे निवेदन महसुल प्रशासनाला देण्यात आले . यावेळी पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांनी चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता . यावेळी धनगर समाजाचे नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.